# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, ■ सोमवार १३ जुलै २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठे १०







## शेतक-यांना जुलै अखेरपर्यंत कर्जमाफी



### आयकरदात्या शेतकऱ्यांना योजनेतून वगळणार

**वालचंदनगर :** राज्यातील शेतकऱ्यांना जुलै महिना संपण्यापूर्वीच कर्जमाफी देण्यास सरकार कटिबद्ध असून, करदात्या (आयकर भरणाऱ्या) शेतकऱ्यांना मात्र या योजनेचा लाभ मिळणार नाही, अशी माहिती राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

रविवार, दिनांक १२ रोजी कृषीमंत्री भरणे हे आपल्या निवासस्थानी आले असता पत्रकारांनी त्यांना कर्जमाफीबाबत प्रश्न विचारले. यावेळी कर्जमाफीसाठी सरकारकडून 'तारीख पे तारीख' दिली जात असल्याचा प्रश्न विचारला असता ते म्हणाले, 'हे सरकार शेतकरी हिताचा विचार करणारे आहे. वास्तविक पाहता आम्ही कर्जमाफीसाठी ५ जुलै ही तारीख दिली होती. पावसाळी अधिवेशनात २० हजार कोटींचे पुरवणी बजेट मांडून त्यासाठी तरतूदही करण्यात आली आहे. मात्र, दरम्यानच्या काळात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कर्जमाफीच्या निकषांमध्ये बदल करून योजना अधिक स्पष्ट केली.' त्यानुसार, सन २०१९ च्या कर्जमाफीतील शेतकऱ्यांनाही सरसकट २ लाखांची ☞(पान २ वर)

# इराण बदल्याच्या तयारीत? डोनाल्ड ट्रम्प, बेंजामिन नेतन्याहू यांच्यासह जगातील १३ नेते 'हिट लिस्ट'वर!

## वृत्तपत्राने प्रसिद्ध केली यादी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** अमेरिका-इस्त्रायल आणि इराणयुद्ध कुठवर जाणार हे सांगणे कठीण आहे. मात्र, अयातुल्लाह अली खामेनेई यांच्या मृत्यूनंतर, इराणमध्येअमेरिका आणि इस्त्रायलप्रति संतापाची लाट आणि इराणी जनतेच्या मनात बदल्याची तीव्र भावना दिसत आहे. खामेनेई यांच्या अंत्यसंस्कारासाठी जमलेल्या नागरिकांमध्ये 'किल अमेरिका', 'किल इस्त्रायल' असे लिहिलेले फलकही झळकले आहेत.

दरम्यान आता, इराणमधील एका कट्टरपंथी वृत्तपत्राने खामेनेई यांच्या हत्येसाठी काही परदेशी नेत्यांना जबाबदार धरत थेट त्यांची नावे आणि छायाचित्रेच प्रसिद्ध केली. एवढेच नाही तर यासोबत एक मोठा लेखही लिहिला आहे. या लेखाचा मतीतार्थ, 'अयातुल्लाह अली खामेनेई यांच्या हत्येचा बदला घेण्यासाठी, त्यांच्या हत्येस जबाबदार सर्वांना निशाणा बनवायला हवे, असा आहे. 'हमशहरी' असे या वृत्तपत्राचे नाव आहे.



### यादीत कोण कोणत्या नेत्यांची नावे?


या यादीत अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प, इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू, ब्रिटिश पंतप्रधान कीर स्टारमर यांचा समावेश आहे. याशिवाय, अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो, संरक्षण मंत्री पीट हेगसेथ, फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन, इटलीच्या पंतप्रधान मेलोनी आणि जर्मनीचे चांसलर फ्रेडरिक मर्ज, यांच्या नावांचाही समावेश आहे.

**मोजतबा खामेनेई यांचा पहिला सार्वजनिक संदेश -** इराणचे नवीन सर्वोच्च नेते मोजतबा खामेनेई यांनी शनिवारी आपला पहिला सार्वजनिक संदेशात दिला. आपल्या पहल्या संदेशत मोजतबा खामेनेई म्हणाले, 'बदला घेणे ☞(पान २ वर)

## वाघाच्या तावडीतून गुराख्याची थरारक सुटका

### ग्रामस्थांच्या धाडसाने जीव वाचला!

**चंद्रपूर /वृत्तसंस्था-** वनपरिक्षेत्र तळोधी अंतर्गत येणाऱ्या सावंगी (बडगे) गावाजवळ रविवारी दुपारी घडलेल्या वाघाच्या हल्ल्याने संपूर्ण परिसर हादरून गेला. गोसेखुर्द कालव्याजवळ गुरे चारण्यासाठी गेलेल्या ३० वर्षीय गुराख्यावर पट्टेदार वाघाने अचानक झडप घालत जीवघेणा हल्ला केला. मात्र मृत्यू समोर उभा ठाकला असतानाही धैर्य न गमावता आरडाओरडा केल्याने आणि ग्रामस्थांनी तातडीने धाव घेतल्याने त्यांचा जीव थोडक्यात बचावला. या घटनेमुळे 'होता जिवा म्हणून वाचला शिवा' या मराठी म्हणीचा प्रत्यय अक्षरशः आला आहे. मिळालेल्या



माहितीनुसार, कांचन प्रकाश खोब्रागडे (वय ३० वर्ष), रा. सावंगी (बडगे) हे नेहमीप्रमाणे स्वतःची म्हैस व बैल घेऊन जंगल परिसरात चराईसाठी गेले होते. दुपारी सुमारे १२ वाजताच्या सुमारास ते गोसेखुर्द कालव्याजवळ पोहोचले असता झुडपात दबा धरून बसलेल्या पट्टेदार वाघाने अचानक त्यांच्यावर झडप घातली.

हल्ला इतका अचानक झाला की काही क्षणांतच वाघाने कांचन खोब्रागडे यांना जमिनीवर पाडून फरफटत नेण्याचा प्रयत्न केला. या जीवघेण्या प्रसंगातही त्यांनी धैर्य गमावले नाही. त्यांनी मोठ्याने आरडाओरडा सुरू केला. त्यांच्या किंकाळ्या ऐकून जवळच असलेले रवी वाडगुरे यांनी प्रसंगावधान राखत घटनास्थळी धाव घेतली.

**ग्रामस्थांच्या धाडसाने जीव वाचला-** रवी वाडगुरे यांनी धाडस दाखवत जखमी गुराख्याला वाघाच्या तावडीतून सोडविण्यास मदत केली. त्यांच्या या प्रसंगावधानामुळे मोठी जीवितहानी टळली. काही क्षणांचा विलंब झाला असता तर परिणाम अधिक गंभीर झाला असता, अशी ☞(पान २ वर)

## मुंबईत ७ वर्षांच्या चिमुकलीवर अत्याचार

### बाथरुममध्ये घुसून सुरक्षा रक्षकाचे अमानुष कृत्य

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईतील पायधुनी भागातून अतिशय धक्कादायक घटना समोर येत आहे. एका सात वर्षाच्या चिमुकलीवर सुरक्षा रक्षकाने अत्याचार केल्याची माहिती मिळत आहे. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ पावले उचलली. या चिमुकलीवर अत्याचार करणाऱ्या नराधमाला अटक करण्यात आली आहे. या घटनेने परिसरात खळबळ माजली आहे.

काही मिडिया रिपोर्ट्सनुसार, मुंबईतील पायधुनी परिसरात एका ७ वर्षीय अल्पवयीन मुलीवर इमारतीच्या सुरक्षारक्षकाने



बाथरूममध्ये घुसून अत्याचार केल्याची निंदनीय घटना घडली आहे. या घटनेत पीडित मुलगी गंभीर जखमी झाली असून तिला तातडीने नजीकच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.तिच्यावर सध्या उपचार सूरू आहेत.तिची प्रकृती कशी आहे, याची अद्याप माहिती मिळू शकली नाही आहे. या घटनेनंतर संतप्त नागरिकांनी पायधुनी पोलीस स्टेशनबाहेर एकच गर्दी केली. पोलीस स्थानकाला घेराव घातला.

आरोपीला कठोर शिक्षा व्हावी, या मागणीसाठी संतप्त नागरिक रस्त्यावर उतरले. यामुळे येथील वाहतूक काही काळ पूर्णपणे ठप्प झाली होती. पोलिसांनी संयमाने आंदोलक नागरिकांची समजूत काढत रस्ता पुन्हा वाहतुकीसाठी मोकळा केला. जमावाने पोलिसांविरोधात आणि प्रशासना ☞(पान २ वर)

## भिवंडीत ऑइलच्या गोदामाला भीषण आग

**मुंबई/प्रतिनिधी :** भिवंडीतील खाडीपार परिसरातील मच्छा कंपाउंड येथे असलेल्या एका ऑइलच्या गोदामाला आज भीषण आग लागल्याची घटना समोर आली. लूम उद्योगासाठी साठवून ठेवलेल्या जुन्या ऑइलमुळे आगीने काही क्षणांतच रौद्ररूप घेतले. या आगीमुळे परिसरात काळपट धुराचे मोठे लोट पसरले असून, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. सुदैवाने, या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नसल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मच्छा कंपाउंडमधील या गोदामात



लूम व्यवसायासाठी लागणारे जुने ऑइल मोठ्या प्रमाणात साठवून ठेवण्यात आले होते. ऑइल हे अत्यंत ज्वलनशील असल्याने आगीची ठिणगी पडताच ती वेगाने पसरली.☞(पान २ वर)

## बसला भीषण आग; रिक्षाचालकाच्या सतर्कतेमुळे ३५ प्रवाशांचे वाचले प्राण

**कल्याण, मुंबई/प्रतिनिधी :** भिवंडी आगाराच्या खडवली–पडघा या नियमित फेरीवरील एसटी बसला शनिवारी (दि. ११) सायंकाळी सुमारे ६ वाजण्याच्या सुमारास खडवली येथे अचानक भीषण आग लागल्याने काही मिनिटांतच संपूर्ण बस जळून खाक झाली.

मात्र, स्थानिक रिक्षाचालक शैलेश जाधव यांच्या सतर्कतेमुळे बसचालकाला वेळेत आग लागल्याची माहिती मिळाली. त्यामुळे बसमधील सुमारे ३० ते ३५ प्रवाशांना तातडीने सुरक्षित बाहेर काढण्यात यश आले आणि संभाव्य मोठी दुर्घटना टळली. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसून बसचे मोठ्या



प्रमाणात नुकसान झाले आहे.


मिळालेल्या माहितीनुसार, खडवली–पडघा या सायंकाळी ६ वाजताच्या नियमित फेरीवरील एसटी बस खडवली परिसरातून जात असताना रिक्षाचालक शैलेश जाधव यांच्या निदर्शनास बसच्या पुढील भागातून धूर व आगीच्या ज्वाळा दिसल्या.

परिस्थितीचे गांभीर्य ओळखून त्यांनी तात्काळ बसचालकाला गाडीला आग लागल्याची सूचना दिली. बसचालकानेही प्रसंगावधान राखत बस तातडीने थांबवली. दोन्ही दरवाज्यांतून सर्व प्रवाशांना त्वरित खाली उतरवले. प्रवासी सुरक्षित बाहेर पडताच काही क्षणांतच आगीने रौद्ररूप धारण केले आणि संपूर्ण बसला वेढा घातला.☞(पान २ वर)

## 'एल निनो' चा प्रभाव वाढणार?

### निम्मा महाराष्ट्र दुष्काळाच्या सावटाखाली

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यच्या काही भागात मागील आठवड्यात अतिवृष्टी सदृश्य पाऊस होऊन काही भागात जुलैच्या सरासरी पावसाहून अधिक पाऊस नोंदला गेला. मात्र, राज्यातील बहुतांश जिल्ह्यात सरासरीहून कमी पावसाची नोंद झाली आहे. जुलै महिना हा शेतीसाठी अत्यंत महत्वाचा मानला जातो. मात्र, सध्या पावसाने विश्रांती घेतल्याचे चित्र असून पुढील आठवडाभर तरी राज्यात काही भागात हलक्या ते मध्यम सरींचा अंदाज वगळता सर्वदूर पावसाची शक्यता कमीच आहे, असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. दरम्यान, मोसमी पावसाच्या



हंगामावरील प्रशांत महासागरतील 'एल निनो' स्थितीचा प्रभाव वाढताना दिसत असून पावसाचे प्रमाण असमान होत आहे. यंदा राज्यात मोसमी पावसाच्या आगमनापासून त्याचे अनेक भागात होणारे असमान प्रमाण दिसून येत आहे. जून महिन्यात दीर्घ काळ पावसाने ओढ दिल्यानंतर जुलैच्या सुरुवातील मोमसी पाऊस☞(पान २ वर)

## व्हिएतनाम दुर्घटनेत १५ भारतीयांचा मृत्यू, स्पीडबोटच्या कॅप्टनला अटक

**जियांग /वृत्तसंस्था-** व्हिएतनाममधील साउथ फु क्वोक बेटाजवळ स्पीडबोट उलटून झालेल्या दुर्दैवी अपघातात १५ भारतीय पर्यटकांचा मृत्यू झाला. याप्रकरणी आता (रविवार) व्हिएतनाम पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. संबंधित स्पीडबोटच्या कॅप्टनला अटक करण्यात आली आहे.

'एएफपी'ने दिलेल्या वृत्तानुसार, येथील अन जियांग प्रांतातील पोलिसांनी म्हटले आहे की, अपघातावेळी बोटीवर उपस्थित असलेल्या ५७ वर्षीय कॅप्टनला अटक करण्यात आली आहे. त्याच्यावर सागरी सुरक्षा नियमांचे उल्लंघन केल्याच्या आरोप ठेवण्यात आला आहे.



डझनावर लोक उलटलेल्या बोटीला धरून होते -

या अपघातासंदर्भात प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, अपघाता वेळी पाऊस पडत नव्हता पण समुद्र अशांत होता. अनेक जण लाइफ जॅकेटशिवाय समुद्रात वाहत होते, तर डझनावर लोक उलटलेल्या बोटीला धरून होते. दरम्यान, स्थानिक बचाव पथकाने फ्लोटिंग रिंग आणि दोरीच्या सहाय्याने १७ भारतीय पर्यटकांना आपल्या बोटीवर खेटले आणि त्यांचा जीव वाचवला. यानंतर मदतीसाठी अतिरिक्त ☞(पान २ वर)

## 'सुट्टे पैसे नाहीत, बसमधून खाली उतरा...' : बस कंडक्टरने थेट परिवहन मंत्र्यांनाच बसमधून उतरवले!

**बेंगळुरू/वृत्तसंस्था-** प्रवास एसटीचा असो की शहरातील महापालिका बसचा, यातून प्रवास करताना सर्वसामान्यांना होणारा त्रास ही आपल्याकडे गृहीत धरलेलीच बाब आहे. कधी बस उशिरा येणे, तर कधी किरकोळ गोष्टींवरून बसचालक आणि वाहकांशी प्रवाशांची वादावादी होणे या नेहमीच कानावर पडणाऱ्या गोष्टी. अनेकवेळा हे प्रसंग अगदी हातघाईवरही येतात; पण विचार करा, असाच धक्कादायक अनुभव खुद्द राज्याच्या परिवहन मंत्र्यांनाच आला तर? ऐकायला अजब



वाटेल, पण अशीच घटना कर्नाटकमध्ये प्रत्यक्षात घडली आहे. मंत्र्यांच्या या 'रिॲलिटी चेक'मुळे सध्या कर्नाटकच्या परिवहन वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. राज्याचे परिवहन मंत्री बैरथी सुरेश यांनी शनिवारी रात्री कोणत्याही सुरक्षेशिवाय, छुप्या वेषात एका सामान्य प्रवाशासारखा बेंगळुरूच्या 'बीएमटीसी' बसने प्रवास केला. शहरातील ☞(पान २ वर)




जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# महापालिका आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले रुजू

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगरपालिकेचे नवनियुक्त आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले (भा.प्र.से.) यांनी आज पदभार स्वीकारला. माजी आयुक्त वर्षा लड्डा यांच्याकडून त्यांनी अधिकृतरित्या कार्यभार स्वीकारत शहराच्या सर्वांगीण, शाश्वत व नागरिकाभिमुख विकासासाठी कटिबद्ध राहण्याची ग्वाही दिली.

पदभार स्वीकारल्यानंतर डॉ. गोंदावले यांनी सांगितले की, अमरावती शहराच्या विकासाला अधिक गती देण्यासाठी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या समन्वयातून कार्य केले जाईल.

महानगरपालिकेअंतर्गत सुरू असलेले विविध विकास प्रकल्प, स्वच्छता, पायाभूत सुविधा, नागरिकांना गुणवत्तापूर्ण सेवा आणि प्रशासनातील पारदर्शकता यांना सर्वोच्च प्राधान्य देत विकासकामांना अधिक गतिमान करण्यात येईल. नागरिकांच्या अपेक्षांनुसार संवेदनशील, उत्तरदायी आणि लोकाभिमुख प्रशासन देण्यासाठी सातत्याने



प्रयत्नशील राहणार असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.

यावेळी माजी आयुक्त वर्षा लड्डा यांनी आपल्या कार्यकाळात अधिकारी व कर्मचारी वर्गाने दिलेल्या सहकार्याबद्दल समाधान व्यक्त केले. महानगरपालिकेची सकारात्मक प्रतिमा अधिक बळकट करण्यासाठी सर्वांनी समन्वय, जबाबदारी आणि लोकाभिमुख दृष्टिकोन ठेवून कार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. तसेच डॉ. मंगेश गोंदावले यांना नवीन जबाबदारीसाठी शुभेच्छा देत अमरावतीच्या सर्वांगीण प्रगतीसाठी त्यांच्या कार्यकाळास यश लाभो, अशी सदिच्छा व्यक्त केली.

# फायरिंग प्रकरणातील फरार आरोपीसह दोघांना अटक

## नवसारी चौकात ट्रान्सपोर्ट व्यावसायिकावर प्राणघातक हल्ल्या प्रकरण

**अमरावती/प्रतिनिधीः-** नागपुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील फायरिंग प्रकरणात मागील २० दिवसांपासून फरार असलेल्या सराईत आरोपीसह त्याच्या साथीदाराला अमरावती शहर गुन्हे शाखेने अटक केली आहे. या दोघांनी नुकताच नवसारी चौक परिसरात एका ट्रान्सपोर्ट व्यावसायिकावर धारदार शस्त्राने प्राणघातक हल्ला केला होता. घटनेनंतर काही तासांतच गुन्हे शाखेने सापळा रचून दोघांनाही जेरबंद केले.

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये सय्यद सोहेल उर्फ फज्जू सय्यद गफार (वय २८, रा. अन्सारनगर, अमरावती) आणि अब्दुल जरिब उर्फ शाहरुख अब्दुल शरीफ (वय ३२, रा. रतनगंज, गवळीपुरा, अमरावती) यांचा समावेश आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रतनगंज येथील नितेश रमेशराव तायवाडे (वय ४५) यांचा नवसारी चौकात 'एमपी राजस्थान' नावाने ट्रान्सपोर्ट व्यवसाय आहे. ११ जुलै रोजी सायंकाळी ते नवसारी चौकातील



'अप्पा कॅन्टीन' येथे चहा पिण्यास गेले असता, दोन युवकांनी त्यांच्याशी विनाकारण वाद घातला. काही वेळाने दोघे पुन्हा तेथे आले आणि शिवीगाळ करत मारहाण करण्यास सुरुवात केली. नितेश तायवाडे यांनी स्वतःचा बचाव करण्याचा प्रयत्न केला असता, एका आरोपीने जवळील धारदार शस्त्राने त्यांच्या कंबरेखाली वार करून त्यांना गंभीर जखमी केले. त्यानंतर दोघेही घटनास्थळावरून पसार झाले. या प्रकरणी गाडगेनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन शहर गुन्हे शाखेने तातडीने तपास सुरू केला. गोपनीय माहिती आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपींची ओळख पटली. तपासादरम्यान अटक करण्यात आलेल्या आरोपींपैकी सय्यद सोहेल उर्फ फज्जू हा २० जून रोजी नागपुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या फायरिंग प्रकरणातील फरार आरोपी असल्याचे समोर आले. त्याच्याविरुद्ध खुनाचा प्रयत्न, शस्त्र कायद्यासह विविध गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल असून पोलीस त्याचा शोध घेत होते. गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचून आरोपींचा पाठलाग केला आणि हल्ल्यानंतर अवघ्या काही तासांत दोघांनाही अटक केली. त्यानंतर पुढील कायदेशीर कारवाईसाठी आरोपींना गाडगेनगर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

ही कारवाई गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक मनीष वाकोडे, तसेच दशरथ आडे, फिरोज खान, संभाजी केंद्रे, मंगेश लोखंडे, नाझिमोद्दीन सय्यद आणि सचिन भोयर यांच्या पथकाने केली.

# एमडी तस्करीतील तडीपार गुन्हेगारासह दोघे जेरबंद

## मुख्य पुरवठादार फरार, ३.७७ लाखांचा मुद्देमाल जप्त

### -नागपुरी गेट डीबी पथकाची सापळा रचून कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** नागपुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील यास्मीननगर परिसरात एमडी (मेफेड्रोन) अंमली पदार्थाची विक्री करण्याच्या तयारीत असलेल्या तडीपार गुन्हेगारासह दोघांना नागपुरी गेट पोलिसांच्या डीबी पथकाने सापळा रचून अटक केली. आरोपींकडून १७.९ ग्रॅम एमडी अंमली पदार्थ आणि रोख रक्कम असा एकूण ३ लाख ७७ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणातील मुख्य पुरवठादार मात्र फरार असून त्याचा पोलीस शोध घेत आहेत.

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये शेख जब्बार शेख गफ्फार (वय २९) आणि शेख शजील उर्फ राज शेख इरफान (वय १९, दोघे रा. यास्मीननगर, अमरावती) यांचा समावेश आहे. तर मोहम्मद शहबाज उर्फ लाला अब्दुल शकील (रा. बाबानगर, अमरावती) हा मुख्य पुरवठादार फरार असल्याचे पोलिसांनी सांगितले. ११ जुलैच्या रात्री नागपुरी गेट पोलिसांचे डीबी पथक गस्तीवर असताना गोपनीय माहिती मिळाली की, रेकॉर्डवरील तडीपार गुन्हेगार शेख जब्बार आणि त्याचा साथीदार मोठ्या प्रमाणात एमडी विक्रीसाठी यास्मीननगर येथील तवक्कल मॅरेज हॉलच्या मागील परिसरात येणार आहेत. माहितीची खातरजमा करून वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळविण्यात आले. त्यानंतर पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाईचे नियोजन करण्यात आले. सरकारी पंच, शासकीय छायाचित्रकार आणि अमरावती न्यायवैद्यक (फॉरेन्सिक) पथकाच्या उपस्थितीत संबंधित ठिकाणी सापळा रचण्यात आला. रात्री उशिरा आरोपी तेथे येताच पोलिसांनी त्यांना घेराव



घालून ताब्यात घेतले. फॉरेन्सिक पथकाच्या उपस्थितीत घेतलेल्या झडतीत त्यांच्या ताब्यातून १७.९ ग्रॅम चमकदार स्वरूपाचा पदार्थ आढळून आला. प्राथमिक तपासणीत तो एमडी (मेफेड्रोन) अंमली पदार्थ असल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी आरोपींकडून ३ लाख ७६ हजार रुपये किमतीचा १७.९ ग्रॅम एमडी आणि १ हजार १०० रुपये रोख, असा एकूण ३ लाख ७७ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. चौकशीदरम्यान आरोपींनी जप्त करण्यात आलेला एमडी हा मोहम्मद शहबाज उर्फ लाला याने विक्रीसाठी दिल्याची कबुली दिली. त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक विकास मनपीया यांच्या तक्रारीवरून दोन्ही अटक आरोपींसह फरार मोहम्मद शहबाज उर्फ लाला याच्याविरुद्ध एनडीपीएस कायद्यान्वये नागपुरी गेट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याचा शोध सुरू आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त श्याम घुगे आणि सहाय्यक पोलीस आयुक्त निलेश ब्राम्हणे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनोहर कोटनाके, पोलीस निरीक्षक जनार्दन साळुंखे, पोलीस उपनिरीक्षक विकास मनपीया, डीबी पथक प्रमुख मलिक अहमद तसेच दिनेश नांदे, दानिश शेख, राहुल रोडे, सागर पंडित आणि विक्रम नशिबकर यांनी पार पाडली.

# तरुणीला पेट्रोल टाकून जिवंत जाळण्याचा प्रयत्न

## -लग्नास नकार दिल्याने घरात घुसून विनयभंग -आरडाओरड होताच आरोपी फरार

**अमरावती/प्रतिनिधीः-** कुऱ्हा पोलीस ठाण्याच्या हद्दीत १९ वर्षीय तरुणीने पूर्वी दाखल केलेली तक्रार मागे घेण्यास तसेच लग्नास नकार दिल्याच्या रागातून एका तरुणाने तिच्या घरात घुसून विनयभंग केला. त्यानंतर अंगावर पेट्रोल ओतून तिला जिवंत जाळण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना घडली. तरुणीने आरडाओरड केल्याने शेजारी आणि नातेवाईक धावून आल्यामुळे आरोपी पळून गेला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीविरुद्ध खुनाचा प्रयत्न, विनयभंग आणि इतर गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ११ जुलै रोजी दुपारी पीडितेचे आई-वडील आणि मोठे आई-वडील लग्नसमारंभासाठी बाहेरगावी गेले होते. घरात केवळ १९ वर्षीय तरुणी आणि तिची आजी होत्या. त्याचवेळी आजीचा मुलगाही काही कामानिमित्त बाहेर गेला होता. तरुणी घरात कपडे धुत असताना बाहेरून कोणीतरी तिला हाक मारली. तिने मुख्य दरवाजा उघडताच समोर प्रतीक विलास ताठे उभा असल्याचे दिसले. घरात प्रवेश करताच आरोपीने तरुणीवर दबाव टाकत, माझ्याविरुद्ध दाखल केलेली तक्रार मागे घे. मी तुझ्याशी लग्न करतो, असे सांगितले. मात्र तरुणीने स्पष्ट शब्दांत तक्रार मागे घेण्यास आणि लग्न करण्यास नकार दिला. यामुळे संतप्त झालेल्या आरोपीने तिच्याशी जबरदस्ती करत विनयभंग केला. झटापटीत तिचे कपडेही फाटल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. यानंतर आरोपीने सोबत आणलेल्या बाटलीतील पेट्रोल तरुणीच्या अंगावर ओतले. त्यानंतर खिशातून माचीस काढून तिला जिवंत जाळण्याचा प्रयत्न केला. घाबरलेल्या तरुणीने मोठ्याने आरडाओरड केल्याने शेजारी आणि तिचा चुलत भाऊ तातडीने घटनास्थळी धावून आले. लोक येताना पाहून आरोपीने तरुणीला जीवे मारण्याची धमकी दिली आणि तेथून पळ काढला. पीडितेच्या तक्रारीवरून कुऱ्हा पोलिसांनी आरोपी याच्याविरुद्ध खुनाचा प्रयत्न, विनयभंग, धमकी तसेच अन्य संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल केला असून फरार आरोपीचा शोध सुरू आहे. प्राथमिक तपासात आरोपीविरुद्ध यापूर्वीही गुन्हा दाखल असल्याची माहिती समोर आली असून पुढील तपास कुऱ्हा पोलीस करीत आहेत.

# १ व १० वरील उर्वरित

## शेतक-यांना जुलै अखेरपर्यंत कर्जमाफी

कर्जमाफी दिली जाणार असून, नियमित कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजारांचे प्रोत्साहनपर अनुदान देण्याचा निर्णय झाला आहे. मात्र, यामध्ये करदात्या शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळणार नाही. त्यासाठी करदात्या शेतकऱ्यांची माहिती केंद्र सरकारकडून मागवण्यात आली असून, त्या प्रस्तावावर केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची स्वाक्षरी झाली आहे. तो प्रस्ताव आता राज्यपालांच्या स्वाक्षरीसाठी गेला असून, लवकरच मंजुरी मिळून प्रत्यक्षात कर्जमाफीच्या अंमलबजावणीस सुरुवात होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

'जरी कर्जमाफी देण्यास थोडासा उशीर झाला असला, तरी या बदलांमुळे कर्जमाफीची रक्कम ३६ हजार ५८५ कोटींवरून थेट ४० हजार कोटींवर जाणार आहे. शिवाय, योजनेच्या अंमलबजावणीपूर्वीच लाभार्थ्यांची अचूक पडताळणी झाल्याने नंतर कोणत्याही अडचणी निर्माण होणार नाहीत,' असे सांगत कर्जमाफीची प्रक्रिया जुलै महिन्याच्या पुढे जाणार नाही, असा ठाम विश्वास कृषीमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला.

## इराण बदल्याच्या तयारीत?

आवश्यक आहे, ही आपल्या देशाची सर्वात मोठी मागणी आहे, ती नक्कीच पूर्ण व्हायला हवी.' यावेळी, इराणने लक्ष्य करण्यासाठी लोकांची यादी तयार केल्याचेही ते म्हणाले होते. मात्र, त्यांनी कुणाचेही नाव घेतले नव्हते. 'एएफपी'ने दिलेल्या वृत्तानुसार, तेहरानमधून प्रसिद्ध होणाऱ्या 'हमशहरी' या वृत्तपत्राने शनिवारी एक इन्फोग्राफिक ऑनलाइन शेअर केले. त्यात मोजतबा खामेनी यांच्या संदेशासह १३ परदेशी नेत्यांचे फोटो आहेत. महत्वाचे म्हणजे, या युद्धात अमेरिकन लढाऊ विमानांना आपल्या हवाई हद्दीतून जाण्याची परवानगी देणाऱ्या युरोपीय देशांच्या सरकारांनाही इराणने हल्ल्यांसाठी जबाबदार धरले आहे.

## वाघाच्या तावडीतून गुराख्याची

प्रतिक्रिया ग्रामस्थांनी व्यक्त केली. घटनेची माहिती मिळताच गावकरी मोठ्या संख्येने घटनास्थळी धावले. गंभीर जखमी अवस्थेतील कांचन खोब्रागडे यांना प्रथम तळोधी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. त्यानंतर वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी त्यांना पुढील उपचारासाठी सिंदेवाही येथे हलविले. तेथे प्राथमिक उपचार करून अधिक उपचारासाठी त्यांना चंद्रपूर येथील रुग्णालयात रेफर करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

या घटनेमुळे जंगलालगतच्या गावांमध्ये वन्यप्राण्यांचा वाढता वावर आणि मानव-वन्यजीव संघर्षाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. शेतकरी, गुराखी आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी वनविभागाने प्रभावी उपाययोजना करणे आवश्यक असल्याची भावना परिसरातील नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

## मुंबईत ७ वर्षांच्या चिमुकलीवर

विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. जमावाचा वाढता रोष आणि कायदा-सुव्यवस्थेची परिस्थिती पाहता, या परिसरात अतिरिक्त पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. तसेच पोलिसांकडून परिस्थिती नियंत्रणात आणण्याचे प्रयत्न केले जात आहे. या घटनेनंतर नागरिकांनी तीव्र प्रतिक्रिया दिल्या असून, परिसरात तणावपूर्ण परिस्थिती असल्याचे म्हटले जात आहे.

दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच स्थानिक परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी आणि घटनेची माहिती घेण्यासाठी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर हे पायधुनी पोलीस ठाण्यात पोहोचले होते. परंतु, संतापलेल्या नागरिकांनी आणि नातेवाईकांनी राहुल नार्वेकर यांना घेराव घातला होता, असे सांगितले जात आहे. मुंबईसारख्या सुरक्षित मानल्या जाणाऱ्या शहरात सातत्याने महिला आणि अल्पवयीन मुलींवर होणाऱ्या अत्याचाराच्या घटनांमुळे नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. पोलीस पुढील तपास करत आहेत.

## भिवंडीत ऑइलच्या गोदामाला

आगीची तीव्रता एवढी जास्त होती की, गोदामातून निघणाऱ्या धुराचे लोट कित्येक किलोमीटर अंतरावरून स्पष्ट दिसत होते.

आगीच्या घटनेची गांभीर्य लक्षात घेऊन निजामपूर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे पथक घटनास्थळी पोहोचले आहे. त्यांनी कायदा व सुव्यवस्थेसह मदतकार्याची पाहणी केली. ही आग नेमकी कशामुळे लागली, शॉर्ट सर्किटमुळे की इतर काही कारणाने याचा शोध पोलिसांकडून घेतला जात आहे.

## बसला भीषण आग; रिक्षाचालकाच्या

बसमध्ये उपलब्ध असलेल्या अग्निशामक यंत्राच्या सहाय्याने बसचालकाने आग विझविण्याचा प्रयत्न केला. मात्र, आग वेगाने पसरल्याने त्याचा काहीही उपयोग झाला नाही. काही मिनिटांतच संपूर्ण बस आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. घटनेनंतर परिसरात धुराचे मोठे लोट पसरल्याने नागरिकांमध्ये एकच खळबळ उडाली.

## 'एल निनो' चा प्रभाव वाढणार?

सक्रिय होऊन कोकण प्रदेशासह मध्य महाराष्ट्रात अतिवृष्टी सदृश्य पाऊस झाला. मात्र, राज्यातील मराठवाडा, मध्य महाराष्ट्रातील बहुतांश जिल्हे आणि विदर्भातील काही भागात आतापर्यंत सरासरीहून कमी पाऊस झाला आहे. त्यामुळे राज्यातील निम्मा भाग सध्या दुष्काळाच्या सावटाखाली आहे. आतापर्यंतच्या हंगामात १ जून पाऊस संपूर्ण राज्यात जरी सरासरीच्या आसपास पावसाची नोंद झाली असली तरीही बहुतांश जिल्ह्यात शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या पावसाचा अभाव दिसून येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या समस्यांमध्ये वाढ होत आहे. दरम्यान. तमिळनाडू वगळता दक्षिणेकडील अनेक राज्यात सरासरी पावसाचे प्रणाम कमी असल्याचे दिसून येत आहे.

## व्हिएतनाम दुर्घटनेत १५ भारतीयांचा

कुमक बोलावण्यात आली. तसेच, पीडितांना किनाऱ्यावर नेण्यासाठी जेट स्कीचा वापर करण्यात आला. हनोई येथील भारतीय दूतावासाने दिलेलेल्या माहितीनुसार, मृत्यू पावलेल्या १५ भारतीय पर्यटकांचे मृतदेह हो ची मिन्ह सिटी येथे नेण्यात आले आहेत. त्यांन भारतात पाठवण्यात येईल. वाचवण्यात आलेले १७ पैकी १६ पर्यटक भारतात परतत आहेत. तर एका पर्यटक गंभीर असून त्याच्यावर फु क्वोक येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. हा अपघात शनिवारी (११ जुलै २०२६) रुट न्गोई बेटाजवळ झाला होता. अपघातानंतर स्पीडबोट सेवा तात्पुरती स्थगित करण्यात आली आहे.

## 'सुट्टे पैसे नाहीत, बसमधून

सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा प्रत्यक्ष अनुभव घेत सर्वसामान्य प्रवाशांना नेमक्या कोणत्या अडचणी येतात, हे जाणून घेणे हा यामागील हेतू होता. यासाठी बैरथी सुरेश यांनी शनिवारी रात्री बेंगळुरूच्या बसेसमध्ये छुप्या वेषात (अंडरकव्हर) प्रवास केला. एका साध्या प्रवासाने सुरू झालेली ही मोहीम काही वेळातच नाट्यमय वळणावर पोहोचली.

## राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार)

प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी त्यांची प्रदेश सचिवपदी नियुक्ती जाहीर केली असून त्याबाबतचे अधिकृत नियुक्तीपत्र जारी करण्यात आले आहे.

हे नियुक्तीपत्र ज्येष्ठ नेते तथा माजी मंत्री अनिल देशमुख यांच्या हस्ते पक्षाच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत प्रा. डॉ. हेमंत देशमुख यांना प्रदान करण्यात आले. यावेळी बोलताना अनिल देशमुख यांनी सांगितले की, प्रा. डॉ. हेमंत देशमुख यांनी अमरावती शहरात पक्ष संघटना उभारण्यासाठी आणि पक्षवाढीसाठी सातत्याने परिश्रम घेतले आहेत. त्यांच्या नेतृत्वगुणांचा, संघटन कौशल्याचा आणि कार्यकर्त्यांशी असलेल्या समन्वयाचा लाभ आता संपूर्ण राज्यातील पक्ष संघटनेला मिळणार आहे. त्यामुळे प्रदेश सचिव म्हणून त्यांच्यावर सोपविण्यात आलेली जबाबदारी पक्षासाठी निश्चितच मोलाची ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. विश्रामगृह येथे पार पडलेल्या बैठकीला माजी मंत्री अनिल देशमुख यांच्यासह हर्षवर्धन देशमुख, शरद तसरे, गणेश रॉय, अनिल जळमकर, रमेश बंग, भास्कर ठाकरे, राजीव जामठे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी उपस्थित नेत्यांनीही प्रा. डॉ. हेमंत देशमुख यांच्याकडून राज्यभर पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी प्रभावी योगदान मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका तसेच इतर राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर त्यांची नियुक्ती पक्षासाठी महत्त्वपूर्ण मानली जात आहे. प्रा. डॉ. हेमंत देशमुख यांनी नियुक्तीबद्दल पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार, प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, ज्येष्ठ नेते अनिल देशमुख तसेच पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाचे आभार मानले. पक्षाने दाखविलेला विश्वास सार्थ ठरवत राज्यभर संघटना अधिक मजबूत करण्यासाठी प्रामाणिकपणे आणि पूर्ण क्षमतेने कार्य करणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

दरम्यान, प्रा. डॉ. हेमंत देशमुख यांच्या प्रदेश सचिवपदी नियुक्तीबद्दल पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच विविध सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत असून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## अवैध वाळू वाहतूक

ताब्यात घेण्यात आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अंजनगाव सुर्जी पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार परिसरामध्ये पेट्रोलिंग करत होते. दरम्यान, अजिजपुरा सुर्जी भागात एक व्यक्ती आपल्या ताब्यातील ट्रॅक्टरमध्ये बेकायदेशीरपणे वाळूची वाहतूक करत असल्याची खात्रीशीर माहिती गोपनीय बातमीदाराकडून पोलिसांना मिळाली. माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ पंचांसह अजिजपुरा ते वडाळी जाणाऱ्या रोडवर सापळा रचला आणि संशयास्पद ट्रॅक्टर अडवला.पोलिसांनी ट्रॅक्टर थांबवून चालकाची चौकशी केली असता, त्याने आपले नाव जकाउल्ला खान अताउल्ला खान (वय ४७ वर्षे, रा. डब्बीपुरा सुर्जी, अंजनगाव, ता. अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती) असे सांगितले. पोलिसांनी वाहनाची तपासणी केली असता, त्यात 'फार्मट्रॅक ४५' कंपनीचा ट्रॅक्टर (क्र. MH 40 L 7901) आणि ट्रॉली (क्र. MH 27 DA 1294) आढळून आली. ट्रॉलीमध्ये अंदाजे १ ब्रास कन्नान रेती (वाळू) भरलेली होती. चालकाकडे वाळू वाहतुकीच्या परवान्याबाबत विचारणा केली असता, त्याच्याकडे कोणताही वैध परवाना नव्हता. सदर रेती चोरून आणल्याचे स्पष्ट झाल्याने पोलिसांनी १० हजार रुपये किमतीची १ ब्रास रेती आणि ८ लाख रुपये किमतीचा ट्रॅक्टर-ट्रॉली असा एकूण ८,१०,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी पोलिसांनी मुद्देमाल आणि आरोपीला ताब्यात घेतले आहे. आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) च्या कलम ३०३(२), पर्यावरण संरक्षण अधिनियमाचे कलम ९, १५ आणि मोटार वाहन कायद्याच्या (MVA) कलम ३/१८१ अन्वये गुन्हा दाखल करून पुढील कायदेशीर कारवाई सुरू केली आहे. सदर धडक कारवाई अमरावतीचे पोलीस अधीक्षक निकेतन कदम , अप्पर पोलीस अधीक्षक दत्ता तोडेवाड आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सतीश कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली अंजनगाव सुर्जीचे ठाणेदार सूरज बोंडे, पोलीस उपनिरीक्षक (पोउपनी) भारत चिरडे, पोलीस अंमलदार जयसिंग चव्हाण, आकाश रंगारी, रवि राठोड, अमित घाटे आणि शुभम मार्कंड यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

## लोणी चाकू हल्ल्यातील

बसले असताना संबंधित आरोपी तेथे आले. त्यांनी पुन्हा पैशांची मागणी केली. दीपक यांनी पैसे देण्यास नकार दिल्यानंतर दोन्ही बाजूंमध्ये वाद झाला. हा वाद विकोपाला गेल्यानंतर आरोपींनी दीपक यांच्यावर धारदार चाकूने पोट, पाठ व कंबरेवर सपासप वार केले. या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले होते. घटनेनंतर मुख्य आरोपी पवन भाकरे फरार झाला होता. ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने त्याला चपराशीपुरा परिसरातून अटक केली होती. त्यानंतर दीपक टेकन यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू होते. मात्र रविवारी उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. दीपक यांच्या मृत्यूनंतर पोलिसांनी या प्रकरणात खुनाचे कलम वाढविले असून पुढील तपास लोणी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सतीशकुमार खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. आरोपींविरुद्ध पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

## बोगस बियाण्यामुळे नांदगाव

नाही. यासंदर्भात तालुक्यामधून आतापर्यंत १५० चे वर तक्रारी तालुका कृषी विभागाकडे प्राप्त झाल्या. यंदाच्या खरीपात शेतकऱ्यांनी कर्जबाजारी होऊन पुन्हा नवीन उमेदीने सोयाबीनची पेरणी केली परंतु बियाण्याने शेतकऱ्यांचा घात केला असून शेकडो हेक्टर वरील पेरणी वाया गेली असल्याने याचा फटका शेतकऱ्याला बसला असून शेतकऱ्याचे जीवनमान उध्वस्त होण्यास कारणीभूत ठरू पाहत आहे. बोगस बियाणे बाजारात विक्री करता कृषी विभागाकडून परवानगी कशी मिळते हल्ली हा गंभीर प्रश्न उपस्थित होत आहे. काही कृषी केंद्रामधून उघडपणे बोगस बियाण्याची विक्री झाली तरी कृषी विभागाकडून साधी दाखल सुद्धा घेण्यात आली नाही असा शेतकऱ्याकडून आरोप होत आहे. बियाण्याची उगवण झाली नसल्याने बाधित शेतकऱ्यांचा खरीप वाया गेला. या बोगस बियाणामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होऊन सुद्धा संबंधित बियाणे कंपन्यावर प्रभावी कारवाई होत नाही. त्यामुळे अशा प्रकारची वाढ होत असल्याचे दिसून येते. तक्रार पाहणी पंचनाम्या करिता अधिकाऱ्याची विनवणी करून नुकसान भरपाईची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत दुबार पेरणीची वेळ निघून जात असल्यामुळे शेतकरी पुन्हा कर्जबाजारी किंवा उसनवारीची तडजोड करून दुपार पेरणी करून टाकतो आणि शासकीय कार्यालयाचे हेलपाटे घेऊन थकल्याने केलेल्या तक्रारीकडे कालांतराने शेतकऱ्याचे दुर्लक्ष होते . बोगस बियाण्यामुळे पेरणी बुडाल्याने शेतकऱ्याला मोठा आर्थिक फटका सहन करावा लागतो तेव्हा पंचनामा करून नुकसान भरपाई त्वरित देण्यात यावी अशी मागणी जोर धरत आहे.

## पोलिस कर्मचाऱ्यालाच पडला

आढळून आले. याच दरम्यान कर्तव्यावर असलेल्या कर्मचाऱ्यांच्या ही बाब लक्षात येताच त्या पोलिस कर्मचाऱ्यांला थांबवून वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी कारवाई करुन दोन हजार रुपयाचा दंड आकारण्यात आला. दर्यापूर शहरात सध्या वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या विरोधात मोहीम सुरु केली आहे.

वाहतुकीचे नियम हे सर्वांसाठी सारखेच आहेत. आमच्याच एका कर्मचाऱ्याने वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याने त्याच्यावर कारवाई करुन त्यांना दोन हजार रुपयांचा दंड ठोठाविण्यात आला आहे. कुणीही वाहतूक नियमाचे उल्लंघन करु नये.

-अजित राठोड -ठाणेदार, दर्यापूर

## चांदुर रेल्वे तालुक्यात

करून तालुका स्तरीय समिती समोर ठेऊन अहवाल तयार करण्यात येईल. त्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याचे तालुका कृषी अधिकारी यांनी सांगितले.

## अंजनगाव पोलिसांची अवैध

मोटारसायकल असा एकूण ९५,००० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ११ जुलै २०२६ रोजी अंजनगाव सुर्जी पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी पोलीस अधीक्षकांच्या आदेशान्वये अवैध धंद्यांवर कारवाई करण्यासाठी गस्त घालत होते. यादरम्यान, दोन इसम सातेगाव कडून अंजनगाव सुर्जीकडे मोटारसायकलने अवैध देशी दारू विक्रीच्या उद्देशाने घेऊन जात असल्याची खात्रीशीर गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी सातेगाव ते अंजनगाव सुर्जी रोडवरील सातेगाव नाक्याच्या बाजूला तत्परतेने सापळा रचला. संशयित मोटारसायकल येताच पोलिसांनी ती अडवून दोन्ही इसमांना ताब्यात घेतले. त्यांची विचारपूस केली असता त्यांनी आपली नावे निखिल गजानन वानखडे (वय २२ वर्षे, रा. ग्राम बोर्डी, ता. अकोट, जि. अकोला), प्रदीप शेषराव वाकोडे (वय २४ वर्षे, रा. ग्राम बोर्डी, ता. अकोट, जि. अकोला) अशी सांगीतली. त्यांच्या ताब्यातून ९५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. पोलिसांनी मोटारसायकलवर ठेवलेल्या प्लास्टिक पोत्याची तपासणी केली असता, त्यात 'टँगो पंच' कंपनीच्या देशी दारूचे ९० एम.एल. चे २०० नग सिलबंद पावे आढळून आले. या दारूची एकूण किंमत १०,००० रुपये आहे. तसेच दारूची वाहतूक करण्यासाठी वापरलेली ८५,००० रुपये किमतीची काळ्या रंगाची होंडा कंपनीची HF DULUX मोटारसायकल (MH30BK4630) देखील पोलिसांनी जप्त केली. पोलिसांनी एकूण ९५,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून दोन्ही आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये कलम ६५ (अ) (ई) नुसार गुन्हा दाखल केला आहे.सदर कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम , अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोडेवाड , आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सतीश कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनात अंजनगाव सुर्जीचे ठाणेदार सुरज बोंडे, पोलीस उपनिरीक्षक भारत चिरडे, पोलीस अंमलदार जयसिंग चव्हाण, आकाश रंगेरी, रवि राठोड, अमित घाटे आणि शुभम मारकंड यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

## अंजनगाव सुर्जी न.प.

आशा पालकांनी व्यक्त केली आहे. याबाबत पालकांनी नगरपरिषद शिक्षण प्रशासनाचे व नगराध्यक्ष अविनाश गायगोले यांचे आभार मानले आहेत.'शाळेचा शिक्षणाचा दर्जा उंचावणे हे आमचे प्राधान्य आहे. रिक्त पदांमुळे मुलांचे नुकसान होऊ नये यासाठी आम्ही प्रयत्न केले. उर्वरित पदेही लवकरच भरण्यासाठी पाठपुरावा सुरू आहे,'तर या रिक्त पदे भरण्यासाठी आम्हाला वेळोवेळी शिक्षक आमदार ज.मो. अभ्यंकर यांचे मार्गदर्शन लाभले असल्याचे नगराध्यक्ष अविनाश गायगोले यांनी सांगितले. नवीन शिक्षकांच्या नियुक्तीमुळे अंजनगाव सुर्जी नगरपरिषद उर्दू माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला असून, येत्या काळात शाळेच्या निकालात सुधारणा होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा
■ सोमवार, १३ जुलै २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# कोट्यवधींच्या बायोमायनिंग प्रकरणाने अकोट हादरले

## वृत्तमालिकेनंतर नगर परिषदेत धावपळ? २.०७ कोटींच्या प्रकल्पावर संशयाचे सावट अधिक गडद

■ अॅड. समीर ठाकूर ■

**अकोट :** अकोट : अकोट नगर परिषदेच्या तब्बल २ कोटी ७ लाख रुपयांच्या बायोमायनिंग प्रकल्पावर उपस्थित झालेल्या प्रश्नांनी आता केवळ प्रशासकीय नव्हे तर राजकीय वर्तुळातही खळबळ उडवली आहे. या प्रकरणावरील वृत्तमालिकेनंतर नगर परिषदेत हालचालींना वेग आल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून समोर येत असून, विविध कागदपत्रांची जुळवाजुळव, नोंदींची पडताळणी आणि संभाव्य चौकशीच्या पार्श्वभूमीवर अंतर्गत सावरासावर सुरू असल्याची चर्चा रंगली आहे. मात्र, या चर्चेला संबंधितांकडून अद्याप कोणतीही अधिकृत पुष्टी मिळालेली नाही.


संग्रहित छायाचित्र

- ■ कागदपत्रांची जुळवाजुळव सुरू असल्याची चर्चा
- ■ अधिकारी-कंत्राटदारांमध्ये अस्वस्थता
- ■ सोमवारी तक्रारींचा 'बिगुल' वाजण्याची शक्यता

यापूर्वी प्रसिद्ध झालेल्या वृत्तांमधून बायोमायनिंग प्रकल्पाच्या मूळ आधारावरच प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले होते. डम्पिंग ग्राऊंडवर प्रत्यक्षात लेगसी वेस्ट होता का? मेट्रिक टन मोजणी कोणत्या अधिकृत सर्वेक्षणावर आधारित होती? आरडीएफ(लिंअेग्न् इलत) नेमका कुठे गेला? बायो-कल्चरचा वापर झाला का? प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आवश्यक परवानग्या घेण्यात आल्या होत्या का? कामाचे मोजमाप, तृतीय पक्ष तपासणी आणि देयक मंजुरी कोणत्या कागदपत्रांच्या आधारे झाली? अशा प्रश्नांची मालिका समोर आली. या प्रश्नांवर संबंधित यंत्रणांकडून अद्याप ठोस खुलासा झालेला नसल्याने चर्चांना अधिक उधाण आले आहे.

**लोकप्रतिनिधींचे मौनही चर्चेचा विषय**

या संपूर्ण प्रकरणात आणखी एक बाब प्रकर्षाने समोर येत आहे, ती म्हणजे लोकप्रतिनिधींचे मौन. कोट्यवधी रुपयांच्या सार्वजनिक प्रकल्पावर सातत्याने प्रश्न उपस्थित होत असताना नगर परिषदेच्या नगराध्यक्षा, सत्ताधारी पदाधिकारी तसेच विरोधी पक्षातील नगरसेवक यांनी अद्याप कोणतीही स्पष्ट भूमिका मांडलेली नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये उलटसुलट चर्चांना उधाण आले असून, 'जर सर्व काही नियमानुसार झाले असेल, तर कागदपत्रे जाहीर करण्यात अडचण काय?' असा सवाल आता उघडपणे विचारला जात आहे.

**सोमवार ठरणार 'तक्रारवार'?**

या कथित बायोमायनिंग घोटाळ्याप्रकरणी नगर परिषदेचे काही माजी नगरसेवक आता पुढाकार घेण्याच्या तयारीत असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून मिळाली आहे. विविध शासकीय यंत्रणा, नियंत्रण प्राधिकरणे आणि चौकशी संस्थांकडे लेखी तक्रारी दाखल करण्याची तयारी सुरू असल्याचे समजते. त्यामुळे सोमवार हा या प्रकरणासाठी 'तक्रारवार' ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, प्रस्तावित तक्रारींमध्ये निविदा प्रक्रिया, कचऱ्याचे प्रत्यक्ष प्रमाण, आरडीएफ निर्मिती व विल्हेवाट, बायो-कल्चर खरेदी, प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या परवानग्या, देयक मंजुरी, प्रयोगशाळा अहवाल, मोजमाप पुस्तिका आणि संपूर्ण आर्थिक व्यवहारांची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी केली जाण्याची शक्यता आहे.

**नगर परिषदेपुढे वाढणार आव्हान?**

तक्रारी दाखल झाल्यास संबंधित प्रत्येक कागदपत्राची पडताळणी, शासकीय यंत्रणांना माहिती उपलब्ध करून देणे आणि सर्व प्रक्रिया नियमांनुसार झाल्याचे सिद्ध करणे, हे नगर परिषदेसाठी मोठे आव्हान ठरू शकते, अशी चर्चा प्रशासकीय वर्तुळात सुरू आहे. सार्वजनिक निधीतून राबविण्यात आलेल्या प्रकल्पात पारदर्शकता हा मूलभूत निकष असल्याने संबंधित कागदपत्रे आणि नोंदी जाहीर करण्याची मागणीही अधिक तीव्र होत आहे.

**नागरिक म्हणतात... 'उत्तर द्या, संशय दूर करा'**

**नागरिकांनी पुढील मुद्यांवर तातडीने खुलासा करण्याची मागणी केली आहे.**

- डम्पिंग ग्राऊंडवरील अधिकृत मेट्रिक टन मोजणी अहवाल जाहीर करावा.
- निविदा, कार्यादेश आणि कंत्राटाची संपूर्ण प्रत सार्वजनिक करावी.
- आरडीएफ स्वीकारणाऱ्या कंपनीचे नाव आणि स्वीकार प्रमाणपत्र जाहीर करावे.
- बायो-कल्चर खरेदीची बिले, जीएसटी चलने, ई-वे बिल आणि वाहतूक कागदपत्रे प्रसिद्ध करावीत.
- प्रदूषण नियंत्रण मंडळाचे परवानगी व अनुपालन अहवाल जाहीर करावेत.
- कामाचे मोजमाप, तृतीय पक्ष तपासणी, प्रयोगशाळा अहवाल आणि देयक मंजुरीची संपूर्ण माहिती सार्वजनिक करावी.

**अधिकृत भूमिका अद्याप प्रतीक्षेत**

या प्रकरणातील आरोप, दावे आणि संशयांची कोणत्याही सक्षम चौकशी यंत्रणेने अद्याप पुष्टी केलेली नाही. तसेच नगर परिषद, संबंधित अधिकारी किंवा कंत्राटदार यांची सविस्तर अधिकृत भूमिका देखील अद्याप समोर आलेली नाही. संबंधित पक्षांचे म्हणणे उपलब्ध झाल्यानंतर तेही प्रसिद्ध करण्यात येईल. मात्र, सार्वजनिक निधीतून राबविण्यात आलेल्या प्रकल्पातील पारदर्शकता आणि उत्तरदायित्वाच्या दृष्टीने सर्व संबंधित कागदपत्रे जनतेसमोर आणावीत, अशी मागणी दिवसेंदिवस तीव्र होत आहे.




**'प्रकरण अंगलट येणार'ची चाहूल?**

विश्वसनीय सूत्रांच्या माहितीनुसार, या वृत्तमालिकेनंतर संबंधित अधिकारी आणि कंत्राटदारांमध्ये कमालीची अस्वस्थता निर्माण झाली आहे. भविष्यात या प्रकरणाची चौकशी होण्याची शक्यता लक्षात घेऊन विविध नोंदी, आर्थिक कागदपत्रे, मोजमाप पुस्तिका, बिलांची पडताळणी आणि अन्य तांत्रिक बाबींची जुळवाजुळव सुरू असल्याची चर्चेने जोर धरला आहे.

# १ ऑगस्टपासून NCMC स्मार्ट कार्ड बंधनकारक

- अकोटमध्ये २०० हून अधिक नागरिकांची नोंदणी
- भूमी फाउंडेशनच्या चंचल पितांबरवाले यांचा अभिनव उपक्रम



■ प्रतिनिधी | अकोट ■

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एमएसआरटीसी) निर्णयानुसार १ ऑगस्ट २०२६ पासून महिला, ज्येष्ठ नागरिक आणि अमृत ज्येष्ठ नागरिकांना एसटी प्रवासातील मोफत अथवा सवलतीच्या तिकिटाचा लाभ घेण्यासाठी NCMC (नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड) स्मार्ट कार्ड बंधनकारक करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर अकोट येथे भव्य ञ्शण स्मार्ट कार्ड नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून २०० हून अधिक लाभार्थ्यांनी नोंदणी करून याचा लाभ घेतला.

भूमी फाऊंडेशनच्या अध्यक्षा तथा सामाजिक कार्यकर्त्या कु. चंचल पितांबरवाले यांच्या पुढाकाराने हे शिबिर आयोजित करण्यात आले होते. सुमंगल ऑनलाइन सर्व्हिसेस अँड झेरॉक्स सेंटर, बुधवार वेस, सोनू चौक तसेच मातोश्री ई-सेवा केंद्र, बसस्टँड रोड, एचडीएफसी बँकेसमोर या ठिकाणी नोंदणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली.या शिबिरात ञ्शण स्मार्ट कार्डचे महत्त्व आणि त्याचे फायदे नागरिकांना समजावून सांगण्यात आले. या कार्डच्या माध्यमातून एसटी प्रवासातील मोफत व सवलतीच्या प्रवासाचा लाभ मिळणार असून कॅशलेस आणि डिजिटल व्यवहाराची सुविधा उपलब्ध होणार आहे. तसेच देशभरातील विविध सार्वजनिक वाहतूक सेवांमध्ये हे एकच कार्ड वापरता येणार आहे. आयुष्यभरासाठी एकदाच नोंदणी करण्याची सुविधा असल्याने नागरिकांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला.

यावेळी आयोजकांनी महिला, ज्येष्ठ नागरिक आणि अमृत ज्येष्ठ नागरिकांनी १ ऑगस्टपूर्वी NCMC स्मार्ट कार्डची नोंदणी पूर्ण करून एसटी प्रवासातील सवलतींचा अखंड लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

# शेतकऱ्यांसह गुराख्यांचे डोळे आकाशाकडे
## पशुपालकांसमोर जनावरे जगविण्याचे आव्हान

■ प्रतिनिधी | मानोरा ■

वाशिम जिल्ह्यासह मानोरा तालुक्यात गत दोन आठवड्यांपासून पावसाने मोठी ओढ दिल्याने शेतीसोबतच पशुधनावरही संकट कोसळले आहे. पावसाअभावी गायरान, शेतबांध व कुरणे पूर्णपणे कोरडी पडल्याने जनावरांच्या चाऱ्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. परिणामी शेतकरी व गुराख्यांचे डोळे आता आकाशाकडे लागले आहेत.



तालुक्यातील अनेक लहान-मोठे तलाव व बंधारे आटण्याच्या मार्गावर आहेत. पाणी कमी झाल्याने गुराखी जनावरांना घेऊन आटलेल्या तलावांच्या गाळात थांबत आहेत. मात्र तेथेही चारा उपलब्ध नसल्याने गुरे हतबल होऊन बसून आहेत. कारखेडा, वरोली, रामतीर्थ, कार्ली बोरव्हा, सावरगाव, विठोली, बेलोरा गलमगाव, चिखली, सोयजना देवूरवाडी, सावळी, अमरगड, गिरोली, आमदरी परिसरातील चित्र भयावह आहे. पाण्यासाठी मैलोन्मैली भटकावे लागत असून, मिळेल त्या ठिकाणी गुरे पाण्याची तहान भागवत आहेत. 'जून महिन्यात पेरण्या झाल्या, पण नंतर पावसाने पाठ फिरवली. त्यामुळे शेतातही वैरण उगवली नाही. गावातली कुरणे जळून गेली आहेत. बाहेरून चारा विकत घेणे परवडत नाही. कडबा-भुसाचे भावही गगनाला भिडले आहेत. आता ही जनावरे जगवायची कशी?' असा सवाल पशुपालक गणेश हुनासिंग राठोड यांनी उपस्थित केला. दुधाचा व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांसमोरही मोठे संकट उभे आहे. चाऱ्याअभावी गुरांची दूध देण्याची क्षमता घटली असून, त्याचा थेट परिणाम कुटुंबाच्या आर्थिक गणितावर होत आहे. शेतकरी नाइलाजाने जनावरे विकण्याच्या तयारीत आहेत.

सध्या रोहिणी नक्षत्र संपून मृग नक्षत्राचा अर्धा कालावधी उलटला तरी पावसाचा पत्ता नाही. हवामान विभागाने पुढील काही दिवसांत पावसाचा अंदाज वर्तवला असला तरी तोपर्यंत जनावरे तग धरतील का, अशी भीती व्यक्त होत आहे.

# पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालयाच्या इयत्ता सहावी प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज सुरू

■ प्रतिनिधी | वाशिम ■

नवोदय विद्यालय समिती, शिक्षण मंत्रालय, भारत सरकार यांच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२७-२८ साठी पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालयाच्या इयत्ता सहावी प्रवेशासाठी होणाऱ्या जवाहर नवोदय विद्यालय निवड परीक्षा (JNVST-2027) साठी ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे. इच्छुक व पात्र विद्यार्थ्यांनी ३१ जुलै २०२६ पर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.




या प्रवेशासाठी उमेदवार हा वाशिम जिल्ह्याचा कायमस्वरूपी (Bonafide) रहिवासी असावा. तसेच तो शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये मान्यताप्राप्त शाळेत इयत्ता पाचवीत शिक्षण घेत असावा. उमेदवाराचा जन्म १ मे २०१५ ते ३१ जुलै २०१७ (दोन्ही तारखांसह) या कालावधीत झालेला असणे आवश्यक आहे. या निवड परीक्षेचे आयोजन २८ नोव्हेंबर २०२६ रोजी करण्यात येणार असून, अर्जासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. इच्छुक विद्यार्थ्यांनी https://cbseitms.rcil.gov.in/nvs या संकेतस्थळावर ऑनलाइन पद्धतीने अर्ज भरावेत. पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालयामध्ये सीबीएसई अभ्यासक्रमानुसार गुणवत्तापूर्ण निवासी शिक्षण दिले जाते. विद्यार्थ्यांना निवास, भोजन, पाठ्यपुस्तके, गणवेश तसेच इतर शैक्षणिक सुविधा पूर्णपणे मोफत उपलब्ध करून दिल्या जातात. ग्रामीण भागातील गुणवंत विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण व सर्वांगीण विकासाची संधी या विद्यालयातून मिळते.

# 'उन्नती' बियाण्याने शेतकऱ्यांची 'अधोगती'; सोयाबीन उगवलेच नाही

## मानोरा तालुक्यात शेकडो एकरवर दुबार पेरणीचे संकट; कृषी अधिकाऱ्यांनी केली पाहणी

■ प्रतिनिधी | मानोरा ■

खरीप हंगामाच्या सुरुवातीलाच मानोरा तालुक्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना मोठा झटका बसला आहे. 'उन्नती' कंपनीचे महागडे सोयाबीन बियाणे खरेदी करून पेरलेल्या शेकडो एकर शेतात उगवणच झाली नसल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. या गंभीर प्रकाराची दखल घेत तालुका कृषी अधिकारी रोशन भागवत यांच्या नेतृत्वाखालील पथकाने शनिवारी प्रत्यक्ष शेतावर जाऊन पाहणी केली.



**काय घडले?:** तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी यंदा अधिक उत्पादनाच्या आशेने 'उन्नती' कंपनीचे JS-335 वाणाचे सोयाबीन बियाणे खरेदी केले. २८५० रुपये प्रति बॅग प्रमाणे बियाणे विकत घेऊन शेतकऱ्यांनी मशागत, पेरणी व खतांसाठी हजारो रुपये खर्च केले. मात्र पेरणीला १०-१५ दिवस उलटूनही शेतात तुरळक ठिकाणीच उगवण दिसत असून, ८०-९० टक्के शेत रिकामेच आहे.

खापरदरी, गिर्डा, आमदरी, कारखेडा, वरोली व परिसरातील गावांमधून बियाणे न उगवल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणावर येत आहेत. बियाण्याची उगवणक्षमता कमी असल्याचा व बियाणे बोगस असण्याचा संशय शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे.

**कृषी विभागाची पाहणी :** शेतकऱ्यांच्या तक्रारी वाढल्यानंतर तालुका कृषी अधिकारी रोशन भागवत, मंडळ कृषी अधिकारी व संबंधित कृषी सहाय्यक यांनी खापरदरी शिवारातील नुकसानग्रस्त शेतकऱ्याच्या शेताला भेट दिली. यावेळी अधिकाऱ्यांनी शेतातील उगवणीची पाहणी करून शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकून घेतले. पंचनामे करून अहवाल वरिष्ठ कार्यालयास सादर केला जाणार असल्याचे ता.कृ.अ. भागवत यांनी सांगितले.

**शेतकरी दुहेरी संकटात :** पहिल्याच पेरणीवर पाणी सोडावे लागल्याने शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढवले आहे. एकरी ८-१० हजारांचा खर्च वाया गेला असून, आता नवीन बियाणे, मशागत व मजुरीसाठी पुन्हा खर्च करावा लागणार आहे. पावसाने आधीच ओढ दिली असताना बोगस बियाण्यामुळे 'अस्मानी व सुलतानी' अशा दुहेरी संकटात शेतकरी सापडला आहे.

**शेतकऱ्यांची मागणी :** 'उन्नती' कंपनीच्या बियाण्याचे नमुने तातडीने प्रयोगशाळेत तपासून बोगस असल्यास कंपनीवर फसवणुकीचा गुन्हा दाखल करावा. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना बियाणे, खत व मशागतीचा खर्च मिळून प्रति एकरी किमान १५ हजार रुपये नुकसान भरपाई द्यावी. तालुक्यातील सर्व कृषी केंद्रांवर बियाणे साठ्याची तपासणी करून बोगस बियाणे विक्रीला आळा घालावा.




# फडणवीस केंद्रात, बावनकुळे राज्यात?



## संजय राऊतांच्या वक्तव्याने राजकारणात चर्चेला उधाण

**मुंबई-** महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा नेतृत्वबदलाच्या चर्चांना वेग आला आहे. शिवसेना ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी पत्रकार परिषदेत केलेल्या एका वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात नव्या तर्क-वितर्कांना सुरुवात झाली आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या संभाव्य विस्ताराच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केंद्रात मंत्रिपदाची जबाबदारी दिली जाऊ शकते आणि त्यानंतर महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची नियुक्ती होऊ शकते, असा दावा राऊत यांनी केला. त्याचवेळी, 'एकनाथ शिंदे यांना पुन्हा मुख्यमंत्री होण्याची कोणतीही संधी नाही,' असे त्यांनी सांगितले.

राऊत यांच्या या वक्तव्यानंतर राज्याच्या राजकारणात नेतृत्वबदलाच्या चर्चांना नव्याने उधाण आले आहे. गेल्या काही दिवसांपासून केंद्रीय मंत्रिमंडळ विस्ताराची चर्चा सुरू आहे. काही राज्यांतील नेतृत्वातही बदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातही विविध राजकीय अंदाज व्यक्त केले जात आहेत. सत्ताधारी महायुतीकडून या चर्चांवर कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे किंवा भाजपकडून चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नावाबाबत कोणतीही अधिकृत भूमिका जाहीर करण्यात आलेली नाही. बावनकुळे यांनी मात्र फडणवीस २०३४ पर्यंत मुख्यमंत्री राहतील असे म्हटले आहे. त्यामुळे सध्या या चर्चा केवळ राजकीय दावे आणि प्रतिदावे यांच्या पातळीवरच आहेत.

केंद्रातील मंत्रिमंडळ विस्तार झाल्यानंतरच अशा चर्चांना अधिक स्पष्ट दिशा मिळू शकते. भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाचे निर्णय आणि महायुतीतील राजकीय समन्वय यावर पुढील घडामोडी अवलंबून असतील.

संजय राऊत यांच्या वक्तव्यामागे राजकीय संदेश दडलेला असल्याचीही चर्चा आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे केंद्रात मंत्री म्हणून जातील आणि त्यांची जागा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे घेतील अशी राजकीय गुगली राऊत यांनी टाकली आहे. महायुतीतील नेतृत्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत विरोधकांनी सत्ताधाऱ्यांवर राजकीय दबाव वाढवण्याचा प्रयत्न केला आहे. फडणवीस हे भविष्यात पंतप्रधान पदाचे उमेदवार असल्याची चर्चा सुरू झाली आहे. महायुतीचे नेते मात्र नेतृत्वबदलाच्या चर्चांना फारसे महत्त्व देताना दिसत नाहीत.

आगामी काळात केंद्रीय मंत्रिमंडळ विस्तार कधी होतो, त्यामध्ये महाराष्ट्राला किती प्रतिनिधित्व मिळते आणि त्यानंतर राज्याच्या नेतृत्वात खरोखरच बदल होतो की नाही, याकडे राज्याच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. तोपर्यंत राऊत यांच्या वक्तव्यामुळे सुरू झालेल्या चर्चाच महाराष्ट्राच्या राजकारणाचा प्रमुख विषय ठरण्याची शक्यता आहे.

# संक्षिप्त

## चार हजार सायकल वारकरी पंढरीत


**पंढरपूर-** महाराष्ट्रासह कर्नाटक येथून सायकलवर आलेल्या हजारो वारकऱ्यांनी आषाढी एकादशी पूर्वीच पंढरी नगरी हरी नामाच्या जयघोषाने दुमदुमून टाकली.



चंद्रभागेचे स्नान, नामदेव पायरीचे दर्शन आणि रिंगण सोहळा पूर्ण करुन या सायकलिष्टनी आपली वारी पोहचती केली. निवृत्त आयपीएस पोलीस अधिकारी हरीश बैजल यांच्या संकल्पनेतून नाशिक ते पंढरपूर अशी पहिली सायकल वारी सुरु झाली होती. गेल्या दहा वर्षांत या सायकल वारीमध्ये कर्नाटकसह महाराष्ट्राच्या विविध भागातून सायकलिष्ट मोठ्या उत्साहाने या वारीत सहभागी होत आहे. भारतीय क्रीडा प्राधिकरणचे संचालक पांडुरंग चाटे व आषाढी पंढरपूर सायकलवारी असोसिएशनचे अध्यक्ष उमेश परिचारक यांनी सायकल दिंडीचे स्वागत केले. वृक्ष लागवड, बेटी बचाव, व्यसनमुक्ती आणि पर्यावरणाचा संदेश देत ही सायकल वारी पंढरीची वाट धरत असते. इंडिया या राष्ट्रीय कार्यक्रम अंतर्गत या दिंडीमध्ये सायकल सारख्या व्यायामाचे महत्व पटवून देण्यात आले. जीवनशैलीबाबत जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता. सायकलिंग हा आरोग्यदायी, पर्यावरणपूरक व किफायतशीर वाहतुकीचा पर्याय असून नियमित सायकल वापरामुळे शारीरिक तंदुरुस्ती राखण्यास मदत होते, असा संदेश या वेळी देण्यात आला. राज्यातील कानाकोपऱ्यातून आलेल्या सायकल स्वारांमुळे आज पंढरी नगरी वेगळ्याच आध्यात्मिक वातावरणात सामावून गेलेली पहायला मिळाली.

## बंगालच्या उपसागरात ४.५ रिश्टर स्केलचा भूकंप

**मुंबई-** बंगालच्या उपसागरात रविवारी सकाळी भूकंप झाला. आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणममध्ये भूकंपाचे धक्के जाणवले.



भूकंपाच्या धक्क्याने विशाखापट्टण ममधील रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण होते. इंडियन नॅशनल सेंटर फॉर ओशन इन्फॉर्मेशन सर्व्हिसेसनुसार, बंगालच्या उपसागरात ४.५ तीव्रतेच्या भूकंपाची नोंद झाली आहे. न्यूज १८ ने दिलेल्या वृत्तानुसार, हिंदुस्थानी प्रमाण वेळेनुसार, सकाळी ५ वाजून५ मिनिटांनी भूकंपाचे धक्के जाणवले. भूकंपाचे केंद्र बंगालच्या उपसागरात काकीनाडा किनाऱ्यापासून सुमारे २२५ किलोमीटर अंतरावर १० किलोमीटर खोलीवर होते. सुदैवाने, यात कोणतीही हानी झाल्याचे वृत्त नाही. शहरातील कोणत्याही मालमत्तेचे नुकसान झाले नाही, मात्र रहिवाशांमध्ये घबराट पसरली नाही.

## लोणावळा- कर्जत घाटातील रेल्वे विस्कळीत

**मुंबई-** लोणावळा-कर्जत घाट विभागात ६ जुलै रोजी झालेल्या मुसळधार पावसानंतर अनेक ठिकाणी दरडी कोसळल्याने रेल्वे वाहतुकीवर परिणाम झाला आहे.




दुरुस्त करण्यात आलेल्या एका मार्गावरूनच सध्या रेल्वे वाहतूक सुरू असून उर्वरित मार्गिका पूर्ववत करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. या पार्श्वभूमीवर मध्य रेल्वेने ११ ते १७ जुलै या कालावधीत अनेक लांब पल्ल्याच्या गाड्यांचे मार्ग बदलण्यासह काही रेल्वेगाड्या अंशत: रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे.

## देशातील पहिली हायड्रोजन ट्रेन सज्ज

**नवी दिल्ली-** भारतीय रेल्वे लवकरच देशातील पहिली हायड्रोजन ट्रेन सुरू करणार आहे. इतिहासात पहिल्यांदाच देशात हायड्रोजन या इंधनावर चालणारी ट्रेन सुरू होणार असून स्वच्छ आणि हरित पर्यायांचा वापर होणार आहे. जिंद हरियाणा येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते १७ जुलै रोजी या ट्रेनला हिरवा कंदील दाखवण्यात येणार आहे. उत्तर रेल्वेच्या जिंद-सोनीपत मार्गावर हायड्रोजन ट्रोन धावणार आहे. भारतीय रेल्वेच्या नव्या पिढीची सुरुवात या ट्रेनसह होणार हे. डिझेल, कोळसा किंवा वीज या सर्व पर्यायांसह आणखी एक पर्याय उपलब्ध झाला आहे. मे महिन्या रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या हस्ते या प्रकल्पाला मंजुरी मिळाली होती.

# उत्तराखंडमध्ये मुसळधार पावसाचा कहर



## दरड कोसळल्याने केदारनाथ महामार्ग बंद, चारधाम यात्रेवर परिणाम

**उत्तराखंड-** उत्तराखंडमधील रुद्रप्रयाग जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून चारधाम यात्रेवरही त्याचा परिणाम झाला आहे.

सोनप्रयागजवळील मुनकटिया परिसरात दरड कोसळल्याने केदारनाथ महामार्ग तात्पुरता बंद झाला आहे. महामार्गावरील माती आणि दगडांचा ढिगारा हटवण्यासाठी प्रशासनाने जेसीबीसह अन्य यंत्रसामग्री तैनात केली असून रस्ता वाहतुकीसाठी लवकरात लवकर खुला करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. रुद्रप्रयाग जिल्हा आपत्ती नियंत्रण कक्षाकडून परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवले जात आहे. तसेच संवेदनशील ठिकाणी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना २४ तास सतर्क राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. दरम्यान, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी (ॾॾॾ) नंदन सिंह राजवार यांनी केदारनाथ यात्रा सुरळीत सुरू असल्याचे सांगितले. मुनकटिया परिसरातील रस्ता बंद असला तरी जेसीबीच्या सहाय्याने तो लवकरच वाहतुकीसाठी खुला करण्यात येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यात्रा मार्गावर सेक्टर अधिकारी, कर्मचारी आणि बचाव पथके सतत गस्त घालत असून कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास भाविकांना तातडीने मदत करण्यासाठी ते सज्ज असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकाऱ्यांनी यात्रेच्या व्यवस्थापनाची जबाबदारी असलेल्या सर्व अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना अधिक सतर्क राहण्याचे आदेश दिले आहेत. मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने भाविक आणि स्थानिक नागरिकांना विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे. अतिवृष्टीच्या काळात सुरक्षित ठिकाणी राहावे, अनावश्यक प्रवास टाळावा आणि प्रशासनाने जारी केलेल्या सूचना व इशाऱ्यांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### पुढील ५ दिवस पावसाची विश्रांती

नागपूर-राज्यभरात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या पावसाचा जोर आता कमी होण्याची शक्यता असून, पुढील चार ते पाच दिवस महाराष्ट्रात पावसाला विश्रांती मिळणार असल्याचा अंदाज नागपूर प्रादेशिक हवामान विभागाने व्यक्त केला आहे. बंगालच्या उपसागरात सध्या कोणताही कमी दाबाचा पट्टा तयार होण्याची चिन्हे नसल्याने राज्यात व्यापक स्वरूपाच्या पावसाची शक्यता कमी असल्याचे हवामान विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. प्रवीण कुमार यांनी सांगितले.

# विधान परिषदेत विरोधकांचा आवाज आणखी क्षीण



**मुंबई-** महाराष्ट्र विधान परिषदेतील पाच सदस्यांचा कार्यकाळ डिसेंबर मध्ये संपणार असला तरी त्यांना पावसाळी अधिवेशनात निरोप देण्यात आला हिवाळी अधिवेशनाच्या एक दिवस अगोदर हा कार्यकाळ संपत आहे. हिवाळी अधिवेशनात सभागृहातील राजकीय समीकरणे आणखी एकतर्फी झाल्याचे चित्र दिसणार आहे. वरिष्ठ सभागृह म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विधान परिषदेत आता सत्ताधारी महायुतीचे संख्याबळ भक्कम असताना, विरोधी महाविकास आघाडीचा आवाज दिवसेंदिवस कमकुवत होत असल्याची चर्चा सुरू आहे.

सध्या विधान परिषदेच्या ७८ जागांपैकी ५ राज्यपाल नियुक्त जागा रिक्त असून ७३ सदस्य कार्यरत आहेत. त्यापैकी भाजपचे ३५, शिवसेना शिंदे पक्षाचे १२ आणि अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ८ असे मिळून महायुतीकडे तब्बल ५५ सदस्यांचे संख्याबळ आहे. दुसरीकडे काँग्रेसचे ६, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरचे ५ आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे ४ असे मिळून महाविकास आघाडीकडे केवळ १५ सदस्य आहेत.

काँग्रेसचे आमदार अभिजीत वंजारी यांच्या कार्यकाळाची समाप्ती हा विरोधी पक्षासाठी मोठा धक्का मानला जात आहे. राज्यातील विविध महत्त्वाच्या प्रश्नांवर सरकारला सातत्याने धारेवर धरणारे आणि अभ्यासपूर्ण मांडणी करणारे सदस्य म्हणून त्यांची ओळख होती. काही दिवसांपूर्वी सचिन अहिर यांनी शिवसेना शिंदे पक्षात प्रवेश केल्यानंतर विरोधी पक्षाची ताकद आधीच कमी झाली होती. त्यात आता अभिजीत वंजारी यांच्या निवृत्तीमुळे विरोधी फळी आणखी कमकुवत झाल्याचे चित्र आहे.

सध्या विधान परिषदेत विरोधी पक्षाची भूमिका प्रभावीपणे मांडणाऱ्या सदस्यांमध्ये माजी विरोधी पक्षनेते ठाकरे पक्षाचे आमदार अंबादास दानवे, अनिल परब आणि काँग्रेसचे सतेज पाटील यांचीच नावे प्रामुख्याने घेतली जात आहेत.

याउलट सत्ताधारी बाजूने प्रवीण दरेकर, प्रसाद लाड, नीलम गोरे, मनीषा कायंदे, यांच्यासह अनेक सदस्य सरकारची भूमिका आक्रमकपणे आणि प्रभावीपणे मांडताना दिसतात.

विधान परिषद ही राज्याचे वरिष्ठ सभागृह मानले जाते. शासनाच्या धोरणांवर सखोल चर्चा, निर्णयांची चिकित्सा आणि लोकहिताचे प्रश्न ठामपणे मांडण्याची जबाबदारी या सभागृहावर असते.

# ओमानच्या किनाऱ्याजवळ हिंदुस्थानी खलाशांच्या जहाजावर हल्ला

## एक बेपत्ता, १० जणांना वाचवले

**नवी दिल्ली-** ओमानच्या किनाऱ्या जवळ हिंदुस्थानी खलाशी असलेल्या 'जीएफएस गॅलेक्सी' या व्यापारी जहाजावर रविवारी हल्ला झाला. या जहाजावर ११ खलाशी होते. जहाजावरील ११ हिंदुस्थानी खलाशी होते. हल्ला झाल्यानंतर तात्काळ मदत आणि बचावकार्य सुरू करण्यात आले. जहाजावरील ११ पैकी १० हिंदुस्थानी नागरिकांना वाचवण्यात आले आहे, तर एक अद्याप बेपत्ता आहे.

आज तकने दिलेल्या वृत्तानुसार, ओमानमधील हिंदुस्थानी दूतावास परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. शोध व बचाव कार्यात ओमानच्या अधिकाऱ्यांशी समन्वय साधत आहेत. या संकटाच्या काळात केलेल्या मदतीबद्दल हिंदुस्थानने ओमानच्या अधिकाऱ्यांचे आभार मानले आहेत. परराष्ट्र मंत्रालयाने या प्रदेशात व्यापारी जहाजांवरील हल्ल्यांच्या वाढत्या घटनांबद्दल तीव्र खेद आणि चिंता व्यक्त केली आहे. या प्रदेशात व्यापारी जहाजे आणि नागरी पायाभूत सुविधांना लक्ष्य करण्याचे प्रकार थांबलेच पाहिजेत, अशी ठाम भूमिका हिंदुस्थानने मांडली आहे. आंतरराष्ट्रीय कायद्याच्या तत्त्वांनुसार, या प्रदेशातील सर्व आंतरराष्ट्रीय जलमार्गांमध्ये मुक्त आणि निर्बाध नौकानयन व व्यापारी व्यवहार लवकरात लवकर पूर्ववत केले पाहिजेत, जेणेकरून जागतिक व्यापाराचा सुरक्षित प्रवाह सुनिश्चित होईल.

# शक्तिपीठविरोधात शेतकऱ्यांची सद्बुद्धी पायी यात्रा



## शेतकरी नेते शेट्टी यांच्या उपस्थितीत वाखरी ते पंढरपूर निघणार पायी यात्रा

**मुंबई-** महाराष्ट्र शासनाने प्रस्तावित केलेल्या नागपूर-गोवा शाक्तिपीठ महामार्गामुळे राज्यातील सुपीक शेतजमीन, बागायती क्षेत्र आणि शेतकऱ्यांची घरे उद्ध्वस्त होणार आहेत. या विनाशकारी महामार्गाला राज्यातील शेतकऱ्यांचा तीव्र विरोध आहे. हा प्रकल्प पूर्णपणे रद्द करावा, या मागणीसाठी आता आंदोलनाच्या पुढील टप्प्यात आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर, राज्यातील १३ जिल्ह्यातील बाधित शेतकरी एकत्र आले आहेत. १८ जुलै रोजी पंढरपूर येथील ऐतिहासिक वाखरी पालखी तळ येथे सकाळी ११ वाजता शेतकऱ्यांची जाहीर सभा होणार आहे. या सभेनंतर वाखरी ते पंढरपूर अशी शेतकऱ्यांची पायी सद्बुद्धा यात्रा काढण्यात येणार असल्याची माहिती शक्तिपीठ विरोधी कृती समितीच्या वतीने माजी खासदार राजू शेट्टी यांनी दिली.

आषाढी एकादशीच्या शासकीय महापूजेसाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे पंढरपुरात येणार आहेत. या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर, राज्यातील १३ जिल्ह्यातील शेतकरी पंढरपुरात विठ्ठल चरणी एकत्र येत आहेत. शेतकऱ्यांची सोन्यासारखी सुपीक जमीन हिरावून घेणारा हा शाक्तिपीठ महामार्ग राज्य सरकारने त्वरित रद्द करावा आणि मुख्यमंत्री महोदयांना हा विनाशकारी प्रकल्प रद्द करण्याची सुबुद्धी पांडुरंगाने द्यावी, अशी सामूहिक मागणी आणि प्रार्थना या सद्बुद्धी यात्रेच्या माध्यमातून शेतकरी विठुरायाकडे करणार आहेत. यापूर्वीही या १३ जिल्ह्यात विविध पातळ्यांवर मोर्चे, धरणे आंदोलने आणि ग्रामसभांमध्ये तसेच जिल्हा परिषद, नगरपालिकांमध्ये महामार्गा विरोधात ठराव मंजूर करण्यात आले आहेत. मात्र, सरकारने अद्याप हा प्रकल्प अधिकृतपणे आणि पूर्णपणे रद्द करण्याची घोषणा केलेली नाही. त्यामुळे आता आंदोलनाची धार अधिक तीव्र करण्यासाठी आषाढी वारीत शेतकऱ्यांनी 'पांडुरंग 'चरणी न्याय मागण्याचे ठरवले आहे. १८ जुलै रोजी वाखरी येथील सभेत आंदोलनाची पुढील दिशा आणि तीव्र आंदोलनाचा इशारा दिला जाणार आहे.

या सद्बुद्धी यात्रेस राष्ट्रवादीचे नेते आमदार जयंत पाटील, विधान परिषदेचे गटनेते सतेज ऊर्फ बंटी पाटील, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, खासदार प्रणिती शिंदे, महादेव जानकर, आमदार कैलास पाटील, कॉम्रेड गिरीश फोंडे यांच्यासह वरील सर्व जिल्ह्यातील शक्तिपीठ विरोधी विविध पक्षांचे आमदार, खासदार उपस्थित राहणार आहेत. हा लढा केवळ जमीन वाचवण्याचा नसून शेतकऱ्यांचे अस्तित्व, संस्कृती आणि रोजगार वाचवण्याचा आहे. त्यामुळे शक्तिपीठ महामार्ग बाधित १३ जिल्ह्यातील सर्व शेतकरी, कष्टकरी, महिला आणि तरुण शेतकऱ्यांनी वाखरी (पंढरपूर) येथे मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन शेट्टी यांनी केले आहे.

शक्तिपीठ महामार्गामुळे नागपूर, वर्धा, यवतमाळ, हिंगोली, नांदेड, परभणी, बीड, लातूर, धाराशिव, सोलापूर, सांगली, सातारा, कोल्हापूर आणि सिंधुदुर्ग या १३ जिल्ह्यातील हजारो हेक्टर शेतजमीन संपादित केली जाणार आहे. यामुळे पिढ्यान्पिढ्या शेती करणाऱ्या लाखो शेतकऱ्यांवर भूमिहीन होण्याची वेळ आली आहे. या महामार्गाची कोणतीही आवश्यकता नसताना देवेंद्र फडणवीस ५० हजार कोटींचा ढपला पाडण्यासाठी व केवळ कंत्राटदार आणि भांडवलदारांच्या फायद्या साठी हा प्रकल्प शेतकऱ्यांवर लादत असल्याचा आरोप राजू शेट्टी यांनी केला.

# महाराष्ट्रातील हजारो शाळांमध्ये वीज, इंटरनेट, स्वच्छतागृहे आणि मूलभूत सुविधांचा अभाव



## केंद्र सरकारच्या अहवालातून धक्कादायक माहिती

**मुंबई-** राज्यातील शिक्षण व्यवस्थेचे वास्तव पुन्हा एकदा समोर आले आहे. केंद्र सरकारच्या शिक्षण मंत्रालयाने प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार, महाराष्ट्रातील हजारो शाळांमध्ये आजही वीज, इंटरनेट, कार्यरत स्वच्छतागृहे, खेळाची मैदाने आणि दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध नाहीत. शिक्षणाचा विस्तार झाला असला, तरी शाळांमधील मूलभूत पायाभूत सुविधांची कमतरता कायम असल्याचे या अहवालातून समोर आले आहे. हिंदुस्थान टाइम्सने याबाबत वृत्त दिले आहे.

अहवालानुसार, राज्यात एकूण १०८,१३९ शाळा असून त्यामध्ये २१,६३२,६६९ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. यापैकी ११,१६२,४५७ विद्यार्थी, तर १०,४७०,२१२ विद्यार्थिनी आहेत.

राज्यात एकूण ७५०,२७२ शिक्षक कार्यरत असून, सरासरी प्रत्येक शाळेत सुमारे २०० विद्यार्थी आणि सात शिक्षक आहेत.

दिव्यांग विद्यार्थ्यांच्या दृष्टीने परिस्थिती अधिक चिंताजनक आहे. राज्यातील ३२,२२८ शाळांमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह नाही. तसेच १६,३४१ शाळांमध्ये हँडरेलसह रॅम्प नसल्याने शारीरिक अडचणी असलेल्या विद्यार्थ्यांना शाळेत ये-जा करताना अनेक अडथळ्यांना सामोरे जावे लागते.

डिजिटल शिक्षणासाठी आवश्यक सुविधा देखील अनेक ठिकाणी अपुऱ्या आहेत. ९०,४१९ शाळांमध्ये संगणक सुविधा असली, तरी त्यापैकी केवळ ८४,५३० शाळांमधील संगणक कार्यरत आहेत. म्हणजेच २३,६०९ शाळांमध्ये वापरण्यायोग्य संगणक उपलब्ध नाहीत. याशिवाय २३,८५५ शाळांमध्ये इंटरनेटची सुविधाच नसल्याने विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणाचा पुरेसा लाभ मिळत नाही.

वीजपुरवठ्याबाबतही समाधान कारक चित्र नाही. राज्यातील ९३,९९९ शाळांमध्ये वीज व्यवस्था सुरळीत आहे. मात्र ३,२०१ शाळांमध्ये वीज जोडणीच नाही, तर १०,९३८ शाळांमध्ये वीज जोडणी असूनही ती कार्यरत नाही.

स्वच्छतागृहांची संख्या पुरेशी असली तरी त्यांची अवस्था अनेक ठिकाणी दयनीय आहे. राज्यातील २,०१९ मुलींची आणि ३,२८० मुलांची स्वच्छतागृहे दुरुस्तीअभावी, पाणीटंचाईमुळे किंवा देखभालीअभावी वापरण्यायोग्य राहिलेली नाहीत.

खेळ आणि वाचनासाठी आवश्यक सुविधांचाही अनेक शाळांमध्ये अभाव आहे. राज्यातील ३,९३२ शाळांना खेळाचे मैदान नाही, तर १,०९९ शाळांमध्ये ग्रंथालय किंवा पुस्तक बँकेची सुविधा उपलब्ध नाही. डिजिटल ग्रंथालयाची सुविधा केवळ १३,५५० शाळांमध्ये असून उर्वरित ९४,५८९ शाळा या सुविधेपासून वंचित आहेत.

पर्यावरणपूरक ऊर्जेचा वापरही मर्यादितच असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. राज्यातील केवळ २३,८२२ शाळांमध्ये सौरऊर्जा प्रकल्प बसविण्यात आले आहेत. उर्वरित ८४,३१७ शाळांनी अद्याप सौरऊर्जेचा अवलंब केलेला नाही. तसेच ६५,५९१ शाळांमध्ये किचन गार्डन आहे, तर ४२,५४८ शाळांमध्ये ही सुविधाही उपलब्ध नाही.

जनमाध्यम
e paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २२६ ■ सोमवार, १३ जुलै २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

# आरोग्य अमृत महोत्सवात नागरिकांना उत्तमोत्तम आरोग्य सेवा द्या - पालकमंत्री डॉ.पंकज भोयर

## जिल्ह्यात २२ जुलै ते ३१ ऑगस्ट दरम्यान आरोग्य अमृत महोत्सव

**वर्धा जनमाध्यम :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जन्मदिनानिमित्त गेल्यावर्षी संपुर्ण जिल्ह्यात मोतीबिंदू विरहित वर्धा अभियान राबविण्यात आले. या अभियानाच्या धर्तीवर यावर्षी सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्य तपासणीसाठी 'आरोग्य अमृत महोत्सव' राबविण्यात येत आहे. जिल्हा प्रशासनाने या अभियानाचे उत्तम नियोजन करावे. जास्तीत जास्त नागरिकांना अभियानाचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावे, असे निर्देश पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा जन्मदिन दि.२२ जुलै पासून जिल्ह्यातील वर्धा, आर्वी, हिंगणघाट, देवळी येथे आरोग्य अमृत महोत्सवांतर्गत भव्य प्रमाणात विशेष आरोग्य शिबिरे घेतली जात आहे. त्याअनुषंगाने पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी तयारीचा आढावा घेतला. बैठकीला आ.अरुण लखानी, आ.राजेश बकाने, आ.सुमित वानखेडे, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, उपजिल्हाधिकारी श्रीपती मोरे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुरज गोहाड, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.सुमंत वाघ, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.स्वप्नील बेले यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी, विविध डॉक्टर संघटना, सामाजिक संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.



गेल्यावर्षी राबविण्यात आलेल्या मोतीबिंदू विरहित वर्धा अभियानात तब्बल ६ हजार ५१५ रुग्णांवर डोळ्यांच्या शस्त्रक्रिया करण्यात आल्या. यावर्षी संपुर्ण आरोग्य तपासणीचे अभियान राबविण्यात येत आहे. आरोग्य अमृत महोत्सवांतर्गत दि.२२ ते २४ जुलै अशा तीन दिवशी बच्छराज सभागृह वर्धा येथे आरोग्य शिबिर होईल. आर्वी येथे दि.३१ जुलै ते १ ऑगस्ट, हिंगणघाट येथे दि.८ व ९ ऑगस्ट तर देवळी येथे १३ व १४ ऑगस्ट रोजी आरोग्य शिबिरे पार पडणार आहे.

या शिबिरात नागरिकांची आरोग्य तपासणी केली जाणार आहे. विविध प्रकारच्या आरोग्य तपासण्या केल्या जातील. तपासणीमध्ये गंभीर किंवा दुर्धर आजार आढळणाऱ्या रुग्णांना पुढील उपचार देण्यासाठी नियोजन करण्याचे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले. गावागावांमध्ये आशा स्वयंसेवकांमार्फत अभियानाची जनजागृती करून जास्तीत जास्त नागरिकांना शिबिराचा लाभ मिळेल, असे नियोजन करण्याच्या सूचना पालकमंत्र्यांनी केल्या. राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त सर्व शिबिराच्या ठिकाणी विशेष रक्तदान शिबिरांचे देखील आयोजन करण्यात आले आहे. दिव्यांगांना विविध प्रकारच्या साहित्य वाटपासह आयुष्मान कार्ड नोंदणी, विविध आरोग्य शिबिरांचा थेट लाभ शिबिराच्या ठिकाणी देण्यात येणार आहे. तसेच गरजूंना चष्म्यांचे वाटप देखील केले जाणार आहे. शिबिरस्थळी रुग्ण नोंदणी, तपासणी, वाटप तसेच पाणी, स्वच्छता, बैठक व्यवस्था, तपासणीसाठी आवश्यक तज्ञ डॉक्टरांची उपलब्धता याचे काटेकोर नियोजन करण्याच्या सूचना पालकमंत्र्यांनी केल्या. यावेळी आ.अरुण लखानी, आ.राजेश बकाने, आ.सुमित वानखेडे यांनी मोतीबिंदू विरहित वर्धा अभियानाने हजारो गरीब रुग्णांना दिलासा दिला. त्याच धर्तीवर आरोग्य अमृत महोत्सवांतर्गत आयोजित आरोग्य शिबिरांचा सर्वसामान्य रुग्णांना लाभ होईल. त्यामुळे शिबिराचे चांगले नियोजन करण्याच्या सूचना केल्या. मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.स्वप्नील बेले यांनी शिबिराचे आयोजन व तयारीची माहिती सादर केली. आरोग्य विभाग, जीवनोन्नती अभियान व मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्षांच्या संयुक्त विद्यमाने सदर अभियान राबविण्यात येत आहे.

# सावळापूर घाटात सिनेस्टाईल सापळा... मद्यतस्करांना बेड्या

■ दोन ट्रॅक्टर आडवे लावून थरारक पाठलाग,
■ १३.६४ लाखांचा विदेशी दारूसाठा जप्त

**आर्वी जनमाध्यम :** दारूबंदी असलेल्या वर्धा जिल्ह्यात विदेशी मद्याची तस्करी करणाऱ्या टोळ्यांविरुद्ध आर्वी पोलिसांनी सलग दुसऱ्या दिवशीही मोठी धडक कारवाई करत सावळापूर घाटात अक्षरशः सिनेस्टाईल सापळा रचला. पोलिसांच्या पाठलागानंतर दोन ट्रॅक्टर रस्त्यात आडवे लावून संशयित वाहनाचा मार्ग रोखण्यात आला. या थरारक कारवाईत १३ लाख ६४ हजार रुपयांचा विदेशी मद्यसाठा जप्त करण्यात आला असून, विविध ब्रँडच्या ३० पेट्या विदेशी दारूसह दोन आरोपींना अटक करण्यात आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शेख वसीम शेख सत्तार (रा. महादेवपुरा, वर्धा) आणि शेख वसीम अब्दुल सत्तार (रा. पूलफैल, वर्धा) हे सलबर्डी येथून वर्ध्याकडे विदेशी मद्याची वाहतूक करत असल्याची गोपनीय माहिती आर्वी पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचला. मात्र संशयितांनी वाहन न थांबवता भरधाव वेगाने पळ काढला. त्यानंतर पोलिसांनी चित्रपटालाही लाजवेल असा पाठलाग सुरू केला.

अखेर सावळापूर घाटात दोन ट्रॅक्टर रस्त्यात आडवे उभे करून वाहनाचा मार्ग रोखण्यात आला.



आरोपींना शिताफीने ताब्यात घेत वाहनाची झडती घेतली असता विविध ब्रँडच्या विदेशी मद्याच्या ३० पेट्या आढळून आल्या. पोलिसांनी १३ लाख ६४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करून आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला.

दारूबंदी असलेल्या वर्धा जिल्ह्यात सलग दोन दिवसांत विदेशी मद्याविरोधात झालेली ही दुसरी मोठी कारवाई ठरली आहे. त्यामुळे मद्यतस्करांचे धाबे दणाणले असून, जिल्ह्यातील अवैध मद्यव्यवसायावर पोलिसांनी आवळलेला फास अधिक घट्ट होत असल्याचे चित्र आहे.

ही धाडसी कारवाई पोलीस अधीक्षक सौरभ अग्रवाल, अप्पर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे आणि पोलीस उपअधीक्षक प्रमोद मकेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सतीश डेहनकर यांच्या नेतृत्वात महेश राठोड, गजानन वडनेरकर, अमित जुवारे, निलेश करडे, भूषण इखार आणि प्रवीण बंडवाल यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

# घरातून सुरू होता विदेशी दारूचा साठा आणि विक्रीचा गोरखधंदा

## एलसीबीची वर्धा शहरात धडक कारवाई...

**वर्धा जनमाध्यम :** शहरातील दयाल नगर परिसरात अवैधरित्या विदेशी दारूचा साठा करून विक्री करणाऱ्या आरोपीवर स्थानिक गुन्हे शाखेने धडक कारवाई करत इलेक्ट्रिक दुचाकी, विदेशी दारू व बिअरसह एकूण २ लाख ३१ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी दोन जणांविरुद्ध वर्धा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

११ जुलै २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक व धा शहर हद्दीत गस्त घालत असताना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे दयाल नगर येथील नरेश उर्फ टिक्का डोडानी यांच्या घरावर छापा टाकण्यात आला. कारवाईदरम्यान घरासमोर उभी असलेल्या इलेक्ट्रिक चेतक मोपेड क्रमांक एमएच ३२ एडब्ल्यू २३०७च्या डिकीत तसेच



घरझडतीत मोठ्या प्रमाणात विदेशी दारू व बिअरचा साठा आढळून आला. पोलीसांनी विदेशी मद्य, बिअर आणि दुचाकीसह एकूण २.३१ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. चौकशीदरम्यान आरोपीने हा माल दिनेश यंडाळे, रा. नालवाडी याच्याकडून आणल्याची कबुली दिली. त्यानुसार दोन्ही आरोपींविरुद्ध वर्धा शहर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल व अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद चौधरी यांच्या नेतृत्वाखाली पोलीस अंमलदार सचिन इंगोले, विक्रम काळमेघ, अरविंद इंगोले आणि राहुल अधवाल यांनी सहभाग घेतला.

# रस्त्यावर बिनधास्त धावतात, जुने ऑटो कारवाईला मुहूर्त कधी

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा शहरात वाहतूक पोलिसांनी जुन्या नंबर प्लेट असलेल्या दुचाकींविरोधात कारवाईची मोहीम सुरू केली असली, तरी त्याच नियमांचे उल्लंघन करणाऱ्या तीनचाकी ऑटो रिक्षांकडे मात्र दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. त्यामुळे नियम फक्त दुचाकीस्वारांसाठीच आहेत का असा प्रश्न उपस्थित होत आहे.

> दुचाकी अडवता... ऑटो का सोडता नागरिकांचा प्रशासनाला जाब

शहरातील अनेक ऑटो रिक्षा आजही जुन्या नंबर प्लेट, अपूर्ण कागदपत्रे आणि नियमबाह्य स्थितीत रस्त्यावर धावत असल्याचे चित्र आहे. काही वाहनांकडे वैध कागदपत्रे, फिटनेस, परवाने किंवा अद्ययावत नोंदणी नसल्याचीही चर्चा आहे. मात्र अशा वाहनांवर कारवाई होत नसल्याने वाहतूक विभागाच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. वाहतूक पोलिसांनी दुचाकीस्वारांवर कठोर कारवाई करताना तीनचाकी वाहनांनाही त्याच निकषांवर तपासण्याची मागणी नागरिकांनी केली आहे. नियम सर्वांसाठी समान असतील तर कारवाईही भेदभाव न करता व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# भुकेल्या ज्येष्ठांना मायेचा घास, वर्ध्यात पूर्णब्रह्म अभियानातून सेवाभावाचा जिवंत संदेश

### स्वामी समर्थ मंदिर ट्रस्ट आणि ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठानचा पुढाकार वृद्धाश्रमाला २५० किलो अन्नधान्याचे दान

**वर्धा जनमाध्यम :** समाजात वाढत्या एकाकीपणाच्या काळात निराधार आणि गरजवंत ज्येष्ठांच्या जीवनात मायेची ऊब देणारा उपक्रम वर्ध्यात राबविण्यात आला स्वामी समर्थ मंदिर ट्रस्ट वर्धा आणि ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठान वर्धा शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने उमरी मेघे येथील सिटीझन होम वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांसाठी सुमारे २५० किलो अन्नधान्य आणि विविध खाद्यसाहित्याचे वितरण करण्यात आले या उपक्रमामुळे वृद्धाश्रमातील ज्येष्ठांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलले



ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठानतर्फे गेल्या पाच वर्षांपासून पूर्णब्रह्म अभियान राबविले जात असून निराश्रित गरजवंत विकलांग तसेच कुटुंबापासून दूर राहणाऱ्या ज्येष्ठांच्या दोन वेळच्या भोजनाची व्यवस्था करण्यासाठी ही योजना अनेक जिल्ह्यांत सुरू आहे त्याच अभियानाचा भाग म्हणून स्वामी समर्थ मंदिर ट्रस्टच्या सहकार्याने हा सेवाभावी उपक्रम पार पडला

स्वामी समर्थ मंदिराच्या सभामंडपात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा नियोजन आणि विकास समितीचे सदस्य जयंत कावळे होते तर ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठान नागपूरचे राष्ट्रीय सचिव डॉ राजू मिश्रा प्रमुख उपस्थित होते वृद्धाश्रमाचे संचालक अविनाश नानोटे यांनी अन्नधान्य स्वीकारले

यावेळी बोलताना डॉ राजू मिश्रा यांनी ज्येष्ठांचा सन्मान करणारा आणि त्यांना स्वाभिमानाने जगता येईल असा संस्कारित समाज उभारणे हे प्रतिष्ठानचे ध्येय असल्याचे सांगितले अध्यक्षीय भाषणात जयंत कावळे यांनी वर्ध्याची सेवा परंपरा अधोरेखित करत ज्येष्ठांच्या सेवेत वर्धेकर कायम अग्रेसर राहतील असा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अरुण भुरे यांनी केले तर सूत्रसंचालन मनोहर पंचारिया यांनी केले दामोधर राऊत यांनी मनोगत व्यक्त केले विविध ज्येष्ठ नागरिक मंडळांचे प्रतिनिधी महिला मंडळाच्या सदस्यांसह सामाजिक कार्यकर्ते आणि भजनी मंडळांचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते

# सेलू पोलिसांचा दणका; तीन हातभट्ट्या उद्ध्वस्त, दोघे जेरबंद

११.७८ लाखांचा मुद्देमाल जप्त

**सेलू जनमाध्यम :** अवैध दारू निर्मितीविरोधात सेलू पोलिसांनी मोठी मोहीम राबवत तालुक्यातील तीन ठिकाणी सुरू असलेल्या गावठी मोहा दारूच्या हातभट्ट्यांवर एकाचवेळी धाड टाकली. या कारवाईत ११ लाख ७८ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून सहा जणांविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १२३ तसेच दारूबंदी कायद्यान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. दोन आरोपींना अटक करण्यात आली असून इतरांचा शोध सुरू आहे.

पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार बोरखेडी कला, सोंडी आणि कोटवा येथील शेतशिवारात अवैधरित्या गावठी मोहा दारू तयार केली जात असल्याचे समोर आले. त्यानुसार पोलिसांनी नियोजनबद्ध पद्धतीने तिन्ही ठिकाणी एकाचवेळी छापे टाकले. या कारवाईत कच्चा मोहा सडवा, उकळत असलेले रसायन, तयार गावठी मोहा दारू, अमोनियम सल्फेट पावडर तसेच हातभट्टीसाठी लागणारे साहित्य जप्त करण्यात आले. एकूण जप्त मुद्देमालाची किंमत ११ लाख ७८ हजार



६०० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.या प्रकरणात राजू तेजराम चरडे, विकास उत्तम सडमाके, आनंद राय, मनोज पिंपळे, प्रवीण आत्माराम थुल आणि सुनील नेहारे यांच्याविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यापैकी दोन आरोपींना अटक करण्यात आली असून फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष पथके रवाना करण्यात आली आहेत.

# तीन लाखांची वीजवाहिनीची तार लंपास

## आरडीएसएस योजनेलाच चोरट्यांचा शॉक

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील मानिकवाडा येथे एजी ११ केव्ही फिडरवरून आरडीएसएस योजनेअंतर्गत टाकण्यात आलेली सुमारे तीन लाख रुपये किमतीची अ‍ॅल्युमिनियम कंडक्टर तार अज्ञात चोरट्यांनी रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत लंपास केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या चोरीमुळे वीज वितरणाच्या कामाला मोठा फटका बसला असून आष्टी पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली आहे.

तक्रारदार प्रदीप गोविंदराव पाथरे हे रिलायबल एंटरप्रायझेस, वर्धा या कंपनीचे सब-कॉन्ट्रॅक्टर असून, आरडीएसएस योजनेअंतर्गत साहूर डीसी वीजवाहिनीच्या कामाची जबाबदारी त्यांच्याकडे आहे. त्यांच्या तक्रारीनुसार, ११ जुलैच्या रात्री ते १२ जुलैच्या पहाटेदरम्यान मानिकवाडा एजी ११ केव्ही फिडरवरील १३ स्पॅनमधील तीन पदरी अ‍ॅल्युमिनियम कंडक्टर तार, प्रत्येकी एक किलोमीटर लांबीची, अशी एकूण तीन किलोमीटर तार अज्ञात चोरट्यांनी चोरून नेली.

रविवारी सकाळी सुमारे आठ वाजता कामासाठी गेलेले कर्मचारी सतीश घोडीले यांच्या निदर्शनास ही बाब आली. त्यांनी तातडीने प्रदीप पाथरे यांना दूरध्वनीवरून माहिती दिली. त्यानंतर कंपनीचे सुपरवायझर तुषार मानकर यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता, अंदाजे तीन लाख रुपयांची तार चोरीला गेल्याचे स्पष्ट झाले. तक्रारदार स्वतः सकाळी साडेनऊच्या सुमारास घटनास्थळी पोहोचले असता, १३ स्पॅनमधील संपूर्ण अ‍ॅल्युमिनियम कंडक्टर तार गायब असल्याचे दिसून आले. चोरट्यांनी नियोजनबद्ध पद्धतीने तार कापून नेल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. या घटनेमुळे आरडीएसएस योजनेच्या कामावर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. आष्टी पोलिसांनी तक्रार स्वीकारून अज्ञात चोरट्यांचा शोध सुरू केला असून परिसरातील हालचाली, संशयित व्यक्ती आणि उपलब्ध तांत्रिक पुराव्यांच्या आधारे तपास सुरू आहे.

प्रश्न उपस्थित होत आहे की, वीजवाहिनीवरील इतक्या मोठ्या प्रमाणातील तार चोरी होत असताना संबंधित भागात गस्त आणि देखरेख कितपत प्रभावी होती तसेच अशा घटना रोखण्यासाठी सुरक्षा उपाययोजनांमध्ये वाढ होणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

**जाहीर सूचना**

माझा मुलगा सुरज महादेवराव झाडे याची दिनांक २२ जानेवारी २०२६ रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या मालकीचे दुचाकी वाहन क्रमांक MH32AV1186 हा आहेत. (नाते आई ) माझे नाव नंदा महादेवराव झाडे वय (६०) राष्ट्रभाषा रोड, गणेश मंदिर जवळ वर्धा, हे असून, ते वाहन माझ्या नावाने हस्तांतरण करण्यासाठी माझा कुटुंबातील सदस्यांनी ना-हरकत परवानगी दिली आहे. वाहन हस्तांतरण करण्यासाठी कुणाचा आक्षेप असल्यास दहा दिवसांच्या आत उप प्रादेशिक परिवहन कार्यालय वर्धा येथे आक्षेप नोंदवावा.

आपली नम्र
नंदा महादेवराव झाडे
- राष्ट्रभाषा रोड, गणेश मंदिर जवळ वर्धा - ९८६०८६४५३८

**विवेकानंद नागरी सहकारी पत संस्था मर्या., वर्धा**
**वार्षिक सर्वसाधारण सभेची सुचना**

दिनांक - १३/ ७/ २०२६

विवेकानंद नागरी सहकारी पत संस्था मर्या., वर्धा र. नं. ३९० या संस्थेच्या सभासदांची वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवार, दि. २८/०७/२०२६ ला सकाळी ११.०० वाजता अभ्यंकर कॉन्फरन्स हॉल, आर्वी रोड, वर्धा येथे आयोजित करण्यात येत आहे. तरी सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे ही विनंती.

**सभेचे विषय :**
१. दिनांक ३०/०७/२०२५ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत वाचून कायम करणे.
२. सन २०२५-२६ चे वार्षिक अहवाल व सन २०२५-२०२६ ची वार्षिक हिशोब पत्रके मंजुर करणे.
३. नफ्याचे विनियोजन व लाभांश मंजुर करणे.
४. सन २०२६ ते २०२७ करीता तयार केलेल्या अंदाज पत्रकास मंजुरी देणे.
५. लेखा परिक्षकाची नियुक्ती करण्याबाबत.
६. सन २०२५-२०२६ चा लेखा परीक्षण अहवाल सादर करणे.
७. शासनाने तयार केलेल्या नविन आदर्श उपविधी स्वीकारण्याबाबत चर्चा करणे.
८. मा. अध्यक्षांच्या अनुमतीने वेळेवर येणारे विषय.

**सुचना :**
१. गणपुर्ती अभावी सभा तहकूब झाल्यास सभा त्याच दिवशी त्याच विषयावर त्याच ठिकाणी अर्धा तासानंतर घेण्यात येईल व त्यावेळी गणपूर्ती नसली तरी सभेचे कामकाज होईल.
२. ज्या सभासदांना काही सुचना कारावयाच्या असतील अथवा प्रश्न विचारावयाचे असतील ते त्यांनी संस्थेचे कार्यालयात कामकाजाच्या दिवशी कार्यालनीन वेळेत संस्थेकडे दि. २१/०७/२०२६ लेखी स्वरूपात द्यावे.

**प्र. म. चौधरी** — **अध्यक्ष**
**वि. ना. येलोरे** — **उपाध्यक्ष**
विवेकानंद नागरी सहकारी पत संस्था., मर्या वर्धा.

# वृक्षलागवडीबरोबरच वृक्ष संवर्धनालाही प्राधान्य देणे गरजेचे-पालकमंत्री डॉ.पंकज भोयर

■ वृक्षारोपणात सामाजिक संस्थांनी पुढाकार घ्यावा ■ व्हिजन ३०० कोटी वृक्षलागवड कार्यक्रम

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यातील विविध सामाजिक संस्था गेल्या अनेक वर्षांपासून वृक्षलागवड आणि वृक्षसंवर्धनाचे उल्लेखनीय कार्य करीत आहे. पर्यावरण संरक्षणासाठी समाजातील सर्वच घटकांनी एक येऊन मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड व संवर्धन कार्यक्रम राबविण्याची गरज असल्याचे प्रतिपादन पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी केले.

'व्हिजन ३०० कोटी' वृक्षलागवड कार्यक्रमांतर्गत नवोदय विद्यालय सेलूकाटे येथे आयोजित वृक्षलागवड कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी आमदार अरुण लखानी, आमदार राजेश बकाने, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, उपवनसंरक्षक हरवीर सिंह, विभागीय वन अधिकारी सुहास बढेकर, वनपरिक्षेत्र अधिकारी वैशाली भलावी यांच्यासह वनविभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

पालकमंत्री डॉ. पंकज भोयर पुढे म्हणाले की, हवामान बदल आणि 'अल निनो'सारख्या संकटांचा सामना करण्यासाठी समाजातील विविध घटकांनी एकत्र येऊन नियोजन करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले. केवळ वृक्षलागवड करून चालणार नाही, तर लागवड केलेल्या झाडांचे पुढे काय होते, याचे नियमित मूल्यमापन होणेही तितकेच महत्त्वाचे आहे. अनेकदा मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड झाल्याचे सांगितले जाते; मात्र चार-पाच वर्षांनंतर ती झाडे प्रत्यक्षात दिसून यायला हवीत, असे ते म्हणाले.



माजी वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या काळात राज्यात मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड मोहिमा राबविण्यात आल्या. वृक्षलागवड हा केवळ वन विभागाचा कार्यक्रम नसून सहकार क्षेत्रातील साखर कारखाने, गृहनिर्माण संस्था, पतसंस्था आणि इतर सहकारी संघटनांनी देखील मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड व संवर्धन मोहिमेत सहभागी व्हावे, असे आवाहन पालकमंत्र्यांनी यावेळी केले. आमदार अरुण लखानी म्हणाले, अलिकडच्या काळात अतिवृष्टी, दुष्काळ यासारखे प्रश्न भेडसावत असून त्याचे मुळ कारण पर्यावरणीय बदल आहे. वृक्षारोपन कार्यक्रमात विद्यार्थी आणि युवकांचा सक्रिय सहभाग असणे आवश्यक आहे. लोकसहभागाशिवाय पाणी बचत मोहिम यशस्वी होऊ शकणार नाही. त्यामुळे लोकांचा सहभाग घेणे आवश्यक आहे. झाडे लावण्याचा कार्यक्रम प्रशंसनीय असल्याचे ते म्हणाले.

आमदार राजेश बकाने म्हणाले की, गेल्या काही वर्षांत राज्यात मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करण्यात आली असून सामाजिक वनीकरण विभाग आणि कर्मचाऱ्यांनी झाडांच्या संगोपनासाठी विशेष प्रयत्न केले आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या 'एक पेड माँ के नाम' या संदेशाला प्रतिसाद देत प्रत्येकाने आपल्या घराजवळ किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करावे. त्यामुळे पर्यावरणाचे संतुलन राखण्यास मोठी मदत होईल, असे ते म्हणाले.

यावेळी पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या हस्ते चित्रकला व निबंध स्पर्धेतील विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी पालकमंत्री डॉ. भोयर व अन्य मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण केले. यावेळी विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी, विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# व्यापारवाढीतून रोजगार

युरोपमधून भारतात होणाऱ्या आयातीतही सातत्याने वाढ होत आहे. यंत्रसामग्री, औद्योगिक उपकरणे, वैद्यकीय तंत्रज्ञान, संरक्षण साहित्य, विमान उद्योगासाठी आवश्यक घटक, उच्च तंत्रज्ञानाची उत्पादने आणि विशेष रसायने यांची आयात मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. भारताचा औद्योगिक विकास वेगाने होत असला, तरी अनेक महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये आपण अजूनही परदेशी तंत्रज्ञानावर अवलंबून आहोत. त्यामुळे निर्यात वाढत असली तरी आयातीचे बिलही त्याच वेगाने वाढत आहे.औषध उद्योगाने युरोपमध्ये विश्वासार्ह पुरवठादार म्हणून स्वतःची ओळख निर्माण केली आहे. कोविडनंतर जगाने भारताच्या औषधनिर्मिती क्षमतेचा अनुभव घेतला आणि त्यानंतर भारतीय औषधांना युरोपमध्ये अधिक मागणी निर्माण झाली. त्याचबरोबर इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनातील वाढ, मेक इन इंडिया उपक्रम, उत्पादनाशी निगडित प्रोत्साहन योजना आणि जागतिक कंपन्यांची चीनवरील अवलंबित्व कमी करण्याची रणनीती याचा थेट फायदा भारतीय निर्यातीला होत आहे. युरोपमधील ग्राहकांमध्ये पर्यावरणपूरक आणि गुणवत्तापूर्ण उत्पादनांची मागणी सातत्याने वाढत आहे. भारतीय कंपन्यांनीही हरित उत्पादन, कार्बन उत्सर्जन कमी करणे, गुणवत्ता मानके आणि डिजिटल ट्रेसिबिलिटी यावर भर दिल्यामुळे त्यांना युरोपमध्ये अधिक संधी उपलब्ध होत आहेत. आज उच्च मूल्याच्या यंत्रसामग्री आणि प्रगत तंत्रज्ञानासाठी युरोपवरील अवलंबित्व कायम आहे. भारतीय उद्योगांच्या आधुनिकीकरणासाठी ही आयात आवश्यक असली तरी दीर्घकालीन दृष्टीने देशांतर्गत संशोधन, तंत्रज्ञान विकास आणि उत्पादन क्षमता वाढवणे तितकेच गरजेचे आहे. अन्यथा, व्यापारातील तूट कायम राहण्याचा धोका आहे. भारत आणि युरोपीय महासंघ यांच्यात सुरू असलेल्या मुक्त व्यापार कराराच्या (एफटीए) वाटाघाटी या पार्श्वभूमीवर अधिक महत्त्वाच्या ठरतात. हा करार झाल्यास भारतीय उत्पादनांना युरोपमध्ये अधिक सुलभ प्रवेश मिळेल. अनेक उत्पादनांवरील आयात शुल्क कमी होईल आणि भारतीय उद्योगांची स्पर्धात्मकता वाढेल. त्याच वेळी युरोपियन कंपन्यांनाही भारतात मोठी बाजारपेठ उपलब्ध होईल. त्यामुळे व्यापाराचा विस्तार निश्चित होईल; मात्र भारतीय उद्योगांचे हित जपणाऱ्या अटींसह हा करार होणे अत्यावश्यक आहे. युरोप आता केवळ व्यापार भागीदार राहिलेला नाही.

हवामानबदल, हरित ऊर्जा, डिजिटल अर्थव्यवस्था, कृत्रिम बुद्धिमत्ता, सेमीकंडक्टर, स्वच्छ तंत्रज्ञान आणि शाश्वत विकास या क्षेत्रांमध्येही भारत आणि युरोपमधील सहकार्य वाढत आहे. त्यामुळे व्यापाराला नव्या स्वरूपाची जोड मिळत आहे. मात्र युरोपने लागू केलेला 'कार्बन बॉर्डर ॲडजस्टमेंट मेकॅनिझम' (सीबीएम) भारतीय निर्यातदारांसाठी भविष्यात मोठे आव्हान ठरू शकते. स्टील, ॲल्युमिनियम, सिमेंट यांसारख्या उत्पादनांच्या निर्यातीवर अतिरिक्त कार्बन खर्च लागू होऊ शकतो.आज भारताला निर्यात वाढवायची असेल तर केवळ मोठ्या उद्योगांवर अवलंबून राहून चालणार नाही. लघुउद्योगांना जागतिक मूल्यसाखळीत सामील करणे आवश्यक आहे. त्याच वेळी आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी देशांतर्गत उत्पादनाला अधिक चालना देणेही तितकेच महत्त्वाचे आहे. संशोधन आणि विकासासाठी अधिक गुंतवणूक, उच्च तंत्रज्ञानाचे स्थानिकीकरण, कौशल्य विकास आणि नाविन्य यांना प्राधान्य दिल्याशिवाय भारत दीर्घकालीन व्यापार संतुलन साधू शकणार नाही. भारताची निर्यात वाढत असणे ही नक्कीच समाधानाची बाब आहे. युरोपासारख्या विकसित बाजारपेठेत भारतीय उत्पादनांना मिळणारा प्रतिसाद हा भारतीय उद्योगांच्या क्षमतेचा पुरावा आहे; परंतु निर्यातीत वाढ झाली म्हणून सर्व प्रश्न सुटले, असे समजणे चुकीचे ठरेल. वाढत्या आयातीमुळे व्यापार तूट वाढण्याचा धोका कायम आहे. त्यामुळे अधिक निर्यात आणि 'स्मार्ट आयात' या दोन्हींचा समतोल राखणारे धोरण आवश्यक आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचे पुढील दशक हे जागतिक व्यापारातील स्थान अधिक मजबूत करण्याचे दशक ठरू शकते. त्यासाठी युरोपासारख्या बाजारपेठांमध्ये दीर्घकालीन उपस्थिती निर्माण करणे, तंत्रज्ञानात स्वावलंबन वाढविणे आणि उच्च मूल्यवर्धित उत्पादनांवर भर देणे गरजेचे आहे. नीती आयोगाच्या ताज्या अहवालानुसार, भारताचा आयात-निर्यात व्यापार फोफावत आहे. जानेवारी ते मार्च २०२६ या तिमाहीमध्ये एकूण व्यापार ५.४ टक्क्यांनी वाढून, तो १.८४ ट्रिलियन डॉलर्सवर पोहोचला आहे. परंतु चिंतेची बाब म्हणजे, निर्यातीपेक्षा (४.२ टक्के) आयात (६.५ टक्के) अधिक वेगाने वाढत आहे. म्हणजेच भारताचे बाह्य अवलंबित्व जास्त आहे. वेगवेगळ्या वस्तूंची निर्यात २.८ टक्क्यांनी घटून ११२ अब्ज डॉलर्सवर आली आहे तर आयात जवळपास बारा टक्क्यांनी वाढून १९५ अब्ज डॉलर्सवर जाऊन पोहोचली आहे. उत्पादनक्षेत्र अजूनही दबावाखाली आहे आणि सेवाक्षेत्र, विशेषतः आयटी व डिजिटल सेवा यांनी भारताला आधार दिला आहे. त्याचप्रमाणे विद्युत यंत्रसामग्री, अणुभट्टी, खनिज इंधन, लोह व पोलाद आणि वाहने यांच्या निर्यातीत लक्षणीय वाढ झाली आहे तर आयातीमध्ये सर्वाधिक वेगाने सोने आणि चांदी यांच्यात उल्लेखनीय वाढ झाली असून ही काळजी करण्यासारखीच बाब आहे. आज भारत आणि अमेरिका यांच्यातील बहुप्रतीक्षित द्विपक्षीय व्यापार कराराची चर्चा पूर्ण झाली आहे. परंतु भारताला चीन, व्हिएतनाम किंवा बांगलादेशासारख्या प्रतिस्पर्धी देशांच्या तुलनेत कमी आयात शुल्काचा लाभ मिळत नाही, तोपर्यंत हा करार लागू केला जाणार नाही, असे केंद्रीय वाणिज्यमंत्री पीयूष गोयल यांनी स्पष्ट केले आहे. जागतिक व्यवस्थेत सध्या मोठीच उलथापालथ सुरू आहे. अशा काळात भारत आणि युरोपीय महासंघ म्हणजेच ईयू यांच्यातील भागीदारी हा स्थिरतेचा आधारस्तंभ ठरेल. गेली १८ वर्ष रखडलेला भारत-ईयू एफटीए किंवा मुक्त व्यापार करार झाल्यामुळे मात्र जगाचे अर्थकारण बदलणार आहे. हा करार म्हणजे जगातील दोन अर्थव्यवस्थांमधील समन्वयाचे उत्कृष्ट उदाहरण आहे. हा करार जागतिक देशांतर्गत उत्पादनाच्या २५ टक्के आणि जागतिक व्यापाराच्या एकतृतीयांश भागाचे प्रतिनिधित्व करतो. यामुळे युरोपीय निर्यातदारासाठी दरवर्षी चार अब्ज युरो इतक्या आयात शुल्कात भारत कपात करणार आहे. परंतु त्याच वेळी ईयू हा वस्तूव्यापाराच्या बाबतीत भारताचा सर्वात मोठा भागीदार असून त्यामुळे भारतात आणि युरोपमध्ये लाखोंची रोजगारनिर्मिती होणार आहे.

# संसदेच्या पायरीवर नतमस्तक झालेले मोदी आणि आजचे मोदी:नेमके बदलले काय?

२०१४ मध्ये पंतप्रधान पदाची शपथ घेण्यापूर्वी संसदेच्या पायऱ्यांवर नतमस्तक होऊन लोटांगण घालणारे नरेंद्र मोदी हे दृश्य संपूर्ण देशाने पाहिले. संसद हे लोकशाहीचे मंदिर आहे, संविधान हा देशाचा सर्वोच्च ग्रंथ आहे आणि लोकशाही मूल्यांप्रती आपण पूर्णपणे बांधील आहोत, असा संदेश त्या एका कृतीतून देण्यात आला.पण आज बारा वर्षांनंतर देशातील लाखो नागरिकांच्या मनात एकच प्रश्न आहे तो नम्र, संविधानाचा गौरव करणारा नरेंद्र मोदी नेमका कुठे हरवला?



**२०१४ मध्ये संसदेच्या पायऱ्यांवर नतमस्तक होणे हा केवळ एक भावनिक क्षण होता की लोकशाहीप्रती असलेल्या श्रद्धेची खरी अभिव्यक्ती होती, याचे उत्तर आता कृतीतून मिळणे आवश्यक आहे.**

ज्या संसदेच्या पायरीवर मस्तक टेकवले, त्याच संसदेकडे आज दुय्यम दृष्टीने पाहिले जात असल्याची भावना निर्माण झाली आहे. संसदेतील मर्यादित उपस्थिती, महत्त्वाच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा टाळण्याची प्रवृत्ती आणि विरोधकांच्या प्रश्नांना थेट सामोरे जाण्याऐवजी बाहेरील व्यासपीठांवरून संवाद साधण्याची पद्धत यामुळे लोकशाहीच्या आरोग्याविषयी गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. संसद हे लोकशाहीचे हृदय असते; पण त्या हृदयाचे ठोकेच कमी होत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे.

सत्तेच्या बळावर विरोधकांना कमकुवत करण्यासाठी ईडी, सीबीआय,आयकर विभाग यांसारख्या केंद्रीय यंत्रणांचा वापर केला जात असल्याचा आरोप आता केवळ विरोधी पक्षच करत नाहीत, तर अनेक निवृत्त अधिकारी, राजकीय विश्लेषक आणि सामाजिक कार्यकर्तेही प्रश्न उपस्थित करत आहेत. विशेष म्हणजे ज्या नेत्यांवर गंभीर आरोप असतात, ते भाजपमध्ये प्रवेश करताच त्यांच्यावरील कारवाई मंदावल्याचे किंवा थांबल्याचे आरोप वारंवार समोर येतात. हा केवळ योगायोग आहे की सत्तेच्या राजकारणाचा भाग, याचे उत्तर देशाला मिळणे आवश्यक आहे.

महाराष्ट्रासह अनेक राज्यांतील पक्षफोड, सरकारे पाडणे, निवडून आलेल्या आमदारांना फोडून नवीन सत्तासमीकरणे उभारणे या घटनांनी भारतीय लोकशाहीच्या नैतिकतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. मतदारांनी दिलेला कौल एका बाजूला आणि सत्ता मिळविण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या राजकीय डावपेच दुसऱ्या बाजूला, असे चित्र देशाने पाहिले. हीच का लोकशाहीची खरी व्याख्या?

देशातील जनतेचे प्रश्न मात्र दिवसेंदिवस अधिक गंभीर होत आहेत. महागाईने सामान्य माणसाचे कंबरडे मोडले आहे. शेतकरी अतिवृष्टी, अवकाळी पाऊस, उत्पादन खर्च आणि अपुऱ्या बाजारभावाच्या कात्रीत सापडला आहे. बेरोजगारीमुळे तरुणांच्या हाताला काम नाही. स्पर्धा परीक्षांमधील पेपरफुटीने लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्यावर घाला घातला आहे. शिक्षण, रोजगार आणि शेती या मूलभूत प्रश्नांवर ठोस उपाययोजनांची अपेक्षा असताना सरकारचे लक्ष वेगळ्याच विषयांकडे असल्याची टीका वाढत आहे.

देशाच्या सुमारे साठ टक्के लोकसंख्येचा संबंध ग्रामीण अर्थव्यवस्था आणि शेतीशी आहे. तरीही धोरणांचा अधिक लाभ मोठे उद्योग, आर्थिकदृष्ट्या बलाढ्य गट आणि शहरी भागांनाच मिळत असल्याची भावना वाढत आहे. काही मोजक्या उद्योगसमूहांची संपत्ती प्रचंड वेगाने वाढत असताना सामान्य नागरिक मात्र महागाई, कर्जबाजारीपणा आणि आर्थिक असुरक्षिततेशी झुंज देत आहे. श्रीमंत आणि गरीब यांच्यातील दरी दिवसेंदिवस अधिक रुंदावत असल्याची चिंता अनेक अर्थतज्ज्ञ व्यक्त करत आहेत.

याच काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे परदेश दौरेही चर्चेचा विषय ठरले आहेत. सरकार या दौऱ्यांना भारताच्या जागतिक नेतृत्वासाठी आवश्यक मानते; परंतु टीकाकार विचारतात देशात शेतकरी आत्महत्या, बेरोजगारी, महागाई, शिक्षणातील गोंधळ आणि नैसर्गिक आपत्तींचे संकट असताना पंतप्रधानांनी अधिक वेळ देशांतर्गत समस्यांकडे देणे अपेक्षित नाही का? परदेशातील भारतीयांच्या स्वागत समारंभांतील 'मोदी-मोदी'च्या घोषणा आणि विविध देशांकडून मिळणारे सर्वोच्च पुरस्कार यांमध्ये रमण्यापेक्षा भारतातील जनतेच्या वेदना ऐकणे अधिक महत्त्वाचे नाही का?

२०१४ मध्ये संसदेला वंदन करणारे मोदी आणि आजच्या सत्तेतील मोदी यांच्यातील हा विरोधाभास अनेकांना अस्वस्थ करतो. त्या वेळी संविधानाचा गौरव करणारे नेतृत्व आज संविधानिक संस्थांबाबत निर्माण झालेल्या प्रश्नांवर मौन का बाळगते,असा सवाल विरोधक वारंवार उपस्थित करतात. लोकशाही केवळ निवडणुका जिंकण्याचे नाव नाही; ती विरोधकांचा सन्मान, संसदेचा आदर, संविधानाची निष्ठा आणि जनतेपुढील उत्तरदायित्व यांवर उभी असते.

२०१४ मध्ये संसदेच्या पायऱ्यांवर नतमस्तक होणे हा केवळ एक भावनिक क्षण होता की लोकशाहीप्रती असलेल्या श्रद्धेची खरी अभिव्यक्ती होती, याचे उत्तर आता कृतीतून मिळणे आवश्यक आहे.कारण इतिहासाला प्रतीकांपेक्षा कृती अधिक महत्त्वाची असते.संसदेला वंदन करण्यापेक्षा संसदेला सर्वोच्च मानणे महत्त्वाचे असते.संविधान मस्तकी लावण्यापेक्षा त्याचा आत्मा जपणे अधिक महत्त्वाचे असते. आणि जनतेचा विश्वास जिंकण्यापेक्षा तो टिकवणे अधिक कठीण असते.

आज देशातील नागरिकांचा प्रश्न एकच आहे.२०१४ मध्ये संसदेच्या पायरीवर नतमस्तक होणारे नरेंद्र मोदी हेच आजचे नरेंद्र मोदी आहेत का? की सत्तेच्या बारा वर्षांनी त्या नम्रतेची जागा अहंकाराने,संवादाची जागा एकतर्फी निर्णयांनी आणि लोकशाहीच्या वचनांची जागा सत्तेच्या राजकारणाने घेतली आहे?या प्रश्नांची उत्तरे आज नाही दिली,तरी इतिहास निश्चितच मागेल.

**प्रदीप देशपांडे**

# इथेनॉल धोरण आणि ब्राझील

केंद्रीय इथेनॉल मंत्री हिज हायनेस लॉर्ड गडकरी साहेब इथेनॉल धोरणासाठी ब्राझीलचे उदाहरण देत असतात! म्हणजे बघा की ब्राझीलने कसे गाड्यांमध्ये इथेनॉल वापरले, तसे आपणही वापरू वगैरे...

या प्रकरणात गडकरी साहेब तुम्हाला कसे हातोहात वेड्यात काढत आहेत हे समजून घेण्यासाठी खाली भारत आणि ब्राझील या देशांचे साधारण तुलनात्मक आकडे देत आहे, ते तुम्ही स्वतः गुगल करून किंवा विकिपीडियावर जाऊन नीट पडताळून घ्या, कारण उगाच सक्तीने विश्वास ठेवायला या पोस्टचा लेखक म्हणजे काही हिज हायनेस गडकरी साहेब नाही!!



**लोकसंख्या**
**भारत** - १४८ कोटी
**ब्राझील** - २२ कोटी
**देशाकडे असलेली एकूण जमीन/ क्षेत्रफळ:**
**भारत** - ३२.८७ लाख वर्ग किमी
**ब्राझील** -८५.१० लाख वर्ग किमी
**देशाकडे असलेली सुपीक जमीन / Arable Land Area:**
**भारत** - १५.४४ लाख वर्ग किमी
**ब्राझील** - ५.८३ लाख वर्ग किमी
देशाकडे असलेले उपलब्ध वार्षिक **जलस्त्रोत म्हणजे Total Renewable Water Resources Per Year**
**भारत** - १,९११ अब्ज घन मीटर (जगात आठवा क्रमांक)
**ब्राझील** - ८,६४७ अब्ज घन मीटर (जगात पहिला क्रमांक)

आता अगदी शाळकरी मुलालाही येईल असा भागाकार करायचा आहे. जमीन आणि पाणी ही उपलब्ध संसाधने लोकसंख्येच्या आकड्याने भागायची म्हणजे तुम्हाला दरडोई आकडा मिळेल, Per Capita Resources...

आता हा भागाकार करून झाल्यावर तुम्ही या आकड्यांचा अर्थ तुम्हाला पटतो तसा अर्थ लावा, म्हणजे हिज हायनेस गडकरी साहेब आपल्याला ब्राझीलचे उदाहरण देऊन कशी राजरोसपणे आपल्या डोळ्यात धूळ फेकतात ते तुमच्या सहज लक्षात येईल!

सध्या आपण तयार करत असलेलं बहुतांश इथेनॉल हे मक्यासारखी धान्य पिके वापरून बनवत आहोत. थोडक्यात आपण शब्दशः अन्नधान्य जाळून गाड्या चालवत आहोत! तुम्ही कधी कुठे धान्याची शेती होताना बघितली असेल तर मक्यासारखी धान्यपिके तयार होण्यासाठी किती जमीन आणि पाणी लागते हे तुम्हाला माहितच असेल.अशा परिस्थितीत, आपली लोकसंख्या ब्राझीलच्या जवळपास सात पट असताना, आपण फक्त हिज हायनेस गडकरी साहेबांचा हुकूम आहे म्हणून आपल्या अन्नसुरक्षेशी खेळ करत आहोत!!

असे हे देशाच्या भूगोलाच्या विपरीत इथेनॉल धोरण हिज हायनेस लॉर्ड गडकरी आपल्यावर ब्राझीलचे फसवे उदाहरण देऊन लादत आहेत याचे मोदींना काही वावगे वाटत नाही, मोहन भागवतांनाही काही त्यात काही दोष दिसत नाही, त्यांचे भक्त आणि स्वयंसेवकसुद्धा यावर काही जोरदार विरोध वगैरे करताना दिसत नाहीत! मग हे लोक नेहमी ज्या 'राष्ट्रप्रथम राष्ट्रप्रथम' अशा आरोळ्या देत फिरतात त्याचा देशाला उपयोग कधी होणार? अशी गडकरीप्रथम धोरणं राबवून तुमचं राष्ट्रप्रथम हे ध्येय साध्य कसे होईल?

तरी आमची मोदीजी, भागवत आणि एकंदरच संघ परिवाराला विनंती आहे की जर तुम्हाला गडकरी साहेबांची मर्जीच राखायची असेल तर या इथेनॉल प्रकरणातून जेवढा प्रॉफिट त्यांची मुले कमावत आहेत तेवढा सरळ सरकारने त्यांना एखादी 'लाडके गडकरीपुत्र योजना' काढून देऊन टाकावा, फुल कॅश! म्हणजे त्यानंतर तरी गडकरी साहेबांची ही राक्षसी भूक एकदाची भागेल आणि ते भारताच्या अन्नसुरक्षेशी-पाण्याच्या वापराशी करत असलेला हा धोक्याचा खेळ थांबवण्याची कृपा करतील!!

तुम्ही गडकरी साहेबांच्या मुलांना अगदी अंबानी-अदानीएवढे गब्बर बनवायला आमची हरकत नाही, फक्त त्यासाठी देशाच्या अन्न आणि पाण्याची ही अशी धोरणात्मक नासाडी करायचे पाप करू नका, अशी नम्र विनंती आहे.

**मकरंद देसाई**

## विश्वविजेत्या भारतीय क्रिकेट संघाची नाचक्की

आयसीसी क्रमवारीतील अव्वल संघ असलेल्या आणि सलग दोनदा टी-२० विश्वविजेता बनलेल्या भारतीय क्रिकेट संघाने आयर्लंड आणि इंग्लंड या दोन्ही संघांविरुद्ध अक्षरशः नांगी टाकली आणि सलग सहा सामन्यात पराभव पत्करून दोन्ही मालिका गमावल्या. एका सामन्यात पाऊस धावून आला नसता तर बुडत्याचा पाय अधिक खोलात गेला असता. दुबळ्या आयर्लंडविरुद्ध भारतीय संघ अशाप्रकारे पराभूत होईल अशी कोणीही कल्पना केली नव्हती. तर इंग्लंड संघाने फलंदाजी, गोलंदाजी, क्षेत्ररक्षण आणि कर्णधाराचे नेतृत्व अशा सर्वच क्षेत्रांत भारतीय संघावर मात केली. विश्वविजेत्यांनी घसरगुंडी झाल्याने भारतीय क्रिकेट संघाने आपले अव्वल स्थानही गमावले. एकीकडे आयर्लंड आणि इंग्लंडच्या खेळाडूंनी मैदानावर कमालीचे व्यावसायिक नियोजन आणि जिंकण्याची जिद्द दाखवली तर दुसरीकडे भारतीय खेळाडूंनी खराब फलंदाजी, दिशाहीन गोलंदाजी आणि ढिसाळ क्षेत्ररक्षणाचे प्रदर्शन केले.एकूणच मुख्य निवडकर्ते अजित आगरकर, मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर आणि कर्णधार श्रेयस अय्यर यांच्या नेतृत्वाखालील हा संघ मैदानात पूर्णपणे दिशाहीन वाटला. आता भारतीय संघाच्या सुमार कामगिरीच्या कारणांचा शोध घेण्यासाठी आणि पुढील रणनीतीवर चर्चा करण्यासाठी बीसीसीआयने एका विशेष आढावा बैठकीचे आयोजन केले असल्याचे कळते. पण याला 'बैल गेला आणि झोपा केला' असेच म्हणावे लागेल.

**प्रदीप मोरे**

## सलग सहा पराभव

नुकतेच भारताने इंग्लंडच्या मातीत ०-४ ने टी-ट्वेंटी मालिका गमावली. त्याआधी आयर्लंडसारख्या संघाकडून ०-२ ने सपाटून मार खाल्ला. सलग सहा पराभव.या सर्व गोंधळात एक गोष्ट जी गेल्या आयपीएल पासून ते इंग्लंड दौऱ्यापर्यंत सातत्याने डोळ्यात खटकते ती म्हणजे भारताचे कमकुवत क्षेत्ररक्षण. झेल म्हणजे सामन्याची दिशा-क्रिकेटमध्ये सामना जिंकण्यासाठी २०% फलंदाजी , २० % गोलंदाजी आणि ६० % क्षेत्ररक्षण लागते हे जुने सूत्र आहे. पण भारताने ते पूर्णपणे विसरल्यासारखे वाटते. महत्त्वाच्या क्षणी सोपे झेल सुटत आहेत. सीमा रेषेवर चौकार वाचवण्याऐवजी अतिरिक्त धावा दिल्या जात आहेत. आत्मविश्वासाचा अभाव मैदानावर स्पष्ट दिसतो. दबाव घेण्याची आणि तो झेलण्याची क्षमता आपल्या खेळाडूंमध्ये दिसत नाही. त्यामुळे संघाचा तोल ढासळतो. इंग्लंडने मात्र दाखवून दिले की आक्रमक फलंदाजी बरोबरच टिपिकल झेल आणि जलद चपळ क्षेत्ररक्षण याने सामना कसा फिरवता येतो हे पुन्हा सिद्ध झाले.पुढच्या आठवड्यात भारत झिंबाब्वे दौऱ्यावर जाणार आहे. हा दौरा 'संधी' आहे की 'शेवटची संधी' हे ठरवायचे आहे.झिंबाब्वे कमकुवत आहे, पण आयर्लंडकडून धडा घेतल्यानंतर कोणालाही हलक्यात घेता येणार नाही.

**विजय कोष्टी**

## पालखी सोहळा; महाराष्ट्राचे वैभव!

आषाढ महिना सुरू झाला की वेध लागतात ते पंढरीच्या वारीचे. लाखो वारकरी देहू आणि आळंदीत जमा होतात. डोईवर तुळशी वृंदावन व विठ्ठल रखुमाईच्या मूर्ती हाती टाळ मृदंग, मुखी विठ्ठल, विठ्ठल जयहरी विठ्ठलचा गजर करीत, ज्ञानोबा - तुकारामांचा जयघोष करीत व खांद्यावर भागवत धर्माची भगवी पताका फडकवीत विठुरायाच्या भेटीसाठी लाखो वैष्णवांचा मेळा निघतो हे दृश्य डोळ्यांचे पारणे फेडणारे असते. गेली कित्येक वर्षे सुरू असलेली ही महाराष्ट्राची परंपरा आता देशातच नाही तर विश्वात लोकप्रिय झाली आहे. संपूर्ण महाराष्ट्रातून वारकरी व भाविक वारीमध्ये सहभागी होतात. महाराष्ट्रातूनच नव्हे तर गुजरात, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, कर्नाटक, तेलंगणा या राज्यातूनही लोक वारीमध्ये सहभागी होतात. आतातर परदेशातूनही लोक खास वारी अनुभवण्यासाठी महाराष्ट्रात येतात. दिवसेंदिवस वारीतील वारकऱ्यांची संख्या वाढत चालली आहे. कुठलीही जाहिरात न करता, मार्केटिंग न करता लाखो भाविक वारीत सहभागी होतात.त्यांची शिस्त समाजाला दिशा देणारीच असते. साधू संत येती घरा.... तोचि दिवाळी दसरा..... ! ही भावना त्यामागे असते.आतातर नेटकरी नेटवरही वारीचे अपडेट देत असतात. फेसबुक, ट्विटर सारख्या सोशल मीडियावर देखील आता वारीचा अमूभव घेता येतो. त्यामुळे वारीदेखील आता ग्लोबल झाली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

**श्याम ठाणेदार**

## निदा खानला जामीन

राज्यातील बहुचर्चित कार्पोरेट जिहाद प्रकरणातील संशयित आरोपी निदा खान हिला न्यायालयाने नुकताच जामीन संमत केला. नाशिकमधील टीसीएस कंपनीतील महिला कर्मचाऱ्यांचे लैंगिक शोषण करणे, त्यांचा मानसिक छळ करणे, पीडित हिंदू महिलांचा आवाज दडपणे,त्यांना धर्मांतरास प्रवृत्त करणे आणि धर्मांतर घडवून आणणे अशा गंभीर प्रकरणातील ती संशयित आरोपी आहे.नाशिकच्या विशेष न्यायालयाने निदाला जामीन देताना श्रीकृष्ण जन्माचा उल्लेख केला. भगवान श्रीकृष्णाप्रमाणे तुरुंगात जन्म घेण्याचा आघात किंवा त्यासंबंधातील सामाजिक कलंक कोणालाही सहन होण्यासारखा नाही. अशी क्लेशदायक परिस्थिती टाळण्यासाठी आणि नवजात बाळाच्या स्वागतासाठी तसेच त्याच्या सर्वांगीण विकासासाठी अर्जदार आरोपीच्या बाजूने न्यायालयीन विवेकाचा वापर करणे न्याय्य आणि योग्य ठरेल असे मत न्यायालयाने व्यक्त केल्यामुळे काहीसा वाद निर्माण झाला आहे.निदा खानसारख्या जिहादी आरोपीच्या गर्भधारणेची तुलना थेट भगवान श्रीकृष्णांच्या जन्माशी केली गेल्याने हिंदूंच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. ५ महिन्यांची गर्भवती असताना तुरुंगात राहावे लागणारी निदा ही काही पहिली महिला नव्हती. एनसीआरबीच्या २०२४ च्या 'प्रिझन स्टॅटिस्टिक्स' अहवालानुसार, भारतातील एकूण कारागृहातील कैद्यांपैकी सुमारे ४.१ टक्के महिला कैदी आहेत. त्यापैकी १,५३७ महिला कैद्यांसोबत १,७६४ मुले कारागृहात राहत होती, तसेच पश्चिम बंगाल राज्यातच २०२४ च्या रिपोर्ट नुसार ४ वर्षांत ६२ महिला कैद्यांनी न्यायालयीन कोठडीत असतानाच बालकांना जन्म दिला आहे. मग या कॉर्पोरेट जिहादच्या प्रकरणात आरोपीला वेगळी आणि विशेष वागणूक का दिली जात आहे?असाही प्रश्न यानिमित्ताने विचारला जात आहे.हिंदूंच्या मूळावर उठलेल्या या विविध प्रकारच्या जिहादांना आणि हे जिहाद उघडपणे राबवणाऱ्या जिहाद्यांना कडक शासन होण्याची गरज असताना या प्रकरणातील संशयित आरोपी निदा खान आणि तौसिफ़ अत्तार यांना मिळालेला जामीन या प्रकरणात पोलिसांच्या तपासावरदेखील प्रश्नचिन्ह उपस्थित करणारा आहे.

**जगन घाणेकर**

# 61 वर्षांच्या विश्वासाला आर्थिक बळ..!

## जि.प. कर्मचारी पतसंस्थेचा ६.७० कोटींचा निव्वळ नफा, कर्जावरील व्याजदरातही दिलासा.- महेश सोनेकर

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. १२ :** सभासदांचा विश्वास, आर्थिक शिस्त आणि पारदर्शक कारभाराच्या बळावर सातत्याने प्रगती करणाऱ्या यवतमाळ जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्थेने (र.नं. १०९) सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात तब्बल ६ कोटी ७० लाख रुपयांचा निव्वळ नफा मिळविला आहे.

संस्थेची भक्कम आर्थिक स्थिती लक्षात घेऊन सभासदांना दिलासा देण्यासाठी कर्जावरील व्याजदरात कपात करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय संचालक मंडळाने घेतल्याची माहिती अध्यक्ष महेश सोनेकर यांनी पत्रकार परिषदेत दिली. आयएसओ ९००१-२००८ प्रमाणित आणि सातत्याने 'अ' ऑडिट वर्ग मिळविणाऱ्या या पतसंस्थेचे १० हजार ७२५ सभासद आहेत. सभासदांच्या घराचे स्वप्न साकार करण्यासाठी संस्थेने फक्त ९ टक्के वार्षिक व्याजदराने ५० लाख रुपयांपर्यंतचे गृहकर्ज उपलब्ध करून देण्याची योजना सुरू केली आहे. संस्थेने आतापर्यंत २३७ कोटी रुपयांचे कर्जवाटप केले असून, ३३.९६ कोटी रुपयांचे भागभांडवल, ४९ कोटी रुपयांचा राखीव निधी, ३४० कोटी रुपयांच्या ठेवी आणि १८० कोटी रुपयांची सुरक्षित गुंतवणूक अशी आर्थिक ताकद उभी केली आहे. सामाजिक बांधिलकी जपत संस्थेने १८ मयत सभासदांच्या वारसांना १.०८ कोटी, तर डीसीपीएसधारक १० सभासदांच्या वारसांना १.२० कोटी रुपये दिले आहेत. तसेच अपघाती विमा योजनेचा लाभ आणि दुर्धर आजाराने ग्रस्त २६ सभासदांना आर्थिक मदतही करण्यात आली आहे. डिजिटल सेवांना प्राधान्य देत संस्थेने आरटीजीएस, एनईएफटी आणि नेट बँकिंग सुविधा सुरू केल्या असून, यवतमाळ, दारव्हा, पुसद, वणीसह आर्णी आणि पांढरकवडा येथेही शाखांचा विस्तार केला आहे. पत्रकार परिषदेला उपाध्यक्ष संजय गावंडे, सचिव संजय विहाडे, संचालक मंडळाचे सदस्य आणि सरव्यवस्थापक मारोती राजगडकर उपस्थित होते.

## नगरपरिषद शिक्षकांना अखेर NPS चा दिलासा..!

**पुसद, दि. १२ :** राज्यातील नगरपरिषदांमध्ये १ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त झालेल्या शिक्षकांना अखेर राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (NPS) लागू करण्याचा निर्णय नगरविकास विभागाने घेतला आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या मागणीला मंजुरी मिळाल्याने राज्यभरातील हजारो शिक्षकांना मोठा दिलासा मिळाला आहे. राज्य सरकारी कर्मचारी व महानगरपालिका शिक्षकांना यापूर्वीच एनपीएसचा लाभ मिळत असताना नगरपरिषद शिक्षक मात्र या योजनेपासून वंचित होते. याविरोधात नगरपालिका व महानगरपालिका शिक्षक संघाने सातत्याने मंत्रालयात पाठपुरावा केला. राज्याध्यक्ष सुनील जाधव यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने नगरविकास विभागाचे सचिव नवीन सोना यांची भेट घेऊन मागणी लावून धरली. तसेच मंत्री संजय राठोड यांच्या माध्यमातूनही पाठपुरावा करण्यात आला.या निर्णयामागे संघटनेचे कार्याध्यक्ष विनोद चव्हाण, सचिव शिवाजी राजेवाडे, उपाध्यक्ष विकास तरटे, राज्य पदाधिकारी योगेश पखाले आणि मार्गदर्शक संजय चुनारकर यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांची महत्त्वपूर्ण भूमिका असल्याचे संघटनेने नमूद केले आहे.

# पुसदमध्ये ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचा एल्गार..!

## प्रलंबित वेतन, भत्ते व १०० टक्के वेतनासाठी संघटना आक्रमक

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पुसद, दि. १२ :** महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी युनियन (र.न. एनजीपी-४५११) जिल्हा यवतमाळच्या नियोजित दौऱ्यानिमित्त पुसद येथे तालुकास्तरीय आढावा बैठक, मेळावा व सभा पंचायत समिती सभागृहात उत्साहात पार पडली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी युनियनचे संस्थापक सरचिटणीस तथा जिल्हाध्यक्ष गिरीश दाभाडकर होते.

यावेळी राज्य सचिव नागसेन खंदारे, जिल्हा सचिव स्वप्निल बेलखेडे, जिल्हा कार्याध्यक्ष अरविंद इंगोले, जिल्हा उपाध्यक्ष गणेश चव्हाण, जिल्हा सहसचिव विशाल सूर्यवंशी, जिल्हा संघटक अक्षय लीलारे तसेच आर्णी तालुका अध्यक्ष विकास इंगोले यांची प्रमुख उपस्थिती होती. सभेत मागील इतिवृत्तास मंजुरी देत तालुका संघटनेच्या कामकाजाचा आढावा, चालू वर्षाच्या आर्थिक अहवालाची तपासणी आणि सन २०२६ ची वार्षिक वर्गणी तालुका, जिल्हा व राज्य स्तरावर जमा करण्याबाबत निर्णय घेण्यात आले. याशिवाय ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे प्रलंबित वेतन तातडीने अदा करणे, वेतन माहेवारी करण्याची अंमलबजावणी, राहणीमान भत्ता, भविष्य निर्वाह निधीतील ग्रामपंचायतीचा हिस्सा जमा करणे, उत्पन्न अहवालानुसार कर्मचाऱ्यांना १०० टक्के वेतन मिळण्याची व्यवस्था करणे तसेच अध्यक्ष व सचिव यांचे संयुक्त बँक खाते उघडण्याबाबत सविस्तर चर्चा झाली. बैठकीत कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांवर प्रशासनाने तातडीने निर्णय न घेतल्यास संघटना पुढील काळात तीव्र भूमिका घेईल, असा इशाराही पदाधिकाऱ्यांनी दिला. तालुक्यातील ग्रामपंचायत कर्मचारी व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सेवाभावी कार्यातून समाजपरिवर्तनाचा निर्धार..!

## रोटरी क्लबच्या नव्या नेतृत्वाचा पदग्रहण सोहळा उत्साहात




✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १२ :** रोटरी क्लब ऑफ यवतमाळच्या २०२६-२७ वर्षाच्या नव्या कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा हॉटेल जसराज येथे उत्साहात पार पडला. यावेळी रोटरी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर नॉमिनी (२०२८-२९) तथा इन्स्टॉलिंग ऑफिसर निलेश परतानी यांनी, "समाज परिवर्तनाची खरी ताकद सेवाभावी कार्यात असून रोटरी ही मानवतेची चळवळ आहे,असे प्रतिपादन केले. परतानी म्हणाले, रोटरीच्या माध्यमातून निःस्वार्थ समाजसेवेची संधी मिळते. गरजू, वंचित आणि दुर्बल घटकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडविण्यासाठी प्रत्येक सदस्याने सेवाभाव जपला पाहिजे.

नव्या नेतृत्वाखाली क्लबचे सामाजिक कार्य अधिक व्यापक होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी अँड. डॉ. प्रवीण अशोकराव हर्षे यांनी अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारली. लक्ष्मीकांत लोळगे यांची सचिव (प्रशासन), डॉ. आनंद भंडारी यांची प्रकल्प सचिव, तर विपुल खिवसरा यांची खजिनदारपदी नियुक्ती झाली. मावळते अध्यक्ष डॉ. आशिष गवरशेट्टीवार यांनी वर्षभरातील सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य व पर्यावरणविषयक उपक्रमांचा आढावा सादर केला. प्रमुख अतिथी वरिष्ठ विधिज्ञ अँड. राजेश साबळे यांना रोटरीचे मानद सदस्यत्व प्रदान करण्यात आले, तर यवतमाळ नगर परिषदेच्या अध्यक्षा प्रियदर्शनी उईके यांनीही रोटरीचे सदस्यत्व स्वीकारले. सांस्कृतिक कार्यक्रमांनी सोहळ्याला रंगत आणली. सूत्रसंचालन आनंद जैन व खुशबू भंडारी यांनी केले, तर सचिव लक्ष्मीकांत लोळगे यांनी आभार मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# बाभूळगाव येथे आरोग्य तपासणी शिबिराचे उद्घाटन

## मोफत औषधी वाटप, असंख्य मान्यवरांची उपस्थिती

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**बाभुळगाव, दि. १२ :** येथील डॉ. रिखबचंद तातेड यांच्या वाढ दिवसा निमित्त आरोग्य तपासणी शिबिरआयोजित करण्यात आले होते. यावेळी रुग्णांची आरोग्य तपासणी करण्यात आली व रुग्णांना मोफत औषधी वाटण्यात आल्या.

शिबिराचे उद्घाटन गहरवाल हर्बल चे मॅनेजर सुशील कानगो यांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. रीखबचंद तातेड यांच्या हस्ते केक कापून वाढ दिवस साजरा करण्यात आला या प्रसंगी डॉ. हजारे, डॉ. कानगो रमेशचंद तातेड,गोविंदराव मेश्राम, गजानन मडावी, प्रवीण माइंदे,साई गोंदे,संजय गुप्ता, अंजली मडावी,गौरव तातेड, प्रामुख्याने उपस्थित होते. शिबिरा मध्ये ९० रुग्णांची मोफत तपासणी तसेच २० लोकांच्या मोफत हिमोग्लोबिन चाचण्या करण्यात आल्या. तसेच मोफत औषधी वितरित करण्यात आली. शिबिरा प्रसंगी सतीश मानलवार, प्रकाशचंद छाजेड, भारत इंगोले, राजू नवाडे, आरिफ अली, अभय तातेड, नन्ना महाजन, श्याम जगताप, अनिकेत पोहोकार, रवींद्र काळे, प्रवीण लांजेवार, अक्षय राऊत, युसूफ, शहजाद शेख, मुन्ना छल्लाणी, नरेंद्र दखखनकर, राजू तातेड, प्रदीप नांदुरकर, नूर खा, अमीन, अजमत मुल्ला, धरमचंद तातेड, श्याम गुप्ता, प्रवीण माइंदे, प्रणय तातेड, प्रताप देशमुख, दिनेश वर्मा, रमेश गुप्ता, गोपाल वर्मा, अंकुश सोयाम, पप्पू तातेड, जितेश शाहू, शाळेतील चिमुकले यांनी शिबिराला भेट दिली व पुष्पगुच्छ आणि छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा भेट देऊन शुभेच्छा दिल्या.

## थोडक्यात



### महागावात SIR मोहिमेला वेग..! तहसीलदार मस्के यांची गावागावांत धडक, BLO कामांची तपासणी

**महागाव :** महागाव तालुक्यात विशेष संक्षिप्त पुनरिक्षण (SIR) मोहिमेला प्रशासनाने वेग दिला असून मतदार यादी अद्ययावत करण्याच्या कामावर तहसीलदार अभय मस्के यांनी स्वतः लक्ष केंद्रित केले आहे. हिवरा, आनंदनगर, आंबोडा, सवना, कलगाव, शिरपूर, कासोळा, चिलगव्हाण, गुंज, धनोडा, भोसा, दहिसावळी, तिवरंग, मलकापूर, चिखली, पोहंडुळ, बिजोरा, मुडाणा आदी गावांना भेटी देत त्यांनी BLO यांच्या कामाचा सविस्तर आढावा घेतला. तसेच ईएफ (EF) फॉर्मचे डिजिटायझेशन निर्धारित मुदतीत पूर्ण करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या. यावेळी तलाठी, ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, सरपंच, सदस्य, पोलीस पाटील, कोतवाल तसेच संबंधित अधिकाऱ्यांना मोहिमेत सक्रिय सहभाग घेण्याचे निर्देश देण्यात आले.सशक्त मतदार यादी,सक्षम लोकशाही या उद्दिष्टाने सुरू असलेल्या मोहिमेत अचूक, पारदर्शक आणि अद्ययावत मतदार यादी तयार करण्यासाठी प्रशासनाने नागरिकांनाही सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

### वारकरी संप्रदाय यवतमाळ जिल्हा प्रसिद्धीप्रमुखपदी नीलकंठ धोबे यांची नियुक्ती

**उमरखेड :** तब्बल २५ वर्षापासून पत्रकारिता क्षेत्रात विविधांगी विषयावर



अखंडपणे वृत्तसंकलनाचे अभ्यासपूर्ण कार्य करणारे , पत्रकार निळकंठ धोबे यांची वारकरी संप्रदायाच्या जिल्हा प्रसिद्धीप्रमुख पदी नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे .

तालुक्यातील बाम्हणगाव येथील रहिवाशी असलेले पत्रकार निळकंठ धोबे यांनी विविध वृत्तपत्रात वृत्तसंकलनाचे काम केले आहे . प्रगल्भ लेखणीद्वारे वृतपत्रांतून अन्यायाविरुद्ध आवाज उठविणे याशिवाय सामाजिक समस्या , राजकिय घडामोडी , धार्मिक , आध्यात्मिक , विषयांवर लिखाणाचा त्यांचा दांडगा अनुभव आहे.लिखाणाचे सातत्य कायम ठेवत समाजहिताला प्राधान्य देणारे अभ्यासू पत्रकार म्हणून निळकंठ धोबे यांचा नावलौकीक आहे . यांची आज वारकरी सांप्रदायाच्या यवतमाळ जिल्हा प्रसिद्धी प्रमुख म्हणून वर्णी लागली असुन त्यांच्या निवडीचे श्रेय ते जिल्हाध्यक्ष ह भ प विनायकराव महाराज माने राष्ट्रीय अध्यक्ष हभप अण्णासाहेब आहेर हिसवळकर नाशिक यांना देतात .



### बेंगळुरू येथील नामांकित कंपनीत कुणाल भासपाले संशोधक म्हणून निवड

**राळेगाव :** राळेगाव येथील चंद्रकांत भासपाले यांचे सुपुत्र कुणाल भासपाले यांनी मौलाना आझाद नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (MANIT), भोपाळ येथून एम.टेक. (बायोइन्फॉर्मेटिक्स) पदवी संपादन करून शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळविले आहे. प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळा, माध्यमिक शिक्षण न्यू इंग्लिश हायस्कूल, उच्च माध्यमिक शिक्षण मार्कंडेय ज्युनिअर कॉलेज, बरडगाव येथे पूर्ण केल्यानंतर त्यांनी वसंतराव नाईक कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, यवतमाळ येथून बी.टेक. (बायोटेक्नॉलॉजी) पदवी प्राप्त केली. त्यांच्या गुणवत्तेची दखल घेत बेंगळुरू येथील ४baseCare Precision Health Pvt. Ltd. मध्ये जिनोम विश्लेषण संशोधक म्हणून त्यांची निवड झाली आहे. त्यांच्या या यशाबद्दल राळेगावच्या मॉर्निंग पार्क समूहातर्फे श्री. जानराव गिरी यांच्या अध्यक्षतेखाली सत्कार करण्यात आला. विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या यशामुळे राळेगावच्या शैक्षणिक लौकिकात भर पडली आहे.

# दुष्काळी यवतमाळचा इतिहास बदलणारा शोध..!

## ३,००० वर्षांपूर्वी भातशेती, समृद्ध संस्कृती आणि विकसित वस्तीचे पुरावे

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. १२ :** आज दुष्काळग्रस्त जिल्हा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या यवतमाळचा सुमारे ३,००० वर्षांपूर्वीचा इतिहास मात्र अत्यंत समृद्ध आणि विकसित असल्याचे महत्त्वपूर्ण पुरातत्त्वीय संशोधनातून स्पष्ट झाले आहे. यवतमाळ जिल्ह्यातील पाचखेड येथे नागपूर विद्यापीठाच्या पुरातत्त्व विभागाने केलेल्या उत्खननात लोहयुगीन वस्तीचे अवशेष सापडले असून, त्यातून त्या काळातील प्रगत शेती, विकसित जीवनशैली आणि समृद्ध पर्यावरणाचे ठोस पुरावे समोर आले आहेत.

उत्खननादरम्यान घरांचे अवशेष, लोखंडी अवजारे, विविध प्रकारची मातीची भांडी, तांदळाचे दाणे तसेच गहू, तूर आणि मूग यांसारख्या धान्यांचे अवशेष सापडले. या निष्कर्षांवरून तीन हजार वर्षांपूर्वी यवतमाळ परिसरात नियोजनबद्ध शेती केली जात होती, तसेच कृषी संस्कृती अत्यंत विकसित होती, हे स्पष्ट झाले आहे. संशोधनातील आणखी एक महत्त्वाचा निष्कर्ष म्हणजे, आज अल्प पर्जन्यमानासाठी ओळखला जाणारा यवतमाळ सातवाहन काळापर्यंत दमट हवामानाचा प्रदेश होता. त्यानंतर हवामानात झालेल्या बदलांमुळे पर्जन्यमान कमी झाले आणि शेतीच्या पद्धतीतही मोठे परिवर्तन घडले. उत्खननातून मिळालेल्या पुराव्यांवरून त्या काळातील समाज केवळ शेतीपुरता मर्यादित नव्हता. मासेमारी, शिकार, लोखंडी धातूकाम आणि नदीतील शंख-शिंपल्यांपासून चुना तयार करण्याचे तंत्रही त्यांना अवगत होते. यावरून त्या काळातील वस्ती आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि तांत्रिकदृष्ट्या प्रगत असल्याचे दिसून येते.पाचखेड येथील हा संशोधनात्मक शोध केवळ यवतमाळच्या नव्हे, तर संपूर्ण विदर्भाच्या प्राचीन इतिहासावर नव्याने प्रकाश टाकणारा ठरला आहे. दुष्काळी ओळखीमागे दडलेला समृद्ध कृषी, पर्यावरणीय आणि सांस्कृतिक वारसा या उत्खननामुळे पुन्हा एकदा जगासमोर आला असून, इतिहास संशोधकांसाठी हा शोध अत्यंत मोलाचा मानला जात आहे.

# बालपणातील 'एनसीडी 'वर नागपुरात पत्रकारांची कार्यशाळा

## यवतमाळचे पत्रकार केशव सवळकर यांची निवड

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि . १२ :** युनिसेफ आणि प्रेस इन्फॉर्मेशन ब्युरोद्वारे सोमवार १३ व मंगळवार १४ जुलै रोजी नागपुरात कार्यशाळा आयोजित केली आहे. नागपूर एम्स येथे बालपणातील असंसर्गजन्य आजार विषयावर ही मिडीया क्षमता बळकटीकरण कार्यशाळा होत आहे. या महत्त्वपूर्ण कार्यशाळेसाठी यवतमाळ येथून दै. लोकसूत्रचे कार्यकारी संपादक केशव सवळकर यांची निवड झाली आहे. भारतातील बालकांमध्ये आणि किशोरवयीन मुलांमध्ये सध्या असंसर्गजन्य आजारांचा (एनसीडी) धोका प्रचंड प्रमाणात बळावला आहे. भारतात होणाऱ्या एकूण मृत्यूपैकी ६० ते ६६ टक्के मृत्यू हे असंसर्गजन्य आजारांमुळे होत आहेत. बदलती जीवनशैली, मैदानी खेळांचा अभाव आणि फास्टफूडमुळे मुलांमध्ये लठ्ठपणाचे प्रमाण वेगाने वाढत आहे. महाराष्ट्रात तब्बल ६० लाख मुले ओव्हरवेट असून २४ लाख मुले अत्यंत लठ्ठ वर्गवारीत येतात. राज्यातील ३३ लाख मुले दमा आणि श्वसनाच्या विविध गंभीर आजारांशी सातत्याने झुंजत आहेत. दरवर्षी राज्यात २० ते २५ हजार मुले जन्मजात हृदयविकारासह जन्माला येत असल्याची माहिती समोर आली आहे. सुमारे ८८ लाख मुले चिंता, नैराश्य किंवा इतर मानसिक समस्यांचा सामना करीत आहेत. या गंभीर आरोग्य संकटावर चर्चा करण्यासाठी युनिसेफ आणि पीआयबीने या कार्यशाळेचे आयोजन केले आहे. या कार्यशाळेसाठी नागपूर येथील प्रख्यात हॉटेल प्राईडमध्ये स्वतंत्र राहण्याची उत्तम सोय करण्यात आली आहे. १३ जुलैला सायंकाळी ६:३० वाजता या हॉटेलच्या चान्सरी हॉलमध्ये मुख्य कार्यक्रम पार पडणार आहे. तसेच १४ जुलैला नागपूर एम्समधील नर्सिंग कॉलेज बिल्डिंगमधील लेक्चर हॉल-२ मध्ये सत्र होणार आहे. बाहेरून येणाऱ्या सर्व पत्रकारांसाठी विमान आणि रेल्वे तिकिटासह सर्व प्रकारच्या उत्कृष्ट सुविधा पुरविण्यात आल्या आहेत.

# येरंडगाव, इंझाळा वन परिसरात वन बीज टोबनी कार्यक्रम संपन्न

✦जनमाध्यम | प्रतिनिधी




**येरंडगाव, दि. १२ :** शाश्वत उपजिविका व पर्यावरण सुरक्षा प्रकल्प अंतर्गत सामुहिक वनहक्क प्राप्त ग्रामसभा च्या क्षेत्रात वन बीज टोबनी, दिनांक ११/०७/२०२६ ला जागतिक लोकसंख्या दिनाचे औचित्य साधुन सामुहिक वन हक्क समिती एरंडगाव ता घाटंजी व महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय एरंडगाव ता घाटंजी जिल्हा यवतमाळ यांच्या संयुक्त विद्यमानाने एरंडगाव,इंझाळा वनात वन बीज टोबनी करन्यात आली.

या कार्यक्रमाला एरंडगाव च्या पोलीस पाटील शितलताई ठाकरे, सामुहिक वनहक्क समिती चे अध्यक्ष सुभाष आडे, एफसिएफ फेलोशिप व खजिनदार विनोद कनाके, पारवा हक्क समिती च्या अश्विनी मुडेंकार,अंगणवाडी सेविका जया पुसनाके,सामाजिक कार्यकृता नामदेव पुसनाके,विद्यालयाचे मुख्याध्यापक अनिल गावंडे, एन.डी. कोतपेल्लीवार,आर.सी. राठोड,एम. एस.साबापुरे,विवेक राठोड, गजानन मोडक, राजकुमार थुल,दिलिप राठोड,महेंद्र देवतळे,जाईताई जाधव उपस्थित होत्या, या कार्यक्रमाला शितल ठाकरे यांनी पर्यावरण, वनस्पतीलागवड, त्यांचे मानवी जीवनात असलेले महत्व, तापमान, पाऊस,आरोग्य व आर्थिक ता, आयुर्वेदिक महत्व यावर विदयार्थीना महत्व समजावून सांगितले व यथोचित मार्गदर्शन केले.

# यवतमाळ अर्बन बँकेच्या वणी शाखेचा ३४ वा वर्धापन दिन उत्साहात

✦जनमाध्यम | प्रतिनिधी




**वणी, दि. १२ :** यवतमाळ अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या वणी शाखेचा ३४ वा वर्धापन दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी बँकेचे अध्यक्ष डॉ. नितीन खर्चे यांनी बँक प्रथमच पूर्णपणे एनपीएमुक्त (NPA मुक्त) झाल्याची घोषणा करत हा बँकेच्या वाटचालीतील ऐतिहासिक टप्पा असल्याचे सांगितले.

"यवतमाळ अर्बन बँक ही कोणत्याही व्यक्तीची नसून भागधारकांची बँक आहे. प्रत्येक भागधारक हाच तिचा खरा मालक आहे," असे त्यांनी ठामपणे नमूद केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वणी नगर परिषदेच्या नगराध्यक्ष विद्याताई आत्राम होत्या. विभागीय अध्यक्ष गोवर्धन राठोड व नगर संघचालक किरण बुजोणे यांची प्रमुख उपस्थिती होती. नगराध्यक्ष विद्याताई आत्राम यांनी बँकेने सामाजिक बांधिलकी जपत सेवाभावी कार्यातून विश्वासार्हता निर्माण केल्याचे सांगितले. डॉ. खर्चे यांनी बँकेचा महाराष्ट्रभर विस्तार होत असून ग्राहकांचा विश्वास हीच बँकेची सर्वात मोठी ताकद असल्याचे स्पष्ट केले. भविष्यात अधिक आधुनिक, पारदर्शक आणि ग्राहकाभिमुख बँकिंग सेवा देण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला. गोवर्धन राठोड यांनी वणी शाखेच्या सातत्यपूर्ण प्रगतीचे कौतुक केले, तर किरण बुजोणे यांनी उद्योजक व युवा व्यावसायिकांना सक्षम आर्थिक पाठबळ देणारी संस्था म्हणून यवतमाळ अर्बन बँकेची ओळख अधोरेखित केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाखा व्यवस्थापक प्रमोद सप्रे यांनी केले, तर आभार अधिकारी अर्जुन उरकुडे यांनी मानले. कार्यक्रमाला पदाधिकारी, कर्मचारी, भागधारक आणि ग्राहकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# मान्सूनचा वेग मंदावला; खरीप पिकांसमोर चिंता वाढली

**अंजनगाव बारी/वार्ताहर**

अमरावती जिल्ह्यासह विदर्भात जुलैच्या पहिल्या आठवड्यात दमदार पाऊस झाल्यानंतर आता मान्सूनचा वेग पुन्हा मंदावला आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, १९ जुलैपर्यंत राज्यातील बहुतांश भागात पावसाचा जोर कमी राहण्याची शक्यता असून, काही ठिकाणी उष्णतेची तीव्रता वाढू शकते.

अमरावती जिल्ह्यात १ जून ते १० जुलैदरम्यान सरासरीच्या तुलनेत सुमारे १२ टक्के पावसाची तूट नोंदवण्यात आली आहे. त्यामुळे सोयाबीन, कापूस व इतर खरीप पिकांसाठी पावसाची प्रतीक्षा वाढली आहे. तज्ज्ञांच्या मते, 'अल निनो'च्या प्रभावामुळे मान्सून टप्प्याटप्प्याने सक्रिय होत असून, जुलैच्या शेवटच्या आठवड्यात पुन्हा पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. तोपर्यंत शेतकऱ्यांनी पिकांची योग्य काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तज्ज्ञांच्या मते, 'अल निनो'च्या प्रभावामुळे मान्सून सलग सक्रिय राहत नाही. काही दिवस मुसळधार पाऊस पडतो, त्यानंतर अनेक दिवस उघडीप आणि उष्णतेचा प्रभाव जाणवतो. त्यामुळे शेतीतील नियोजनावर परिणाम होत असून, पिकांच्या वाढीवरही त्याचा परिणाम होण्याची शक्यता आहे.



'अल निनो' चा प्रभाव

पुढील काही दिवसांत समाधानकारक पाऊस झाला नाही, तर खरीप पिकांवर ताण वाढू शकतो.

त्यामुळे शेतकऱ्यांचे लक्ष आता जुलैच्या शेवटच्या आठवड्यात अपेक्षित असलेल्या मान्सूनच्या पुढील सक्रिय टप्प्याकडे लागले आहे. दरम्यान, कृषी तज्ज्ञांनी शेतकऱ्यांना पिकांमध्ये ओलावा टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे आवाहन केले आहे.

# रस्ता दुरुस्तीकरीता शिवसेनेचे 'भीक मागो' आंदोलन

## निधी देऊन तातडीने काम करण्याची मागणी

**अमरावती/का.प्र.**

डॉ. पंजाबराव देशमुख चौक ते कलेक्टर कार्यालयाकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावरील खड्डे आणि तुटलेला डिव्हायडर ६ महिन्यांपासून दुरुस्त न झाल्याने त्रस्त झालेल्या नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. हा रस्ता दुरुस्त करण्यासाठी शिवसेना उबाठा २० जुलै रोजी 'भीक मांगो' आंदोलन करणार आहे. याच रस्त्यावर आर.टी.ओ. कार्यालय असल्याने सतत मोठी वर्दळ असते. पावसामुळे खड्ड्यांचे प्रमाण वाढल्याने या ठिकाणाला नागरिकांनी 'कलेक्टर गढी' असे नाव देऊन संताप व्यक्त केला आहे.

शिवसेना उ. बा. ठा. पक्षातर्फे सोमवार २० जुलै रोजी सकाळी १० वाजता याच रस्त्यावर 'भीक मागो' आंदोलन करण्याचा इशारा माजी नगरसेवक प्रदीप वि. बाजड यांनी दिला आहे. माहितीनुसार गेल्या ६ महिन्यांपूर्वी या रस्त्यावरील पिण्याच्या पाण्याची मोठी पाईपलाईन फुटली होती. दुरुस्तीचे काम झाल्यानंतर खोदकामाचा मलबा आणि डिव्हायडरचा मोडका भाग तसाच रस्त्यावर आणि खड्ड्यांमध्ये टाकून देण्यात आला. त्यामुळे रस्त्यावर मोठे खड्डे आणि अडथळे निर्माण झाले आहेत. पाईपलाईन दुरुस्तीनंतर किमान १ महिन्यात रस्ता आणि डिव्हायडर दुरुस्त करणे गरजेचे होते; मात्र मनपा प्रशासन 'निधी नाही' असे सांगून जबाबदारी झटकत असल्याचा आरोप बाजड यांनी केला आहे. लोकप्रतिनिधीही या समस्येकडे दुर्लक्ष करत असल्याने वाहनधारकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. या रस्त्यावरील खड्डे आणि डिव्हायडर मुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यामुळे मनपा बांधकाम विभागाने तातडीने या रस्त्याची दुरुस्ती करावी, अशी मागणी करत आयुक्तांना निवेदन देण्यात आले आहे.

या दुरुस्तीसाठी केवळ ५० हजार रुपयांचा निधी पुरेसा आहे, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. प्रशासनाने तातडीने दखल न घेतल्यास २० जुलै रोजी 'कलेक्टर गढी' वर भीक मागो आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

# आ. अडसड यांच्या संकल्पनेतून जनकल्याण शिबिराचे उद्घाटन

**चांदुर रेल्वे/वार्ताहर**

धामणगाव रेल्वे विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा. श्री प्रतापदादा अडसड यांच्या संकल्पनेतून ग्रामपंचायत कार्यालय, मालखेड येथे जनकल्याण शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

शिबिराचे उद्घाटन श्री विठोबा संस्थान उर्फ श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थान, श्रीक्षेत्र सावंगा (विठोबा)चे अध्यक्ष पुंजारामजी वै. नेमाडे यांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. यावेळी मालखेड ग्रामपंचायतीच्या प्रशासक श्रीमती लता पाटील यांच्या हस्ते नेमाडे गुरुजी यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन



सत्कार करण्यात आला. या प्रसंगी गावातील नागरिक, विविध विभागांचे अधिकारी, पदाधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिबिरामध्ये राज्य व केंद्र शासनाच्या विविध जनकल्याणकारी योजनांची माहिती देण्यात आली. तसेच पात्र लाभार्थ्यांना विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी आमदार प्रतापदादा अडसड यांच्या तज्ञ चमूने मार्गदर्शन करून आवश्यक कागदपत्रे, अर्ज प्रक्रिया व शासकीय योजनांबाबत सविस्तर माहिती दिली. शासनाच्या योजना सर्वसामान्य नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या जनकल्याण शिबिराचे महत्व नेमाडे गुरुजींनी यावेळी व्यक्त केले.

# प्लास्टिकविरोधी मालवीय चौक ते इतवारा बाजार परिसरात संयुक्त कारवाई

## ५ हजार ५० रुपयांचा दंड

**अमरावती/का.प्र.**

महापालिकेच्या स्वच्छता व प्लास्टिकमुक्त शहर अभियानांतर्गत मालवीय चौक, चित्रा चौक ते इतवारा बाजार रोड परिसरात संयुक्त विशेष मोहीम राबविली. यावेळी नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यावसायिकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. या कारवाईत एकूण ५ हजार ५० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. महापालिका आयुक्त व अतिरिक्त आयुक्त यांच्या आदेशानुसार वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) आणि सहायक आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली. यावेळी प्रतिबंधित सिंगल-यूज प्लास्टिकचा वापर, स्वच्छतेचे नियम, प्रत्येक व्यावसायिकाकडे ओला व सुका





कचऱ्यासाठी दोन डस्टबिनची उपलब्धता तसेच अतिक्रमणाची तपासणी करण्यात आली. तपासणीत दोन डस्टबिन उपलब्ध नसलेल्या पवन फुटाणा, सईद नवाब, शेख मुशीद बागवान, सलीम खान आणि अमान खान यांच्याकडून प्रत्येकी १ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला.

तसेच स्वच्छता नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी हबीब खान यांच्यावर ५० रुपयांचा दंड ठोठावण्यात आला.

या मोहिमेत प्लास्टिक नोडल अधिकारी ए. के. गोडर, ज्येष्ठ आरोग्य निरीक्षक राजू डोळसावर, स्वच्छता निरीक्षक सचिन सेनी, एम. संजय, निखिल खंगारे, मकराज डेंगवाल, मयूर सारस, अतिक्रमण प्रमुख कांदळे यांच्या पथकाने सहभाग घेतला.

# दहा तालुक्यांतून बोगस बियाणांच्या ५६१ तक्रारी

**अमरावती/का.प्र.**

जिल्ह्यात सोयाबीन बियाण्यां च्या आवणक्षेत्राबत शेतकऱ्यां च्या तक्रारींमध्ये मोठी वाढ झाली असून, कृषीविभागात जिल्ह्यात एकूण ५६१ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या तक्रारींची तालुकास्तरीय तक्रार निवारण समितीमार्फत संबंधित शेतावर प्रत्यक्ष पाहणी सुरू आहे. सर्वाधिक १२४ तक्रारी अमरावती तालुक्यात नोंदविण्यात आल्या आहेत.



**अमरावती तालुका अव्वल**

त्यापाठोपाठ तिवसा (१९७), चांदुर रेल्वे (१३), मोर्शी (७५), चांदुर बाजार (४३), नांदगाव खंडेश्वर (३०), अचलपूर (१), अंजनगाव सुर्जी (१८), धामणगाव रेल्वे (१९) आणि वरुड, दर्यापूर, चिखलदरा, धारणी तालुक्यांतून तक्रारी नाही.

भातकुली (६) तालुक्यातून तक्रारी दाखल झाल्या आहेत. दरम्यान, वरुड, दर्यापूर, चिखलदरा आणि धारणी या तालुक्यात अद्याप एकही तक्रार प्राप्त झालेली नाही. कृषी विभागाकडे प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने शेतांवर प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामे करण्यात येत असून, बियाण्यांच्या उपग्रहक्षेत्राबत आवश्य अशल अहवाल तयार करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

# महेशलाल झामनानी यांचे निधन

**अमरावती/का.प्र.**

येथील रेल्वे स्टेशन परिसरातील हरे माधव स्वीट्स अँड जनरलचे संचालक तथा हरे माधव दरबार लाईन, रामपुरी कॅम्प येथील रहिवासी व सिंधी समाजातील प्रतिष्ठित नागरिक महेशलाल मोतीराम झामनानी (वय ६६) यांचे रविवारी पहाटे ४ वाजताच्या सुमारास उपचारा दरम्यान दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनामुळे कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच परिसरातील नागरिकांमध्ये शोककळा पसरली आहे.



गेल्या अनेक दिवसांपासून ते आजाराशी झुंज देत होते. गुरुवारी अचानक त्यांची प्रकृती खालावल्याने कुटुंबीयांनी त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल केले होते. डॉक्टरांच्या देखरेखीखाली त्यांच्यावर उपचार सुरू होते. मात्र, उपचार सुरू असतानाच रविवारी पहाटे ४ वाजता त्यांनी अखेरचा श्वास घेतला. महेशलाल झामनानी यांच्या निधनाची वार्ता समजताच नातेवाईक, मित्रमंडळी आणि परिचितांनी रुग्णालय तसेच त्यांच्या निवासस्थानी धाव घेतली. त्यांच्या निधनाबद्दल विविध स्तरांतून हळहळ व्यक्त करण्यात येत असून अनेकांनी झामनानी कुटुंबीयांचे सांत्वन केले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, जावई, नातवंडे असा मोठा आप्तपरिवार आहे. सोमवारी दुपारी स्थानिक मोक्षधाम येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

# चांदूरवाडीतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

## शिक्षणासाठी सहयोग व उडान फाऊंडेशनचा सहकार्याचा हात

**चांदूररेल्वे/वार्ताहर**

चांदूररेल्वे सहयोग मल्टीस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड तसेच उड्डाण फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने चांदूरवाडी ग्रामपंचायतच्या जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी शालेय बॅग वाटप कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रिजनल मॅनेजर मनीष पाटील व समाजसेविका डॉ. सुषमा खंडार उपस्थित होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून सहयोग बँकेच्या ब्रांच मॅनेजर ऋतुजा ठाकरे, उपसरपंच सोनू शेख, शाळेच्या मुख्याध्यापिका रेखा वडतकर तसेच सेल्स मॅनेजर अमर



अलोने, एस.एस. ट्रेनर शुभम मोहोड उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय बॅगांचे वाटप करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी विद्यार्थ्यांना मनापासून अभ्यास करून उज्ज्वल भविष्य घडविण्याचा संदेश दिला. समाजातील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्यासाठी अशा सामाजिक उपक्रमांचे महत्त्व असल्याचे मान्यवरांनी आपल्या मनोगतात सांगितले. कार्यक्रमाला सहयोग बँकेचे सर्व कर्मचारी, जिल्हा परिषद शाळेचे सर्व शिक्षक, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि उत्साहामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. उपस्थितांनी सहयोग मल्टीस्टेट उड्डाण फाऊंडेशनच्या

# एसटी स्मार्ट कार्ड नोंदणी शिबिराला आ. सुलभा खोडके यांची भेट

**अमरावती/का.प्र.**

महिला व ज्येष्ठ नागरिकांना शासनाच्या हाफ तिकीट योजनेचा लाभ सहज आणि सुलभपणे मिळावा, या उद्देशाने अमरावती महानगर स्थित प्रभाग क्रमांक- २ गाडगे नगर मध्ये आयोजित करण्यात आलेल्या एसटी स्मार्ट कार्ड नोंदणी शिबिराला आमदार सुलभा खोडके यांनी भेट देऊन शिबिराची पाहणी केली.

शिबिराला महिला व ज्येष्ठ नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. अनेक पात्र लाभार्थ्यांनी शिबिरात प्रत्यक्ष उपस्थित राहून एसटी स्मार्ट कार्डासाठी नोंदणी केली. शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ अधिकाधिक नागरिकांपर्यंत



पोहोचविण्याच्या दृष्टीने हे शिबिर महत्त्वपूर्ण ठरले. यावेळी आ.सुलभा खोडके यांनी नागरिकांशी संवाद साधत शासनाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक नोंदणी वेळेत पूर्ण करण्याचे आवाहन केले. तसेच, प्रत्येक पात्र नागरिकापर्यंत शासनाच्या सुविधा पोहोचाव्यात यासाठी भविष्यातही अशा लोकाभिमुख उपक्रमांचे सातत्याने आयोजन करण्यात येईल, अशी ग्वाही आ.खोडके यांनी दिली. यावेळी विधान परिषद आमदार संजय खोडके, प्रभागाचे नगरसेवक प्रमोद महल्ले, नगरसेविका-मिनल सवाई, योगेश सवाई आदींसह एसटी महामंडळातील अधिकारी व कर्मचारी आदी मान्यवर उपस्थित होते. उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी परिश्रम घेतलेल्या एसटी महामंडळाचे अधिकारी, कर्मचारी, आयोजक तसेच मोठ्या संख्येने उपस्थित राहून शिबिर यशस्वी करणाऱ्या सर्व नागरिकांचे सुद्धा आ.खोडके यांनी अभिनंदन केले आहे.

# खल्लार हायस्कुलच्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षेत उत्तुंग भरारी

**खल्लार/वार्ताहर**

श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित असलेल्या खल्लार हायस्कुल खल्लार येथील विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून दर्यापूर तालुक्यातून अव्वल स्थान पटकाविले आहे.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे द्वारा आयोजित पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत विद्यालयाचे वर्ग ८ मधिल १२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून त्यापैकी ११ विद्यार्थी शिष्यवृत्ती मिळण्यास पात्र ठरले आहेत. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा अधिक दृढ झाली आहे.



## ११ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र

शिष्यवृत्ती पात्र, परीक्षेमध्ये अथर्व दिनेश खंडारे, सिद्धी अमोल बावणे, पूर्वी योगेश शिंगणे, सोहम अमोल मदनकर, खुशी उमेश इंगळे, वैभव डिगांबर खंडारे, सोहम अमित देशपांडे, अभय नरेश घोंगडे, आर्यन ईश्वर मेश्राम, कार्तिक संतोष झोड, प्रिती दिनेश इंगळे हे विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहे. ग्रामिण भागातील शाळेने मिळवलेले हे यश अत्यंत अभिमानास्पद व कौतुकास्पद आहे.

या शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे विद्यालयाच्या वतीने स्वागत करण्यात आले. योग्य मार्गदर्शन, परीक्षेचे नियोजन व कठोर परिश्रमामुळे हे यश विद्यार्थ्यांना प्राप्त झाले आहे. या यशाबद्दल श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, संस्थेचे कार्यकारिणी सदस्य प्राचार्य केशवराव गावंडे, शाळा तपासणी अधिकारी विनायक गावंडे, शाळा समिती सदस्य मधुसूदन धाबे, पंजाबराव टवलारे, मुख्याध्यापिका वनिता राऊत, माजी मुख्याध्यापक नवरे, शिष्यवृत्ती प्रभारी बागडे, राणे, घुरडे, कुमारी ऋतुजा बोंडे, अमोल मोपारी, सय्यद अब्दुल, शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक पालक संघ, माता पालक संघ, सर्व पालक वर्ग, सर्व शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे.

# अधीछात्रवृत्तीसाठी आता नवे निकष लागू

## संशोधन अधीछात्रवृत्ती लाभार्थ्यांची कमाल संख्या १००

**अमरावती/का.प्र.**

स्वायत्त संस्थांच्या स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण व अधीछात्रवृत्तीसाठी (फेलोशिप) नवे निकष लागू करण्यात आले आहेत. प्रत्येक संस्थेसाठी कमाल १०० एवढी मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. राज्य शासनाने यावतचा आदेश जारी केल्याचे बार्टीच्या स्थानिक अधिकाऱ्यांनी सांगितले. शासनाच्या ताज्या आदेशानुसार टीआयआरटीआय (आरती), बार्टी, सारथी, महाज्योती व अमृत या स्वायत्त संस्थांमार्फत राबवण्यात येणाऱ्या अधीछात्रवृत्ती (फेलोशिप) व स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण योजनांसाठी आता शंभरहून अधिक विद्यार्थ्यांची निवड केली जाणार नाही.

नवीन सर्वंकष धोरण जाहीर करताना हा निर्णय घेण्यात आला आहे. या सुधारित धोरणामुळे आता संस्थांच्या लाभार्थी विद्यार्थ्यांच्या संख्येवर मर्यादा येणार आहे. नवीन नियमानुसार, प्रत्येक स्वायत्त संस्थेसाठी संशोधन अधीछात्रवृत्ती लाभार्थ्यांची कमाल संख्या १०० निश्चित करण्यात आली आहे. तसेच, या योजनांचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्याच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लाख रुपयांच्या आत असणे बंधनकारक करण्यात आले आहे. यूपीएससी, एमपीएससीच्या प्रशिक्षणासाठी नवे निकष लागू करण्यात आले आहेत. त्यानुसार यूपीएससीच्या प्रशिक्षणासाठी १०० तर एमपीएससीच्या प्रशिक्षणासाठी विद्यार्थ्यांची मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. प्रत्येक संस्थेतील यूपीएससी प्रशिक्षणासाठी कमाल १०० आणि एमपीएससीच्या सर्व परीक्षांसाठी मिळून १ हजार विद्यार्थ्यांची मर्यादा निश्चित केली आहे. कठोण पातळीवरील प्रशिक्षण कार्यक्रमांचा लाभ एका विद्यार्थ्याला जास्तीत जास्त दोन वेळा दिला जाणार आहे. कमी स्तरावरील प्रशिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्याला पुढील उच्च स्तरासाठी केवळ एकदाच संधी दिली जाणार आहे. दरम्यान, परदेश शिष्यवृत्ती, स्वाधार, स्वयं, आधार व निवाह भत्ता या कल्याणकारी योजनांना नव्या धोरणातून वगळण्यात आले आहे. त्या स्वतंत्रपणे सुरू राहतील, असे स्पष्ट करण्यात आले आहे. एआयएएसएफची आंदोलनाची तयारी

शासनाच्या या नवीन मर्यादित विद्यार्थी संख्येच्या धोरणावर ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशन (एआयएसएफ) या विद्यार्थी संघटने तीव्र आक्षेप घेतला आहे. स्पर्धा परीक्षांची पद्धत बदलत असताना अधिक विद्यार्थ्यांना संधी देण्याऐवजी निकष कडक करून विद्यार्थी संख्या निर्बंध आणणे अन्यायकारक आणि संविधानविरोधी असल्याचे मत व्यक्त केले आहे.

# देवेंद्र फडणवीस तुम्हारा चुक्याच !

विधानसभेत बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांच्या संदर्भात वापरलेली भाषा निषेधार्ह आहे; हा निषेध करावा तेवढा थोडा आहे अशा पद्धतीने देवेंद्र फडणवीस विधानसभेत बोलले.हे असे भाषण त्यांनी त्यांच्या मतदारसंघात गोकुळपेठेत,गिरीपेठ किंवा पांढरा बोडीच्या झोपडपट्टीत केले असते तर एक वेळेस समजूनही घेता आले असते पण, हे भाषण त्यांनी चक्क लोकशाहीचे पवित्र मंदिर असलेल्या विधानसभेत केलेले आहे.

खरे तर ते कडक टीका करतात पण,अशी टोकाची भाषा वापरण्याचे देवेंद्र फडणवीस यांची परंपरा नाही. देवेंद्र फडणवीस यांचे वडील गंगाधरराव फडणवीस हे विधान परिषदेचे सदस्य असताना त्यांच्याशी आमचा निकटचा संपर्क आला.मला आठवते गंगाधरराव यांचे व्यक्तिमत्व अतिशय सुसंस्कृत होते.मितभाषी गंगाधरराव यांचा संपर्क राजकीय विचारांच्या पलीकडचा होता. कुणावरही टीका करताना कधी वावगाशब्द त्यांच्या तोंडून बाहेर पाडला नाही. विधिमंडळाचे कामकाज उशिरापर्यंत सुरु राहणार असेल तर ते संपल्यावर हॉटेल्स सुरु राहिली नाही तर तेव्हा आम्ही नवख्या असलेल्या तरुण पत्रकारांच्या क्षुधाशांतीची सोय करणाऱ्या सर्व सहृदयी लोकप्रतिनिधींमध्ये गंगाधरराव यांचा समावेश होता. गंगाधरराव फडणवीस यांचे निधन झाले तेव्हा त्यांच्याविषयी सभागृहात बोलताना विधान परिषदेचे तत्कालीन सभापती जयंतराव टिळक तसेच सभागृहाचे नेते शरद पवार यांनी राजकीय मतभेद बाजुला ठेऊन केलेली श्रद्धांजलीपर भाषण गंगाधरराव यांच्या सुसंस्कृत व्यक्तिमत्त्वावर नेमका प्रकाश टाकणारी आणि अतिशय स्पर्शी आहेत;त्या भाषणाचे साक्षीदार असलेल्या पत्रकारांच्या पिढीतील प्रस्तुत पत्रकार आहे. हवे तर देवेंद्र फडणवीस यांनी ती भाषणे काढून एकदा अभ्यासावी म्हणजे, आपण कुणाची परंपरा पाळत नाही आहोत हे त्यांच्या लक्षात येईल.

सत्ताधारी पक्षांना घेतलेल्या कोणत्याही निर्णयाबद्दल किंवा केलेल्या कोणत्याही कामाबद्दल टीका करण्याचा अधिकार जसा विरोधी पक्षांना आहे तसा तो पत्रकार आणि जनतेलाही आहे.समाजमाध्यमे अस्तित्वात येण्याआधी जनतेला तो आवाज व्यक्त करता येत नव्हता,आता ती सोय सहज उपलब्ध आहे.समाज माध्यमांवर प्रतिक्रिया व्यक्त करणारे सर्वजण अभ्यासू आणि समंजस असतील अशातला भाग नाही हे आपण लक्षात घ्यायला पाहिजे; सर्व पक्षातील सर्वच राजकारणी तरी कुठे अभ्यासू, समंजस आणि सुसंस्कृत आहेत?

विरोधी पक्ष म्हणजे सत्ताधारी पक्षावरचा अंकुश असतो. मुंबई-पुणे मिसिंग लिंक (कनेक्टिंग लिंक म्हणा हवे तर!)वर जी कथित दरड कोसळली त्या संदर्भात समाजाच्या सर्व स्तरातून आणि विरोधी पक्षाच्या नेत्यांकडूनही जी काही टीका झाली त्या टिकेचा समाचार सुसंस्कृत शब्दात देवेंद्र फडणवीस यांना घेता आला असता पण,तो घेताना विरोधी पक्षाचा असलेला टीकेचा अधिकार देवेंद्र फडणवीस विसरले. सभागृहात असलेल्या विरोधी पक्षाच्या सदस्यांनी ही सर्व टीका ऐकून घेतली हे जास्त अनाकलनीय होते. मुख्यमंत्र्यांनी आपल्यावर पातळी सोडून हल्ला चढवला आहे हे विरोधी पक्ष सदस्यांच्या लक्षात येऊ नये यापेक्षा विरोधी पक्षाचे दुबळेपण वेगळे असू शकत नाही. सभागृहातच या वक्तव्याचा निषेध करुन जर विरोधी पक्षांनी सभात्याग केला असता तर, समाज माध्यमांवरुन झालेल्या कथित बेताल टिकेला कदाचित वाव मिळाला नसता पण, विरोधी पक्ष नेते व सदस्यही त्यांची जबाबदारी साफ विसरले हे लक्षात घ्यायला हवे.

याआधी विरोधी पक्ष नेते असताना देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात आणि सभागृहाबाहेर केलेल्या बेछूट वक्तव्याचे दाखले आहेत. राष्ट्रवादीसोबत कदापिही जाणार नाही, हे वक्तव्य देवेंद्र फडणवीस यांचच होते. सिंचनातील कथित भ्रष्टाचाराचे सादर केलेले गाडीवर पुरावे विसरुन त्या वक्तव्यापासून देवेंद्र फडणवीस यांनी कसे घुमजाव केले, हे या महाराष्ट्राने पाहिले आहे. देवेंद्र फडणवीस बोलतात एक आणि करतात काहीतरी वेगळंच याची अनेक उदाहरणं देता येतील. ते पहिल्यांदा मुख्यमंत्री झाले तेव्हा त्यांचे खाजगी सचिव प्रवीण परदेशी यांचा पासपोर्ट घरी विसरण्याच्या प्रकरणाची चौकशी करण्याची घोषणा मोठ्या तार स्वरात देवेंद्र फडणवीस यांनी केली होती, त्या चौकशीचे काय झाले ते आता बारा वर्षे उलटली तरी समजलेले नाही. पहिल्या मुख्यमंत्रीपदाच्या, पहिल्या उपमुख्यमंत्रीपदाच्या आणि दुसऱ्या मुख्यमंत्रीपदाच्या कारकिर्दीत देवेंद्र फडणवीस यांनी अशा अनेक घोषणा केल्या आणि त्याची अंमलबजावणी झाली नाही. त्याबद्दल पत्रकारही त्यांना विचारत नाहीत आणि देवेंद्र फडणवीसही सांगत नाहीत. देवेंद्र फडणवीस यांना खरे तर 'क्लीन चीट'चे बादशहा म्हणून जाहीर करायला हवे कारण त्यांनी जितक्या भ्रष्टाचारी आणि वादग्रस्त प्रकरणातील अधिकारी तसंच मंत्र्यांना 'क्लीन चीट' दिली,तेवढी महाराष्ट्राच्या आजवरच्या इतिहासात कुणाही मुख्यमंत्र्यांना



दिलेली नाही. खरे तर, मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या पण, अंमलात न आलेल्या घोषणा आणि 'क्लीन चीट'यांची चौकशी करण्यासाठी एखाद्या निपक्षपाती आणि स्वतंत्र आयोगाची स्थापना करायला हवी.

देवेंद्र फडणवीस राज्याचे एक अग्रगण्य नेते आहेत अभ्यासू आहेत महाराष्ट्राविषयी त्यांना तळमळ आहे, नितांत प्रेम आहे, त्यांचा कामाचा उरक मोठा तसंच धाडसी आहे, याबद्दल दुमत होण्याचे कारण नाही. परंतु त्याचा अर्थ विरोधी पक्षातले किंवा समाज माध्यमांवरुन सरकार आणि क्वचित फडणवीस यांच्यावर टीका करणारे सर्वजण महाराष्ट्राचे शत्रू आहेत, भाड्याचे तट्टू आणि कुत्रे आहेत, असे समजण्याचे कारण नाही. टीका करणारे याच महाराष्ट्रात जन्मले आणि याच महाराष्ट्रात मरणार आहेत, हे देवेंद्र फडणवीस यांनी विसरता कामा नये. ज्यांचा धर्म महाराष्ट्र आहे त्या धर्माला जागून जर विरोधी पक्ष आणि जनतेतील भाजप विरोधी काही पत्रकार किंवा सामान्य लोकांनी जर सरकारच्या कामकाजावर टीका केली तर ती समजून घेण्याची मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांच्याकडून रास्त अपेक्षा आहे. आमदार असताना देवेंद्र फडणवीस अशा समंजसपणाने वागत असत अशा अनेक घटना प्रस्तुत पत्रकाराला जवळून ठाऊक आहेत पण,मुख्यमंत्री झाल्याच्या नंतर आणि त्यातही विशेषतः मुख्यमंत्रीपदाच्या दुसऱ्या कारकिर्दीत देवेंद्र फडणवीस एवढे बेदरकार का झाले असा प्रश्न साहजिकच अनेकांच्या मनात निर्माण झाला आहे.

पक्ष फोडणे तरी नामानिराळे राहण्याच्या बाबतीत देवेंद्र फडणवीस यांचे कौशल्य वादातीत आहे. ज्या पद्धतीने त्यांनी उद्धव ठाकरेंची शिवसेना आणि शरद पवारांची (महा)राष्ट्रवादी काँग्रेस हे दोन पक्ष फोडले आणि तरी ते नामानिराळे राहिले यावरुन त्यांच्यावर खरे तर भरपूर टीका करता आली असती परंतु राजकारणात या गोष्टी चालणारच म्हणून त्या महाराष्ट्रात खपवून घेतल्या हे विसरुन देवेंद्र फडणवीस टीकाकारांवर घसरले आहेत.त्यामुळे तर फडणवीस हुरळून बेताल झाले नाहीत ना?असा प्रश्न पडतो. देवेंद्र फडणवीस यांचे राजकीय गुरु नरेंद्र मोदी आणि अमित शहा हेही राजकारणी म्हणून सुसंस्कृत बोलण्या-चालण्याबद्दल ओळखले जात नाहीत.त्यांच्याच पावलावर पाऊल टाकून देवेंद्र फडणवीस यांचा प्रवास सुरु झालेला आहे की काय अशी शंका देवेंद्र फडणवीस यांच्या विधानसभेतील वक्तव्यामुळे निर्माण झाली आहे.आणखी एक मुद्दा म्हणजे, मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांच्यावर कामाचा मोठ्ठा बोझा आहे.मुख्यमंत्रीपदाशिवाय गृह, अर्थ,उर्जा,सामान्य प्रशासन अशी खाती आणि राज्याचे पक्ष नेते म्हणूनही त्यांच्यावर 'असंख्य' जबाबदाऱ्या आहेत. त्यामुळे आलेल्या तणावाचा वैताग देवेंद्र फडणवीस यांच्याकडून सभेत व्यक्त केला गेला नाही ना?अशीही शंका घेण्यास भरपूर वाव आहे.

महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री बॅरिस्टर अब्दुल रहमान अंतुले यांच्यावर 'अख्ख्या महाराष्ट्राचें लाडके व्यक्तिमत्व' असलेल्या पु.ल.देशपांडे यांनी 'अंतुले तुम्हारा चुक्याच' या शब्दात टीका केली होती.टीका करणारा तो लेख महाराष्ट्र टाईम्स या दैनिकात प्रकाशित झाल्याचे अजूनही आठवते. मात्र वाचाळ असणारे अंतुलेही त्यावर व्यक्त झाले नव्हते कारण झालेली टीका समजून घेण्याचा उमदेपणा त्यांनी त्यावेळेस दाखवला होता. देवेंद्र फडणवीस संघाच्या मुशीत तयार झाले आणि अटल बिहारी वाजपेयी तसंच लालकृष्ण अडवाणी यांच्या राजकीय संस्कारात घडले असे सांगितले जाते. मात्र संघ,वाजपेयी आणि अडवाणी यांनी देवेंद्र फडणवीस यांना उमदेपणा शिकवला नाही असे किमान मी तरी म्हणणार नाही किंबहुना त्यांनी शिकवलेला उमदेपणा विरोधकांवर हल्ला चढवताना देवेंद्र फडणवीस यांना दाखवता आला नाही,हा दोष देवेंद्र फडणवीस यांचाच आहे असे म्हणावे लागेल. तो संस्कार विसरुन देवेंद्र फडणवीस यांनी संजय राऊत यांची तर शिकवणी लावली नाही ना असा प्रश्न पडला.'बघून घेण्या'ची भाषा वापरुन संजय राऊत आणि अन्य वाचाळवीरांवर टीकास्त्र सोडण्याची संधी देवेंद्र फडणवीस यांनी गमावली आहे कारण तेच त्या वाचाळवीरांच्या पंक्तीत जाऊन बसले आहेत.

माणूस म्हटले की चुका होणारच.प्रत्येक माणूस कधी ना कधी कोणती न कोणती चूक करतोच मात्र, त्या चुकीतून धडा शिकणारा माणूस हा समंजस आणि अधिक परिपक्व होत जातो. बेताल आणि निषेधार्ह वक्तव्य करण्याची देवेंद्र फडणवीस यांची ही चूक पहिलीच ठरावी अशी अपेक्षा आहे. तरीही त्यांनी केलेली ही चूक विसरता येणार नाही. पु ल देशपांडे यांच्या भाषेत सांगायचे तर,'देवेंद्र फडणवीस तुम्हारा चुकीच चुक्याच!'

**प्रवीण बर्दापूरकर**
भ्रमणध्वनी-
९८२२०५५७९९

# शेख हसीना बांगलादेशमध्ये परतणार!

बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना वाजेद या गेली दोन वर्षे भारतात वास्तव्य करत आहेत.जुलै २०२४ मध्ये बांगलादेशात सुरू झालेल्या विद्यार्थी आंदोलनाने उग्ररूप धारण केल्यानंतर ५ ऑगस्ट २०२४ रोजी स्वतःच्या सुरक्षेसाठी शेख हसीना यांनी बांगलादेश मधून पळ काढला आणि त्या भारताच्या आश्रयाला आल्या.तेंव्हा पासून त्या दिल्ली येथे वास्तव्य करत आहेत.शेख हसीना यांनी नुकतीच अशी घोषणा केली आहे की येत्या डिसेंबर महिन्यात त्या बांगलादेशला परतण्याची शक्यता आहे.रॉयटर वृत्तसंस्थेला फोन वरून दिलेल्या मुलाखतीत शेख हसीना यांनी ही घोषणा केली आहे.

शेख हसीना यांना त्यांच्या गैरहजेरीत, बांगलादेश मधील न्यायालयाने फाशीची शिक्षा सुनावली आहे.जुलै २०२४ मध्ये आरक्षणाच्या मुद्द्यावरून बांगलादेश मधील विद्यार्थ्यांनी जे आंदोलन छेडले होते,ते पाशवी बळाचा वापर करून, चिरडण्याचे आदेश शेख हसीना यांच्या नेतृत्वाखालील सरकारने दिल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवून न्यायालयाने त्यांना दोषी ठरवले होते आणि त्यांना फाशीची शिक्षा सुनावली होती.शेख हसीना यांनी मुलाखतीत म्हटले आहे की,मी बांगलादेशात परतल्यावर मला अटक होऊ शकेल.कदाचित माझी हत्याही होऊ शकेल पण मी त्याला घाबरत नाही.मला मरण यायचेच असेल तर ते माझ्या मायभूमीत यावे अशी माझी इच्छा आहे.शेख हसीना या १९९६ साली पहिल्यांदा बांगलादेशच्या पंतप्रधान झाल्या.खलेदा झिया यांच्या नेतृत्वाखालील



सरकारचा मधला काही काळ सोडला तर, शेख हसीना यांनी जवळपास २० वर्षे देशाचे पंतप्रधानपद भुषविले.२००९ ते २०२४ या काळात बांगलादेशमध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुका शेख हसीना यांच्या पक्षाने गैरमार्गाने जिंकल्याचा आरोप विरोधी पक्षांकडून त्यांच्यावर वारंवार करण्यात आला.त्यावेळी प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीने ( आता हा पक्ष बांगलादेशमध्ये सत्तेवर आहे ) त्या निवडणुकांवर बहिष्कार घातल्याने,त्या निवडणुका म्हणजे फार्स ठरल्या होत्या.

जुलै २०२४ मध्ये बांगलादेशात सरकारी नोकऱ्यांमध्ये ५६ टक्के आरक्षण होते.त्या बाबत, बांगलादेश मधील बेरोजगार तरुणांत प्रचंड असंतोष होता.त्यावेळच्या ५६ टक्के आरक्षणात ३० टक्के जागा बांगलादेश स्वातंत्र्य संग्रामात भाग घेतलेल्या स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलांकरता आणि नातवंडां करता आरक्षित होत्या.१० टक्के जागा महिलांसाठी आरक्षित होत्या, तेवढ्याच म्हणजे १० टक्के जागा मागास जिल्ह्यां मधील नागरिकांसाठी आरक्षित होत्या. ५ टक्के जागा अल्पसंख्य समाजासाठी आणि १ टक्का जागा अपंगांसाठी आरक्षित होत्या.विद्यार्थ्यांच्या आणि बेरोजगारांच्या असंतोषाची मोठी ठिणगी जुलै २०२४ च्या दुसऱ्या आठवड्यात पडली.ढाका विश्वविद्यालय आणि इतर विश्वविद्यालय मधील विद्यार्थी आरक्षणाच्या विरोधात रस्त्यावर उतरले शेख हसीना यांच्या नेतृत्वाखालील सरकारने हे आंदोलन बंदुकीच्या जोरावर चिरडण्याचा प्रयत्न केला.त्यामध्ये एक हजारच्यावर आंदोलक मारले गेले. दरम्यान बांगलादेशच्या सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणाबाबत निकाल जाहीर करताना ९३ टक्के जागा गुणवत्ते वर भरण्याचा आदेश दिला.उरलेल्या आरक्षित ७ टक्क्यांपैकी ५ टक्के जागा स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांसाठी,१टक्का जागा आदिवासींसाठी आणि १ टक्का जागा अपंगांसाठी राखीव ठेवण्याचा आदेश न्यायालयाने दिला.नंतर आंदोलकांनी शेख हसीना यांच्या घरावर हल्ला केला.मात्र त्या अगोदर शेख हसीना या बांगलादेशातून पळून गेल्याने त्यांचा जीव वाचला.तेंव्हा पासून म्हणजे ५ ऑगस्ट २०२४ पासून शेख हसीना या भारतात वास्तव्य करत आहेत.त्यांना बांगलादेशच्या हवाली (प्रत्यार्पण) करण्याची मागणी बांगलादेशकडून भारताकडे अनेक वेळा करण्यात आली आहे.शेख हसीना भारताच्या आश्रयाला आल्यानंतर बांगलादेशात मोहंमद युनूस यांच्या नेतृत्वाखाली अंतरिम सरकार तेथे सत्तेवर आले.त्या सरकारने अवामी लीग पक्षावर बंदी घातली.अवामी लीगच्या अनेक नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना अटक करण्यात आली.मात्र शेख हसीना यांनी ऑनलाईनच्या माध्यमातून बांगला देशातील अवामी लीगच्या कार्यकर्त्यांशी आणि नेत्यांशी आपला संपर्क कायम ठेवला आहे.हसीना यांच्या नेतृत्वाखालील अवामी लीग या पक्षावर बांगलादेशमध्ये बंदी घालण्यात आली असली तरी त्या पक्षाचे काम थांबलेले नाही.शेख हसीना यांनी जाहीर केल्याप्रमाणे त्या डिसेंबर महिन्यात बांगलादेशमध्ये परतल्यावर त्यांची तेथील लोकप्रियता लक्षात घेता,त्यांना अटक करणे, तारिक रेहमान यांच्या नेतृत्वाखालील, बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीच्या सरकारसाठी अतिशय अवघड काम असेल.

**अभय गोखले**

# जबाबदारी शिकवणारे आत्मकथन म्हणजे 'बाप माझा'

साहित्यामध्ये आत्मकथनाचे विशेष स्थान आहे.आत्मकथन बरेच लेखक स्वतः लिहितात,ज्यांना लिहिणे जमत नाही अश्या व्यक्तिवर इतर लेखक लिहीतात. आत्मकथन म्हणजे त्या व्यक्तिच्या जगण्याचा लेखाजोखा असतो. सुख दुःखाची गोळाबेरीज असते. असेच एक आत्मकथन इंजिनिअर दीपक दारव्हेकर यांचे 'बाप माझा' हे वाचले.या आत्मकथनाचे वैशिष्टय म्हणजे कोठेही आत्मस्तुती नाही, अतिशयोक्ती नाही, आत्मप्रौढी नाही. लेखक जसे जगले तसे त्यांनी आत्मकथन लिहिलेले आहे. आत्मकथनाचा केंद्रबिंदू लेखकाचे वडील आहे. वडीलांचा संघर्ष, त्यांनी जगतांनी पचवलेला अपमान, प्रपंच चालवतांनी आणि मुले घडवितांनी बरेचदा इतरासमोर पत्करलेली शरणागती हे सारे काही 'बाप माझा' या आत्मकथनात आहे.

आता बऱ्याच वाचकांना असे वाटेल,त्यात काय एवढे? सर्वच वडील आपल्या मुलांकरीता आणि कुंटुंबा करीता अशा प्रकारचे कर्तृत्व पार पाडतच असतात, पण लहानपणी वडीलांनी घेतलेले कष्ट,सक्षम झाल्यावर, कमावते झाल्यावर, आयुष्यात काही मिळवल्यानंतर एखाद्या व्यक्तीला आपल्या वडीलांवर लिहावसं वाटणे हे फार मोठे काम आहे. कारण कोणतेही पुस्तक लिहायचे म्हटले तर वर्षभर लिखाणाची बैठक करावी लागते आणि बराच खर्चही करावा लागतो. हे लेखकाने अतिशय पोटतिडीकेने केलेले आहे.आपल्या आत्मकथनाचे प्रेरणा स्थान ते आपल्या मुलांना ठरवितात.

आपले आत्मकथन म्हणजे मागासलेपणाचा अहेर होईल, पण लिहीले तर अपमान, दुःख, दारिद्रय, यातना याचा आयुष्यात जो सतत कोंडमारा होतो त्याचा निचरा होईल.आयुष्याचे हे असेच आहे. त्या व्यक्त केल्या तर संवेदनशिल लेखकाला फार रिलॅक्स वाटतो. शब्दांमध्ये प्रचंड ताकद आहे, त्यामुळेच ते आत्मकथन लिहू शकले. लेखकाचे वाचन म्हणजे छटाकभर, अर्धी छटाक वस्तू ज्या कागदात यायची,तो किराणाचा कागद म्हणजे लेखकाचे वाचन. आपल्या वडीलांची ओळख लेखकाने इतक्या खरेपणाने वाचकांना करून दिलेली आहे.त्याच्या खरेपणातच लेखकाच्या साहित्याचे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व दडलेले आहे. लेखक आपल्या वडीलांची ओळख करून देतांना म्हणतात, 'मी माझ्या बापाचा एकेरी उल्लेख करीत आहे, कारण माझा बाप कुणी सामाजिक दृष्ट्या मोठा तत्वचिंतक, महान व्यक्ती नव्हता. तो सर्व साधारण अशिक्षित आणि सामाजिक ओळख नसलेला गरीब सामान्य माणूस आहे'. आजच्या डिजीटल युगात अशा आत्मकथनाची खूप गरज आहे. कारण आय. टी. क्षेत्रातील काही मुले, विदेशात गेलेली काही मुले यांना आपल्या धोतरनेश्या बापाची, डोक्यावर गांधी टोपी घातलेल्या बापाची, पायात तुटलेली चप्पल असलेल्या बापाची, ज्या बापाला इंग्रजी बोलता येत नाही अशा बापाची ओळख करून देतांनी लाज वाटते. लेखकाने आपल्या आई वडीलांचा पुस्तकात फोटो टाकून वाचकां समोर शब्दांकित केलेले आहे.

**समीक्षण**

वडीलांचा संघर्ष लिहितांना आपल्या आत्मकथनातून त्यांनी आईचा संसारही लिहिला. आईच्या हातचा मार न रडता लेखक जेव्हा सहन करतो, तेव्हा आजच्या मुलासारखे उलट उत्तर न देता, आई वडिलांशी कोणतीही मुजोरी न करता आजाणत्या वयात लेखक आत्मचिंतन करतो. सर्व घटनांमुळे अंतर्मुख होतो. सगळा दोष तो घरातील गरीबीला देतो. आत्मकथन पूर्ण झाल्यानंतर लेखकाने एक खंत व्यक्त केलेली आहे. आज समाजात लेखक दिपकजी दारव्हेकर यांचे मानाचे स्थान आहे. पण लेखकाने' बाप माझा' हे आत्मकथन लिहून उतराई होण्याचा थोड्या-फार प्रमाणात प्रयत्न केलेला आहे.

आत्मकथनात वऱ्हाडी जगणे आहे, सण आहे. नवीन पिढीला काही शब्द कळणार नाही म्हणून त्यांनी विश्लेषण केलेले आहे. पान नंबर ७ वर 'फूलोरा' हा शब्द आहे. म्हणजे लोखंडी जाळीवर करंज्या,पापड्या, अनारसे अशा जिनसा लटकवून ठेवणे व ते देवाला अर्पण करणे. शेवटी प्रसाद म्हणून खाणे. आत्मकथन १४० पानांचे आहे. प्रत्येक पान जगण्याची किमया शिकवते,पण एक प्रसंग वाचकाला हेलावून सोडतो. लेखक खूप आजारी असतात. गावात दवाखाना नाही, डॉक्टर नाही. पाच सहा किलोमिटर लेखकाचे वडील अनवानी पायाने भर उन्हात डॉक्टरकडे लेखकाला घेऊन जातात. डॉक्टरकडे खूप गर्दी असते. अडाणी वडील मुलाच्या प्रेमापोटी, आपला मुलगा या आजारातून लवकर बरा व्हावा म्हणून थेट डॉक्टरांच्या पायाशी लोटांगण घालतात आणि माझ्या मुलाला डॉक्टर साहेब अगोदर तपासा म्हणून गळ घालतात. एक बाप आपुल्या मुलांकरीता काय करू शकतो हे यातून कळते.

वाचकांच्या मनाला भिडणारे, आत्मचिंतन करायला लावणारे लेखकाचे हे आत्मकथन आहे. मुखपृष्ठ अतिशय बोलके आहे.'बाप माझा' वाचतांना लेखक कसे घडले याची जाण होते. असे आत्मकथन आपण वाचलेच पाहिजे.

**रजिया सुलताना**
देहु रोड,पुणे
मो. ९५२७३९९८६६



# जामीन म्हणजे निर्दोषत्व नाही!

एखाद्या व्यक्तीला अटक झाली आणि दुसऱ्याच दिवशी तो जामिनावर बाहेर आला की,समाजात अनेकदा एकच चर्चा सुरू होते 'पैसे वापरले असतील','ओळखी लावल्या असतील', किंवा 'तो निर्दोष आहे म्हणून सोडला.' प्रत्यक्षात या तिन्ही समजुती अनेक वेळा चुकीच्या असतात.जामीन म्हणजे गुन्ह्यातून निर्दोष घोषित होणे नव्हे.जामीन म्हणजे न्यायालयाने काही अटींवर आरोपीला खटल्याचा निकाल लागेपर्यंत तात्पुरते स्वातंत्र्य देणे. आरोपी दोषी आहे की निर्दोष, याचा अंतिम निर्णय केवळ न्यायालय पुराव्यांच्या आधारे देते.

**जामीन म्हणजे नेमके काय?**

जामीन हा न्यायव्यवस्थेतील एक महत्त्वाचा सिद्धांत आहे. भारतीय कायद्यानुसार प्रत्येक आरोपीला न्यायालयात स्वतःचा बचाव करण्याची संधी मिळाली पाहिजे. म्हणूनच, आवश्यक अटी पूर्ण झाल्यास न्यायालय आरोपीला जामिनावर सोडू शकते.

यामागील मूलभूत विचार असा आहे की जोपर्यंत न्यायालय दोष सिद्ध करत नाही, तोपर्यंत प्रत्येक आरोपीला कायद्याच्या दृष्टीने निर्दोष मानले जाते.

जामीनाचे प्रमुख प्रकार-नियमित जामीन,अटकपूर्व जामीन,अंतरिम जामीन,डिफॉल्ट जामीन,वैयक्तिक बाँडवर जामीन, जिथे कायदा व न्यायालय परवानगी देतात.

जामीनदार कोण असतो?अनेकांना वाटते की जामीन मिळवण्यासाठी फक्त पैसे भरावे लागतात. प्रत्यक्षात अनेक प्रकरणांमध्ये न्यायालय जामीनदार मागते.जामीनदार म्हणजे अशी व्यक्ती जी न्यायालयाला हमी देते की आरोपी न्यायालयाने घातलेल्या अटींचे पालन करेल आणि प्रत्येक तारखेला न्यायालयात हजर राहील. आरोपी पळून गेला किंवा अटींचे उल्लंघन केले, तर न्यायालय कायद्यानुसार जामीन बाँड जप्त करण्याची प्रक्रिया सुरू करू शकते.जामीनदार हा नातेवाईकच असावा असे बंधन नाही. मित्र, शेजारी किंवा इतर विश्वासार्ह व्यक्तीही न्यायालयाच्या समाधानानुसार जामीनदार होऊ शकते.७/१२, घरपट्टीची पावती आणि जामीन.

जामीनदाराची आर्थिक क्षमता तपासण्यासाठी न्यायालय अनेकदा ७/१२ उतारा, घरपट्टी (मालमत्ता कर) पावती, मालमत्तेची कागदपत्रे किंवा इतर पुरावे मागवू शकते. समाजात एक गैरसमज आहे की ७/१२ किंवा घरपट्टीची पावती फक्त एकदाच जामीनासाठी वापरता येते. प्रत्यक्षात कायद्यात असा कोणताही सार्वत्रिक नियम नाही. अंतिम निर्णय संबंधित न्यायालय घेते. जर तीच मालमत्ता आधीच इतर जामीन प्रकरणांमध्ये वापरलेली असेल किंवा तिच्यावर इतर कायदेशीर बंधने असतील, तर न्यायालय त्या परिस्थितीचा विचार करून निर्णय देते.

उदाहरण-श्री. अ यांनी त्यांच्या ७/१२ उताऱ्याच्या आधारे एका आरोपीसाठी जामीन दिला. काही महिन्यांनी दुसऱ्या नातेवाईकाला जामीनाची गरज पडली. अशा वेळी 'एकदा ७/१२ वापरला आहे म्हणून पुन्हा वापरता येणार नाही' असा कोणताही कायदेशीर नियम नाही. मात्र न्यायालय त्या मालमत्तेची सद्यस्थिती, आधीची जबाबदारी आणि जामीनदाराची आर्थिक क्षमता तपासून निर्णय घेईल.

**जामीन देताना न्यायालय कोणत्या बाबी विचारात घेते?**

गुन्ह्याचे स्वरूप आणि गंभीरता.उपलब्ध प्राथमिक पुरावे.आरोपी पळून जाण्याची शक्यता.पुराव्यांमध्ये हस्तक्षेप किंवा साक्षीदारांवर दबाव टाकण्याची शक्यता.आरोपीचा पूर्वीचा गुन्हेगारी इतिहास.तपासावर होणारा परिणाम.

जामीन म्हणजे शिक्षा नाही-जामीन मिळाल्यानंतरही आरोपीला न्यायालयात नियमित हजर राहावे लागते, जामिनाच्या अटींचे पालन करावे लागते आणि तपासात सहकार्य करावे लागते. अटींचे उल्लंघन झाल्यास न्यायालय जामीन रद्द करू शकते.

सर्वोच्च न्यायालयाचे मत-सर्वोच्च न्यायालयाने अनेक निर्णयांत 'Bail is the rule, Jail is the exception' हे तत्त्व अधोरेखित केले आहे. याचा अर्थ प्रत्येक आरोपीला आपोआप जामीन मिळतो असा नाही; तर अनावश्यक कारावास टाळणे आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचे संरक्षण करणे हा न्यायव्यवस्थेचा मूलभूत दृष्टिकोन आहे. प्रत्येक प्रकरणाचा निर्णय त्यातील तथ्ये आणि कायदेशीर निकषांवर अवलंबून असतो.

**समाजातील गैरसमज**

गैरसमजः जामीन मिळाला म्हणजे आरोपी निर्दोष आहे.

वास्तवः अंतिम निर्णय खटल्याच्या शेवटी होतो.

गैरसमजः जामीन फक्त श्रीमंत लोकांनाच मिळतो.

वास्तवः जामीनाचा निर्णय कायदेशीर निकषांवर घेतला जातो.

गैरसमजः ७/१२ किंवा घरपट्टीची पावती फक्त एकदाच जामीनासाठी वापरता येते.

वास्तवः असा कोणताही सार्वत्रिक कायदेशीर नियम नाही; निर्णय न्यायालय परिस्थितीनुसार घेते.

निष्कर्ष-जामीन हा न्यायव्यवस्थेतील एक महत्त्वाचा कायदेशीर अधिकार आहे. तो निर्दोषत्वाचा दाखला नसून, खटल्याचा निकाल लागेपर्यंत दिलेले सशर्त स्वातंत्र्य आहे. जामीनदाराची जबाबदारी, न्यायालयाच्या अटी आणि कायद्याचे पालन या सर्व बाबी तितक्याच महत्त्वाच्या आहेत.म्हणूनच, अफवांवर विश्वास ठेवू नका, कायदा समजून घ्या आणि कोणत्याही प्रकरणात अनुभवी वकिलाचा सल्ला घ्या.

**ॲड. धनंजय देशमुख**
मो.९२८४३८२१०२

# निवडणूक आयोगाच्या कामात खाजगी व्यक्तींचा हस्तक्षेप? पातूरमध्ये बीएलओवर गंभीर आरोप

## गणना प्रपत्र वाटपासाठी मजुरीवर व्यक्ती नियुक्त केल्याचा दावा; तहसीलदारांकडून चौकशीचे आश्वासन

■ प्रदीप काळपांडे ■

**पातूर :** पातूर शहरातील प्रभाग क्रमांक १० मध्ये मतदार यादी विशेष पुनरीक्षण मोहिमेदरम्यान निवडणूक आयोगाच्या कामकाजाबाबत गंभीर आरोप समोर आले आहेत. नागरिकांच्या घरी जाऊन गणना (एन्युमरेशन) प्रपत्र वितरित करण्याची जबाबदारी असलेल्या बूथ लेव्हल ऑफिसर (बीएलओ) यांनी हे काम स्वतः न करता मजुरीवर खाजगी व्यक्तींकडून करून घेतल्याचा दावा करण्यात आला आहे. या आरोपांमुळे निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेबाबत प्रश्न उपस्थित होत असून, या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

मतदार यादी पुनरीक्षण प्रक्रियेत बीएलओची भूमिका अत्यंत महत्त्वाची मानली जाते. मतदारांच्या घरी भेट देऊन गणना प्रपत्र वितरित करणे, आवश्यक माहितीची पडताळणी करणे आणि मतदार नोंदणीसंदर्भातील प्रक्रिया पूर्ण करणे ही जबाबदारी संबंधित बीएलओवर असते. मात्र, पातूरमध्ये ही जबाबदारी कथितपणे खाजगी व्यक्तींमार्फत पार पाडण्यात आल्याचा आरोप समोर आला आहे.

या प्रकरणाशी संबंधित काही व्हिडिओ समोर आल्याचा दावाही करण्यात येत आहे. या व्हिडिओंच्या आधारे संबंधित बीएलओ यांनी अधिकृत कामासाठी इतर व्यक्तींची नियुक्ती केली होती का, तसेच त्यासाठी वरिष्ठांची कोणतीही परवानगी होती का, याबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत.



निवडणूक आयोगाच्या कामात मतदारांची वैयक्तिक माहिती आणि अधिकृत कागदपत्रांचा समावेश असल्याने अशा प्रकारच्या आरोपांकडे गांभीर्याने पाहिले जात आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून वस्तुस्थिती समोर आणावी, तसेच नियमांचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास संबंधितांवर कठोर प्रशासकीय कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

दरम्यान, या प्रकरणाची दखल घेत पातूरचे तहसीलदार राहुल वानखडे यांनी चौकशीचे आश्वासन दिले आहे. त्यांनी सांगितले की, बीएलओ यांनी स्वतः घरोघरी जाऊन एन्युमरेशन फॉर्मचे वितरण करणे आवश्यक आहे. समोर आलेल्या व्हिडिओंची तात्काळ चौकशी करण्यात येईल. चौकशीत संबंधित बीएलओकडून नियमांचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास त्यांच्यावर योग्य ती प्रशासकीय कारवाई करण्यात येईल.

या प्रकरणात चौकशीनंतर नेमकी वस्तुस्थिती काय समोर येते आणि निवडणूक प्रशासन याबाबत कोणती भूमिका घेते, याकडे पातूर तालुक्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

**‘व्हिडिओंची तात्काळ चौकशी केली जाईल’**

‘बीएलओ यांनी स्वतःच घरोघरी जाऊन एन्युमरेशन फॉर्मचे वितरण करणे गरजेचे आहे. समोर आलेल्या व्हिडिओंची तात्काळ चौकशी करण्यात येईल. चौकशीत नियमांचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास संबंधित बीएलओवर योग्य ती प्रशासकीय कारवाई करण्यात येईल.’

**राहुल वानखडे,** तहसीलदार, पातूर

# अ. भा. कुणबी समाज बहु. मंडळाचा कार्यक्रम

## पालकमंत्र्यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव



■ प्रतिनिधी | अकोला ■

अ.भा. कुणबी समाज बहु. मंडळ यांच्यातर्फे अकोला जिल्ह्यातील कुणबी समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा व समाज मेळावा राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड.आकाश फुंडकर यांच्या उपस्थितीत आज जि. प. कर्मचारी भवन येथे झाला.

कार्यक्रमाचा अध्यक्षस्थानी अकोला अर्बन बँकेचे माजी अध्यक्ष रामेश्वर फुंडकर होते. संतोष शिवरकार, राष्ट्रीय कीर्तनकार ह.भ.प. शुकदास महाराज गाडेकर यांच्यासह अ.भा. कुणबी समाज बहुउद्देशीय मंडळ पदाधिकारी सदस्य उपस्थित होते. समाजातील १० वी, १२ वी, तसेच जेईई, नीट, एमएचटी सीईटी, एनटीएस, शालेय शिष्यवृत्ती परीक्षा, विद्यापीठ, राज्यस्तरीय विविध परीक्षा, कला-क्रीडा, साहित्य संगीत आदी क्षेत्रातील अभ्यासक्रम व उपक्रम, एमपीएससी यूपीएससी, एमबीबीएस, एमडी आदी अभ्यासक्रम, स्पर्धा परीक्षा यात यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा पालकमंत्री ॲड. फुंडकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी पालकमंत्री यांनी गुणवंतांशी संवाद साधून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या, तसेच मंडळाच्या विविध उपक्रमांचे कौतुक केले.यावेळी मार्गदर्शक म्हणून प्रा. श्रीकांत लांडे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला जिल्ह्यातून समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ढोणे चित्रकला महाविद्यालयाचा शंभर टक्के निकाल



■ प्रतिनिधी | अकोला ■

म. रा. कला शिक्षण मंडळ मुंबई द्वारे नुकत्याच घोषित करण्यात आलेल्या पायाभूत वर्ग, कलाशिक्षक प्रशिक्षण वर्ग व जीडी आर्ट वर्ग या परीक्षेमध्ये स्थानीय जठारपेठ येथील बाबासाहेब ढोणे चित्रकला महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करून महाविद्यालयाच्या शिरपेच्यात मानाचा तुरा खोवला आहे.यावर्षीही महाविद्यालयाने आपल्या दैदीप्यमान यशाची परंपरा कायम राखत शंभर टक्के निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. विद्यार्थ्यांची ही कामगिरी अत्यंत कौतुकास्पद आहे.या परीक्षेत फाउंडेशन वर्गातून प्रथम शौर्य वानखडे,द्वितीय ग्रीष्मा कापसे, तृतीय आरती पडोळे यांनी बाजी मारली तर एटीडी प्रथम वर्ष परीक्षेत प्रथम समीक्षा राजनकर डिस्टिंक्शन,द्वितीय प्रांजली काजळे व तृतीय चित्रा शर्मा आली.एटीडी द्वितीय वर्ष मध्ये प्रथम गायत्री बेलपत्रे डिस्टिंक्शन, द्वितीय अंजली घाटे,डिस्टिंक्शन, तृतीय विपश्यना गोपनारायण आली.जीडी आर्ट ॲडव्हान्स परीक्षेत प्रथममोहिनी विश्वकर्मा, द्वितीय कार्तिकी चव्हाण, तृतीय मानसी सुरेका व जीडी आर्ट पदविका मध्ये प्रथम ज्ञानेश्वरी लांडे आली.

# ‘आस्की किड्स पब्लिक स्कूल’ ठरली विशेष गुणवत्ताप्रधान शाळा

## शिष्यवृत्ती परीक्षेत विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

■ प्रतिनिधी | अकोट ■

आकोट येथील नामांकित आस्की किड्स पब्लिक स्कूल ने आपल्या दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणामुळे संपूर्ण तालुक्यात एक वेगळे व आदर्श स्थान निर्माण केले आहे.

शाळेच्या दूरदृष्टी आणि शिक्षकांच्या अथक मेहनतीचे फलित म्हणून, यंदाच्या वर्ग ५ वी आणि ८ वी च्या शिष्यवृत्ती परीक्षेत अनुक्रमे वर्ग ५ मधून अंश अनिरुद्ध माकोने आणि श्लोक हरिदास पंधरे तसेच वर्ग ८ मधून अश्विनी गणेश शेलकर, पूर्वी कैलास राऊत, राजदत्त सदानंद डिक्कर आणि विधी धनंजय उगले या विद्यार्थ्यांनी अतुलनीय व घवघवीत यश संपादन केले आहे. सदर परीक्षेसाठी शाळा प्रशासनाने अतिरिक्त मेहनत घेत विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासावर विशेष भर दिला. ज्यासाठी शीतल थिटे, सूरज जायले, तेजल शाह, प्रियांका देशमुख, अंकिता पोटे, वृषाली देशमुख, मंजुषा हरणे, यांनी योगदान दिले. त्यामुळेच वर्ग ५ वी आणि ८ वी च्या शिष्यवृत्ती परीक्षेत विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. पुस्तकी ज्ञानापलीकडे जाऊन विद्यार्थ्यांना व्यावहारिक, क्रीडा आणि तंत्रज्ञान पूरक शिक्षण देण्यावर शाळेचा भर आहे केवळ शिष्यवृत्तीच नव्हे, तर विविध शालेय स्पर्धा परीक्षांमध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांचा सहभाग नोंदवून त्यांच्यामध्ये आत्मविश्वास व स्पर्धात्मक वृत्ती रुजवण्याचे काम शाळा करत आहे. शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक आणि संस्थाचालकांच्या मार्गदर्शनाची दूरदृष्टी व विद्यार्थ्यांसाठी घेतलेली अहोरात्र मेहनत या यशामागचे मुख्य रहस्य आहे.आस्की किड्स पब्लिक स्कूलच्या या नेत्रदीपक कामगिरीबद्दल तालुक्यातील पालक, शिक्षणतज्ज्ञ आणि विविध मान्यवरांकडून शाळेचे व यशस्वी विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक होत आहे. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्याचा पाया रचणारी ही शाळा भविष्यातही अशीच शैक्षणिक गुणवत्ता कायम ठेवेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, धर्मादाय संस्थेसाठी आवश्यक मान्यता

■ प्रतिनिधी | अकोला ■

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सुपर स्पेशालिटी रुग्णालय, अकोला यांना आयकर अधिनियम, १९६१ अंतर्गत कलम १२ एबी व कलम ८० जी अंतर्गत आवश्यक नोंदणी व मान्यता प्राप्त झाली. या मान्यतेमुळे उद्योग समूह, सार्वजनिक उपक्रम, कॉर्पोरेट संस्था, सेवाभावी संस्था तसेच दानशूर व्यक्तींना संस्थेस सीएसआर निधी अथवा देणगीच्या स्वरूपात रुग्णोपयोगी साहित्य, अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणे, औषधे, व्हेंटिलेटर, आयसीयु उपकरणे, डायलिसिस मशिन, मॉनिटर्स, रुग्ण बेड, व्हीलचेअर्स, स्ट्रेचर्स तसेच इतर आवश्यक यंत्रसामग्री उपलब्ध करून देता येणार आहे.

संस्थेला प्राप्त झालेल्या १२ एबी नोंदणीमुळे आयकर अधिनियमांतर्गत धर्मादाय संस्थेसाठी आवश्यक वैधानिक मान्यता प्राप्त झाली असून ८० जी मान्यतेमुळे संस्थेस पात्र देणगी देणाऱ्या देणगीदारांना आयकर अधिनियमातील लागू नियम व अटींनुसार कर सवलतीचा लाभ मिळू शकतो. त्यामुळे समाजोपयोगी कार्यासाठी उद्योग व दानशूर व्यक्तींचा सहभाग अधिक वाढण्यास मदत होणार आहे. सन २००२ मध्ये स्थापन झालेले शासकीय वैद्यकीय महाविद्यालय हे विदर्भातील महत्त्वाचे वैद्यकीय शिक्षण व आरोग्य सेवा केंद्र असून सन २०२४ पासून सुपर स्पेशालिटी रुग्णालयाची सेवाही सुरू झाली आहे. दररोज हजारो रुग्ण येथे उपचारासाठी येत असून अत्याधुनिक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सीएसआर निधी व लोकसहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे.

अधिष्ठाता यांनी सर्व उद्योगसमूह सीएसआर निधी उपलब्ध असलेल्या कंपन्या, बँका, सार्वजनिक उपक्रम, स्वयंसेवी संस्था, सामाजिक संस्था आणि दानशूर नागरिकांना सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव ठेऊन शासकीय आरोग्य सेवेला बळकटी देण्यासाठी उदारहस्ते योगदान देण्याचे आवाहन केले आहे.

ग्णांना होणारे प्रमुख फायदे अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणे उपलब्ध होतील हेंटिलेटर, आयसीयु मॉनिटर्स डायलिसिस मशिन, पोर्टेबल एक्स-रे, अल्ट्रासोनोग्राफी व इतर आवश्यक उपकरणे आधुनिक निदान यंत्रसामग्री वेळेत व दर्जेदार उपचार अत्याधुनिक उपकरणांमुळे आजारांचे लवकर निदान, गंभीर रुग्णांवर तातडीने उपचार शक्य. गरीब व गरजू रुग्णांना अधिक लाभ आवश्यक रुग्णोपयोगी साहित्य उपलब्ध झाल्याने रुग्णांचा वैयक्तिक खर्च कमी होऊ शकतो. आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना गुणवत्तापूर्ण उपचार मिळण्यास मदत.

आयसीयु व आपत्कालीन सेवांची गुणवत्ता वाढेल अधिक बेड, मॉनिटर्स व जीवनरक्षक उपकरणे उपलब्ध होतील.

# जेसीआय अकोला सिटीच्या वतीने वारकऱ्यांना मलम वाटप



■ प्रतिनिधी | अकोला ■

सामाजिक सेवेत कार्यरत जेसीआय अकोला सिटी यांनी पंढरपूरकडे जाणाऱ्या पदयात्रेतील वारकऱ्यांना मलम वाटप केले. ‘विठ्ठलाचे भक्तांचे सेवेचं काम म्हणजे विठ्ठलाची खरी आराधना’ या तत्वावरून आषाढी वारीच्या पवित्र प्रसंगानिमित्त जेसीआय अकोला सिटी यांनी भगवान श्री विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी पदयात्रा करणाऱ्या वारकऱ्यांसाठी मोफत झंडू बाम वितरणाचा सेवा उपक्रम राबवला.

लाखो वारकरी शेकडो किलोमीटरची कठीण पदयात्रा करून पंढरपूरपर्यंत पोहोचतात. या दीर्घ प्रवासादरम्यान होणारी स्नायूंची वेदना, थकवा आणि शारीरिक अस्वस्थता दूर करण्याच्या उद्देशाने जेसीआय अकोला सिटीने हे सेवा प्रकल्प आयोजित केले. वाटप करण्यात आलेला झंडू बाम वारकऱ्यांच्या संपूर्ण प्रवासादरम्यान त्यांच्या उपयोगी सिद्ध होईल आणि त्यांच्या प्रवासात अधिक सुलभता व आराम प्रदान करण्यास मदत करेल, असा विश्वास जेसीआय अकोला सिटीचे अध्यक्ष अमोल अग्रवाल यांनी व्यक्त केला.या सेवा अभियानात फक्त जेसीआय सदस्यच नव्हते, तर त्यांच्या कुटुंबांनीही उत्साहाने सहभाग घेतला. या आठवणीत अमित पडगिलवार, विपिन राठी, सीए अमर मुंढड़ा, कृष्णा लाहोटी, अनुप राठी, डॉ. शर्मा आणि ॲड. दीपक लाहोटी यांनी त्यांच्या पत्नी व मुलांसहित हा सेवा योग निभावला.

कुटुंबांच्या सहभागाने समाजाला हा प्रेरणादायी संदेश दिला की सेवेचे संस्कार तेव्हाच प्राप्त होतात जेव्हा संपूर्ण कुटुंब समाजहितासाठी एकत्र येते.या प्रसंगी जेसीआय अकोला सिटीचे अध्यक्ष अमोल अग्रवाल, सचिव अभय राठी, प्रोजेक्ट डायरेक्टर सीए पंकज लाडणिया, ॲड. अश्विन गट्टाणी, राणा झुनझुनवाला आणि सर्व सदस्यांनी सक्रिय सहभाग घेऊन वारकऱ्यांच्या सेवेला आपले सौभाग्य मानले.

## वारकऱ्यांच्या सेवेसाठी सामाजिक उपक्रमांना सुरुवात

■ प्रतिनिधी | अकोला ■

पंढरपूर वारीच्या पार्श्वभूमीवर वारकऱ्यांच्या सेवेसाठी विविध सामाजिक उपक्रमांना सुरुवात करण्यात आली आहे. या अभियानाअंतर्गत सुमारे पाच लाख जीवनावश्यक वस्तूंचे वितरण, मोफत आरोग्य तपासणी शिबिरे, ज्येष्ठ वारकऱ्यांसाठी आधाराच्या काठ्या, पोलिस कर्मचाऱ्यांसाठी रेनकोट व विशेष जॅकेट्स, तसेच पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण आणि कचरापेट्यांची व्यवस्था करण्यात येत आहे. या उपक्रमाचे उद्घाटन राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते झाले.फिनोलेक्स पाईप्स आणि मुकुल माधव फाउंडेशन यांच्या या सेवाभावी उपक्रमाबाबत प्रकाश पी. छाब्रिया म्हणाले, ’पंढरपूर वारी ही श्रद्धा, समर्पण आणि निःस्वार्थ सेवेचे प्रतीक आहे. ग्रामीण महाराष्ट्राने आमच्यावर दाखविलेल्या विश्वासाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी वारकऱ्यांची सेवा करण्याचा हा प्रयत्न असून, समाजसेवा समुदाय विकासाची ही परंपरा यापुढेही कायम राहील.’

# श्रद्धा, भक्ती आणि सामाजिक सलोखा यांचे दर्शन



■ प्रतिनिधी | अकोला ■

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी अकोल्यात हजरत ताजुद्दीन बाबा रहमतुल्लाह अलैह यांच्या १०४ व्या संदल मुबारकनिमित्त लंगर सेवा समिती, तारफैल यांच्या वतीने भव्य संदल मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत हजारो अकीदतमंदांनी सहभाग घेत श्रद्धा व्यक्त केली.

समितीचे अध्यक्ष नसीर बाबा यांच्या नेतृत्वाखाली निघालेली संदल मिरवणूक तारफैल येथून सुरू होऊन मानेक टाकीज चौक, सिटी कोतवाली, गांधी रोड, नवीन बसस्थानक मार्गे रेल्वे स्टेशनपर्यंत पोहोचली. संपूर्ण मार्गावर भाविकांनी फुलांची उधळण करून संदलचे उत्साहात स्वागत केले.

या सोहळ्यात रामदासपेठ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शिरीष खंडारे, शिवसेना नेते आकाश, डॉ. अल्लामा रफीक आलम हुसेनी, जब्बार बाबा, अबुल उलई गुलाब बाबा नक्शबंदी, काझी इफ्तेखार हुसेन, अनीस नक्शबंदी, हनीफ बाबा नक्शबंदी, ताज बाबा नक्शबंदी, राजू बाबा उर्फ साहिल नजीब शेख, वसीम , महमूद खान पठाण आदी उपस्थित होते.


# उपवर्गीकरणाला विरोध व समर्थन दिल्याने कुणी खरा आंबेडकरवादी सिद्ध होऊ शकत नाही

## अनुसूचित जाती जागृती एक्य परिषदमधील सूर

■ प्रतिनिधी | अकोला ■

अनुसूचित जाती मधील आरक्षणाच्या उपवर्गरीकरण संदर्भात खऱ्या पद्धतीने ते झाले पाहिजे, मात्र त्यात अनेक अटी आहेत. त्या म्हणजे ते अचूक लोकसंख्या व अचूक इम्पेरिकल डाटावर आधारित असले पाहिजे, या अनुषंगाने निर्माण करण्यात आलेला बजर समितीचा अहवाल ही हा जगजाहीर झाला पाहिजे, त्याचप्रमाणे उपवर्गीकरण मधील क्रिमिलियर हे रद्द झाले पाहिजे,तसेच आरक्षण च्या संदर्भाततील बिंदू नामावलीतील जाहीर झालेले पदाचे आरक्षण जर योग्य उमेदवार मिळाला नाही तर ओपन मधून भरण्यात येणार काय याचा खुलासा शासनाने केला पाहिजे.तरच ते खऱ्या अर्थाने अ ब क ड उपवर्गीकरण होऊ शकेल, अन्यथा हा एक भ्रमनिरास ठरणार असल्याचा सूर अनुसूचित जाती जागृती ऐक्य परिषद मधून उमटला.आरक्षणाचे जनक छत्रपती राजश्री शाहू महाराज यांच्या १५२ व्या जयंतीनिमित्त भारत मुक्ती मोर्चा,लहुजी क्रांती मोर्चा, राष्ट्रीय गुरु रविदास क्रांती मोर्चा व बुद्धिस्ट इंटर नॅशनल नेटवर्कच्या संयुक्त विद्यमाने रविवारी स्थानीय द्वितीय अनुसूचित जाती जागृती ऐक्य परीषदचे आयोजन रविवारी प्रमिलाताई ओक हॉल येथे करण्यात आले होते.या एक दिवसीय जागृती ऐक्य परिषदेत अनुसूचित जाती प्रवर्ग तयार करण्यामागील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका,आरक्षणाच्या लाभार्थी जाती समूहामध्ये अंतर्गत भांडणे लावून आरक्षणाच्या मूळ संकल्पना संपवण्याचे षडयंत्र, अनुसूचित जातीतील शासन प्रशासनात असणारी प्रतिनिधित्वतील असमानता- एक चिंतन या विषयावर उपस्थित वक्त्यांनी तांत्रिक व शास्त्रशुद्ध मार्गदर्शन केले.लहुजी क्रांती मोर्चाचे राज्य अध्यक्ष प्रा.विकास पाथरीकर यांच्या अध्यक्षतेत संपन्न झालेल्या या कार्यक्रमात उद्घाटक म्हणून गुरु रविदास चर्मकार महासंघाचे संस्थापक अध्यक्ष लक्ष्मणदादा घुमरे तर प्रमुख पाहुणे म्हणून बामसेफचे राज्य महासचिव संतोष सुरवाडे, भारत मुक्ती मोर्चाचे राज्य अध्यक्ष भागवत जाधव, भारत मुक्ती मोर्चा महिला शाखेच्या राज्य प्रभारी संध्या गवई, बुरुड समाज संघटनेचे विनायकराव पदगिरवार बामसेफचे विभागीय सहभागी गोवर्धन गवई, बुद्धिस्ट इंटरनॅशनल महिला संघाच्या डॉ पंचशीला मोहोड, राष्ट्रीय परिवर्तन मोर्चाचे राज्य संयोजक शाम अवचार,लहुजी शक्ती सेना अमरावती विभागीय अध्यक्ष डॉ रमेश चंदनशिव, बहुजन मुक्ती पार्टीचे चंदन वानखडे,रविदास क्रांती मोर्चाचे सुरेश उंबरकर,राष्ट्रीय मूलनिवासी महिला संघाच्या प्रदेश उपाध्यक्ष विजया जंजाळ, बाबा मोहोड, कार्यक्रम प्रभारी संतोष सुरवाडे आदी मान्यवर उपस्थित होते.सर्वप्रथम छत्रपती शाहू महाराज, गुरू संत रविदास,डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा पूजनाने या कार्यक्रमाचा प्रारंभ झाला.आपल्या अध्यक्षीय मनोगतात कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा विकास पाथरीकर यांनी अनुसूचित जाती आरक्षण उप वर्गीकरणाची खरी मीमांसा केली.उपवर्गीकरण मुळे अनुसूचित जाती प्रवर्गात असंतोष निर्माण झाला आहे. जातीजातीत वैमानस्य निर्माण करण्याचा प्रघात सुरू झाला आहे. तथापि या उपवर्गीकरणाचा कुणी विरोध वा समर्थन केल्याने तो खरा आंबेडकरवादी सिद्ध होऊ शकत नाही. सरकारची सर्वप्रथम या संदर्भातील भूमिका व संकल्पना काय आहे,हे समजून घेतले पाहिजे.या आधी अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळ व आताचे आर्टी यामधून किती विकास होत आहे, हे शोधले पाहिजे. यामधूनच या ज्वलंत विषयावर उत्तर मिळू शकणार असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले. ऐक्य परिषदेत उद्घाटक गुरु रविदास चर्मकार महासंघाचे संस्थापक अध्यक्ष लक्ष्मणदादा घुमरे यांनी आपले प्रखर विचार मांडीत यास प्रखर विरोध करीत हा मागास जाती विकासापासून दूर करण्याचा कट्टर धर्मांध सरकारी डाव असल्याचे सांगितले. यावेळी उपस्थित अनेक वक्त्यांनी आपले मत व्यक्त करीत आरक्षण उपवर्गीकरण हा अनुसूचित जाती प्रवर्गातील जातींचे आरक्षण कमी करण्याचा सरकारचा छुपा अजेडा असल्याचे अनेक उदाहरणे देऊन स्पष्ट केले.प्रास्तविक

राष्ट्रीय अन्याय अत्याचार निवारण शक्तीचे विभागीय प्रभारी एड सारंग निखाडे यांनी करून या ऐक्य परिषदची भूमिका स्पष्ट केली.संचालन विजेंद्र वानखडे यांनी तर आभार राजू वानखडे यांनी मानलेत.यावेळी भारत मुक्ती मोर्चा, लहुजी क्रांती मोर्चा, राष्ट्रीय गुरु रविदास क्रांती मोर्चा व बुद्धिस्ट इंटरनॅशनल नेटवर्कच्या समस्त पदाधिकारी व नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २१५**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# ४ महिन्यांच्या पाठपुराव्यानंतर व्यापाऱ्यानेच मोकळी केली बुजलेली नाली

## स्वखर्चाने उचलली जबाबदारी



**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** प्रशासनाच्या दारात वारंवार हेलपाटे मारूनही प्रश्न सुटत नसेल, तर काही नागरिक स्वतः पुढाकार घेऊन समस्येवर उपाय शोधतात. चांदूर रेल्वे शहरातील जुना मोटार स्टॅन्ड परिसरात असेच एक सकारात्मक उदाहरण पाहायला मिळाले. जुना मोटार स्टॅन्डवरील जुनी चौधरी चाळ समोरील नाली सुमारे २० ते २५ वर्षांपूर्वी बांधण्यात आली होती. मात्र गेल्या पाच वर्षांपासून ही नाली पूर्णपणे बुजल्यामुळे परिसरातील हॉटेल व दुकानदारांना सांडपाण्याचा मोठा त्रास सहन करावा लागत होता. नाली बंद असल्याने सांडपाणी इकडे-तिकडे सोडण्याची वेळ व्यापाऱ्यांवर येत होती.

या समस्येवर तोडगा निघावा म्हणून येथील दुकानदार मोहम्मद समीर जानवानी यांनी मागील चार महिन्यांपासून सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच नगरपरिषदेकडे वारंवार पाठपुरावा केला. अनेक तक्रारी करूनही प्रश्न मार्गी लागला नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाने हे काम त्यांचे नसल्याचे सांगितले, तर नगरपरिषदेकडून निधीअभावी काम करता येत नसल्याचे कारण देण्यात आल्याचे जानवानी यांनी सांगितले. अखेर प्रशासनाची वाट न पाहता मोहम्मद समीर जानवानी यांनी स्वतःच्या खर्चातून जेसीबी व ट्रॅक्टर-ट्रॉली भाड्याने आणून संबंधित दोन्ही विभागांच्या कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत बुजलेली नाली मोकळी करून घेतली. त्यामुळे अनेक वर्षांपासून साचलेले पाणी आता वाहू लागणार असुन परिसरातील व्यापाऱ्यांसह नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

नाली मोकळी करतेवेळी येथे नागरिकांत काही शाब्दिक वादविवादही पाहावयास मिळाले. दरम्यान, नागरिकांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली. वेळेत दखल घेतली असती तर एका व्यापाऱ्यावर स्वखर्चाने सार्वजनिक काम करण्याची वेळ आली नसती, अशी प्रतिक्रिया परिसरातील नागरिकांनी दिली.

### एका माजी नगराध्यक्षांचा विरोध-

बुजलेली नाली मोकळी करण्याच्या कामावेळी शहरातील अनेक लोकप्रतिनिधी व नागरिक उपस्थित होते. मात्र, एका माजी नगराध्यक्षांनी या कामाला विरोध दर्शविल्याचे चित्र यावेळी बघावयास मिळाले. काही वेळासाठी येथे वादाची परिस्थिती सुध्दा निर्माण झाली होती. मात्र शेवटी सदर बुजवलेली पूर्णा नाली मोकळी करण्यात आली.

# नगरसेवक विद्यार्थ्यांसाठी सभेत गेले, 'गटबाजीसाठी नाही'

## -देशमुखांचा पत्रकार परिषद घेणाऱ्यांवर पलटवार

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेच्या ७ जुलै २०२६ रोजी पार पडलेल्या सर्वसाधारण सभेच्या अनुषंगाने शहरातील राजकीय वातावरण तापले असून काँग्रेसमधील अंतर्गत मतभेद सार्वजनिक झाले आहेत. शहराच्या नगरपालीकेच्या सभेच्या राजकारणावरुन काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषद घेऊन शहराध्यक्ष प्रदीप देशमुख व सभेला उपस्थित राहिलेल्या काँग्रेस नगरसेवकांवर जाहीर टीका केली होती. त्यांनी पक्षाच्या धोरणांविरुद्ध काम केल्याचा आरोप केला होता. या टीकेला आणि आरोपांना शहराध्यक्ष प्रदीप देशमुख व संबंधित नगरसेवकांनी अधिकृत पत्रकाद्वारे जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. अंजनगाव सुर्जी शहर काँग्रेस पूर्णपणे एकसंध असून पक्षात कोणतीही गटबाजी नाही, असे देशमुख यांनी स्पष्ट केले. नगरपरिषदेने शहरातील विकासात्मक ठरावांवर चर्चा करण्यासाठी सर्वसाधारण सभा आयोजित केली होती. भाजप, शिवसेना (ठाकरे गट) व इतर काही नगरसेवकांनी सभेवर बहिष्कार टाकला. मात्र, काँग्रेस, शिवसेना (शिंदे गट) आणि भाजपच्या काही नगरसेवकांनी



शहराच्या विकासाच्या दृष्टीने सभेत सहभाग घेतला. नगरपरिषद शाळांमध्ये शिक्षक भरती हा अत्यंत महत्त्वाचा विषय होता. शाळा सुरू झालेल्या असून, यापूर्वी आचारसंहितेमुळे सभा रद्द झाली होती. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी सभेला उपस्थित राहणे हे लोकसेवक म्हणून कर्तव्याचा भाग होते, त्यामुळे सभेत सहभागी होऊन प्रश्न मार्गी लावणे हे मतदारांप्रती असलेली बांधिलकी आहे. इतरांनी यावर टीका करणे म्हणजे लोकसेवकाच्या कायदेशीर अधिकार व कार्यात अवैध हस्तक्षेप आहे, असे परिपत्रकात नमूद केले आहे. ज्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे सभा रद्द करण्याची मागणी करणाऱ्या तक्रारी दाखल केल्या होत्या, त्यावर जिल्हाधीकारी कार्यालयाने कोणतीही कायदेशीर कारवाई केली नसल्याने वा कोणत्याही सुचना दिल्या नसल्यामुळे ७ जुलैची सभा पूर्णपणे वैध होती, असा दावा देशमुख यांनी केला. ज्यांनी नगरसेवकांवर बिनबुडाचे आरोप करून पक्षाची प्रतिमा मलीन केली आहे, त्यांची पक्षाच्या विरोधात टीका करण्याची नैतिकता नाही. या प्रकरणाची माहिती पक्षश्रेष्ठींना कळविण्यात आली आहे, असेही देशमुख यांनी स्पष्ट केले.प्रदीप देशमुख व सभेला उपस्थित नगरसेवकांनी विरोधक आणि पक्षांतर्गत टीकाकारांना सडेतोड उत्तर देत काँग्रेस शहराच्या विकासासाठी सदैव कटिबद्ध असल्याचे नमूद केले.

# चोरीची ज्युपिटर मोपेड जप्त; दोन तरुण ताब्यात

## गाडगेनगरमधील दुचाकी चोरीचा पाच दिवसांत छडा



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील गाडगेनगर परिसरातून चोरीला गेलेल्या ज्युपिटर मोपेडचा गुन्हा अवघ्या पाच दिवसांत उघडकीस आणत गुन्हे शाखेने दोन तरुणांना ताब्यात घेतले आहे. आरोपींकडून सुमारे ५० हजार रुपये किमतीची चोरीची दुचाकी जप्त करण्यात आली असून, पुढील कारवाईसाठी दोघांनाही गाडगेनगर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी शहरातील दुचाकी चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याच्या दिलेल्या निर्देशानुसार पोलीस निरीक्षक अतुल वर यांच्या नेतृत्वाखाली गुन्हे शाखेचे पथक समांतर तपास करीत होते. गाडगेनगर पोलीस ठाण्यात दुचाकी चोरीचा गुन्हा दाखल झाल्यानंतर या गुन्ह्याचा तपास सुरू असताना शनिवारी (११ जुलै) गुन्हे शाखेला गोपनीय माहिती मिळाली की, दोन तरुण विद्या भारती महाविद्यालयासमोर चोरीची दुचाकी घेऊन उभे आहेत.

माहितीच्या आधारे पथकाने तातडीने सापळा रचून दोघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे असलेल्या बजाज कंपनीच्या ज्युपिटर मोपेडबाबत चौकशी केली असता, ६ जुलैच्या रात्री फिर्यादीच्या घरासमोरून ती चोरी केल्याची कबुली त्यांनी दिली. त्यानंतर पोलिसांनी एमएच-२७-डीसी-४९७९ क्रमांकाची ज्युपिटर मोपेड जप्त करून गाडगेनगर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या दुचाकी चोरीच्या गुन्ह्याचा छडा लावला. ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपींमध्ये श्रेयर पानदास रौराळे (वय १९, रा. लक्ष्मीनगर) आणि नयन गोपाल गोपाळे (वय १९, रा. कपिलवस्तू नगर) यांचा समावेश आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके, श्याम घुगे, पोलीस उपायुक्त (गुन्हे) प्रांजली सोनवणे, सहाय्यक पोलीस आयुक्त कैलास पुंडकर यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक अतुल वर यांच्या नेतृत्वाखाली गुन्हे शाखेच्या पथकाने केली.

# अमरावती मुख्य बस स्थानकात घाणीचे साम्राज्य



**अमरावती/प्रतिनिधीः-** एसटी महामंडळाचे 'गाव तिथे रस्ता आणि रस्ता तिथे एसटी' हे ब्रीदवाक्य प्रवाशांच्या सेवेसाठी असले, तरी अमरावती येथील मुख्य बस स्थानकाची (मेन बस स्टॅन्ड) सद्यास्थिती पाहता प्रशासनाला स्वच्छतेचा पूर्णपणे विसर पडल्याचे चित्र आहे. सध्या या बस स्थानक परिसरात घाणीचे प्रचंड साम्राज्य पसरले असून, प्रवाशांना आरोग्याचा मोठा धोका निर्माण झाला आहे.

बस स्थानक परिसरातील मुख्य नाली कचरा आणि प्लास्टिकच्या पिशव्यांमुळे पूर्णपणे पॅक (तुंबली) झाली आहे. नालीची वेळेवर साफसफाई न झाल्यामुळे दूषित आणि दुर्गंधीयुक्त पाणी थेट बस स्थानकाच्या आवारात आणि प्लॅटफॉर्मच्या आजूबाजूला साचत आहे. पावसाचे आणि सांडपाणी वाहून जाण्यास जागा नसल्याने याठिकाणी चिखलाचे आणि पाण्याचे डबके तयार झाले आहेत.

अमरावती हे जिल्ह्यातील मुख्य आणि वर्दळीचे बस स्थानक असल्याने दररोज हजारो प्रवासी येथून ये-जा करतात. मात्र, बस स्थानकात पाऊल ठेवताच प्रवाशांना तीव्र दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे. डासांचा प्रादुर्भाव वाढल्याने या ठिकाणी आजार पसरण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. बसची वाट पाहत थांबायचे कुठे, असा संतप्त सवाल प्रवाशांकडून उपस्थित केला जात आहे.

स्थानक परिसराच्या स्वच्छतेची जबाबदारी असलेल्या एसटी प्रशासनाचे या गंभीर समस्येकडे साफ दुर्लक्ष होत असल्याचा आरोप प्रवासी आणि स्थानिक नागरिकांनी केला आहे. वारंवार तक्रार करूनही तुंबलेली नाली उपसण्यासाठी कोणतीही ठोस पावले उचलली गेलेली नाहीत.

प्रवाशांकडून नियमितपणे विविध करांच्या माध्यमातून पैसे वसूल करणाऱ्या महामंडळाने या मुख्य बस स्थानकाची दुरवस्था थांबवावी आणि तुंबलेली नाली त्वरित साफ करून प्रवाशांना दिलासा द्यावा, अशी तीव्र मागणी आता जोर धरत आहे.

# खासदार मुकुल वासनिक व अविनाश पांडे यांची बी.टी.सरांच्या घरी सांत्वना भेट

**अमरावती/प्रतिनिधीः-** अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस, वर्किंग कमिटीचे सदस्यद्वय खासदार मुकुल वासनिक व माजी खासदार अविनाश पांडे यांनी आज दिवंगत माजी आमदार प्रा. बी.टी. देशमुख यांचे घरी भेट देऊन त्यांना आदरांजली अर्पण केली.

'बी.टी. सर हे अत्यंत समर्पित भावनेतून काम करणारे निष्कलंक असे व्यक्तिमत्त्व होते. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये त्यांच्यासारखे राजकीय नेते व लोकप्रतिनिधी आपल्याला अनुभवायला मिळाले नाहीत. उत्कृष्ट संसदपटू म्हणून त्यांचा नावलौकिक होता. अत्यंत साधी रहाणी व कर्मठ आचार हे त्यांचे वेगळेपण होते.त्यांच्या जाण्याने विदर्भाचे तसेच समाजाचे मोठे नुकसान झाले,' अशा शब्दात मुकुल वासनिक यांनी आपल्या भावना त्यांच्या कुटुंबीयांजवळ व्यक्त केल्या.



'महाविद्यालयीन व विद्यार्थी संघाच्या चळवळींमध्ये कार्यरत असताना पासून बी.टी. सरांच्या नेतृत्वाचं आकर्षण आम्हाला सतत होतं. पुढे सरांचा सहवास विधानमंडळामध्ये काम करीत असताना लाभला. त्यांचे संबंध जीवन हे विदर्भाच्या मागासलेपणाच्या विरुद्ध सुरू केलेल्या लढ्यामध्ये समर्पित झाले. त्यांचे जाणे हे महाराष्ट्रातील एका मौल्यवान विचारांचा आणि कार्याचा शेवट आहे', असे भावपूर्ण उद्गार अविनाश पांडे यांनी याप्रसंगी व्यक्त केले.

बी.टी. देशमुख यांच्या पत्नी सुशीलाताई देशमुख, मुली डॉ. वैशाली वानखडे, डॉ.दीपा लाड, जावई हेमंत वानखडे, डॉ.सुनील लाड, बंधू प्रा. एम. टी. देशमुख यांची भेट घेऊन त्यांना सांत्वना दिल्या. त्यांनी अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या वतीने बी.टी. सरांनी शैक्षणिक, सामाजिक व विकासाच्या क्षेत्रात दिलेल्या महत्त्वाच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

याप्रसंगी त्यांचेसमवेत माजी मंत्री डॉ. सुनील देशमुख, गिरीशबाबू गांधी, माजी महापौर मिलिंद चिमोटे, किशोर बोरकर, डॉ.दिनेश गवळी,ज्येष्ठ पत्रकार बाळासाहेब कुलकर्णी प्रामुख्याने उपस्थित होते.

**फ्लॅट विकणे आहे**

टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल आणि एक रूम असा फ्लॅट आहे.

**संपर्क:**
९४२२८५७१६९,
९४२२९१८५६९

# अमरावतीत दोन स्वतंत्र घटनांत दोघांचा मृत्यू

## -फ्रेजरपुरा पोलिसांकडून तपास सुरू

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात गुरुवारी घडलेल्या दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये ३५ वर्षीय दोन व्यक्तींचा मृत्यू झाला. एका व्यक्तीने राहत्या घरी गळफास घेतल्याची घटना समोर आली, तर दुसऱ्या व्यक्तीचा विषारी फवारणीचे औषध प्राशन केल्यानंतर उपचारादरम्यान मृत्यू झाला. या दोन्ही प्रकरणी फ्रेजरपुरा पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे.

पहिली घटना राहुलनगर, विच्छुटेकडी परिसरातील आहे. अंकुश विलास गवई (वय ३५) यांनी राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे उघड झाले. प्राथमिक माहितीनुसार, त्यांचे पत्नीसोबत कौटुंबिक मतभेद होते आणि गेल्या आठ ते दहा महिन्यांपासून ते पत्नीपासून वेगळे राहत होते. या कौटुंबिक तणावामुळे त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. या प्रकरणी फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.

दुसरी घटना चांदूरबाजार तालुक्यातील वणी बेलखेडा येथील प्रमोद बाळकृष्ण गजभीये (वय ३५) यांच्याशी संबंधित आहे. त्यांनी विषारी फवारणीचे औषध प्राशन केल्यानंतर त्यांना उपचारासाठी कल्याणनगर येथील डॉ. बागडे रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र उपचार सुरू असतानाच त्यांचा मृत्यू झाला. त्यांनी विषारी औषध कोणत्या कारणामुळे प्राशन केले, याबाबत अद्याप स्पष्ट माहिती समोर आलेली नसल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. या प्रकरणी मर्ग नोंदवून पुढील तपास सुरू आहे. दोन्ही घटनांमागील नेमकी कारणे शोधण्यासाठी फ्रेजरपुरा पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# गंभीर गुन्ह्याच्या तयारीत असलेले दोघे जेरबंद; तलवारी, चाकू जप्त

## चिअर्स बार परिसरात कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात गंभीर स्वरूपाचा गुन्हा घडविण्याच्या तयारीत असलेल्या दोन तरुणांना अमरावती शहर गुन्हे शाखेने घातक शस्त्रांसह ताब्यात घेत मोठी कारवाई केली. आरोपींकडून दोन तलवारी, दोन चायना चाकू आणि एक लोखंडी चाकू असा एकूण ७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, त्यांच्याविरुद्ध गाडगेनगर पोलीस ठाण्यात आर्म अॅक्टसह संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी शहरात अवैधरित्या घातक शस्त्रे बाळगणाऱ्या व्यक्तींविरोधात विशेष मोहीम राबविण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार पोलीस निरीक्षक अतुल वर यांच्या नेतृत्वाखाली गुन्हे शाखेचे पथक शहरात गस्त व गुप्त माहितीच्या आधारे कारवाई करीत आहे. दरम्यान, गाडगेनगर पोलीस



ठाण्याच्या हद्दीतील चिअर्स बारच्या मागील रस्त्यावर दोन इसम घातक शस्त्रे घेऊन गंभीर गुन्हा करण्याच्या उद्देशाने थांबल्याची गोपनीय माहिती गुन्हे शाखेला मिळाली. त्यानुसार पथकाने तत्काळ घटनास्थळी धाव घेत दोघांना ताब्यात घेतले. त्यांच्या ताब्यातील प्लास्टिकच्या पोत्याची झडती घेतली असता त्यामध्ये दोन लोखंडी तलवारी, दोन चायना चाकू आणि एक लोखंडी चाकू आढळून आला.

पोलिसांनी वेळेत कारवाई केल्यामुळे संभाव्य गंभीर गुन्हा टळल्याचे सांगण्यात आले. आरोपींविरुद्ध गाडगेनगर पोलीस ठाण्यात आर्म अॅक्टचे कलम ४/२५ तसेच महाराष्ट्र पोलीस कायद्यातील कलम १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपींमध्ये अमित साहेबराव तंतरपापळे (वय १९, रा. अशोकनगर) आणि अभिषेक भिमराव खडसे (वय २५, रा. अशोकनगर) यांचा समावेश आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके, श्याम घुगे, पोलीस उपायुक्त (गुन्हे) प्रांजली सोनवणे, सहाय्यक पोलीस आयुक्त कैलास पुंडकर यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक अतुल वर यांच्या नेतृत्वाखाली गुन्हे शाखेच्या पथकाने केली.

**जाहीरनामा**

या जाहिरनामाद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की,अर्जदाराचे नाव **श्री/श्रीमती/कु.अहफाजखॉं मुमताजखॉं पत्ता -नौबागपुरा अचलपूर जि. अमरावती** यांनी अचलपूर नगर परिषदेच्या **वार्ड क्र . २९** संगणक **मालमत्ता क्र.ACH000 25414** जुना मालमत्ता **क्र. 29000310** नझुल शीट नं.--- प्लॉट नं---हि कर आकारणी नोंदवही नुसार **श्री/श्रीमती/कु. नझुल जागा भोगवटदार रहीमखॉं छोटेखॉं** या नावाने असून वरील अर्जदार यांनी या **श्री/श्रीमती/कु.नझुल जागा भोगवटदार अहफाजखॉं मुमताजखॉं** नावाने फेरफार करण्याकरिता **हनीफा बी रहीमखॉं** यांच्या लेखी संमतीनुसार कार्यालयामध्ये दिनांक ९/६/०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.याविषयी कोणास आक्षेप/हरकती घ्यावयाची असल्यास हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत लेखी स्वरूपात दस्तऐवजाच्या पुराव्यासह दाखल करून हजर राहावे. अन्यथा या मुदतीनंतर नियमाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येईल.याची नोंद घ्यावी.
टीप/लक्षवेध------------------------------------------

**उपरोक्त मालमत्तेची चर्तुःसीमा**
**पूर्व**-सरकारी खुली जागा व न.प. मार्केट
**पश्चिम**-हनीफा बी रहीमखॉं यांचे घर
**उत्तर**- बंद दुकान
**दक्षिण**-अडत दुकान

शिक्का

**मुख्याधिकारी नगर परिषद अचलपूर**

**डॉ.मयुर रा.कळसे, तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार, तिवसा यांचे कार्यालय**

संपर्क कार्यालय - ०७२२५-२२२०४ email : tah.tiosa@gmail.com
रा.मा.क्र./आर.टी.एस.६४/मौजा गुरुदेवनगर/प्र.क्र. /२०२५-२६

**उद्घोषणा / जाहीरनामा**

या जाहिरनाम्याद्वारे सर्व जतेला जाहीर कळविण्यात येते की, ज्याअर्थी अर्जदार श्री.मिलिंद हरिचंद्र काळमेघ, रा.गुरुदेवनगर, ता.तिवसा, जि.अमरावती यांनी त्यांचे ताब्यातील व मालकीचे मौजा गुरुदेवनगर येथील शेत स.नं./गट नं.४६/२ व ४६/३ मधील मंजूर अभिन्यासातील प्लॉट क्र.१५, क्षेत्रफळ ६००.०० चौ.फुट या प्लॉटच्या ७/१२ वरील मूळ मालक मयत शंकर विश्वनाथ सुपासे त्याऐवजी मिलिंद हरिचंद्र काळमेघ अशी अर्जदार यांच्या नावाची नोंद करुन अद्यावत ७/१२ मिळणेबाबत विनंती अर्ज या कार्यालयात सादर केलेलाआहे. अर्जदार यांनी अर्जासह, गाव नमुना ७/१२ ची प्रत, नमुना ८-अ, अभिन्यासाची नकाशा प्रत, खरेदी प्रत हे दस्त सोबत जोडलेले आहेत.

**परिशिष्ट-अ**

| अ. क्र. | मौजा | गट क्र. | क्षेत्रफळ (हे.आर) | आकारणी (रु.पै.) | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | गुरुदेवनगर | ४६/२ व ४६/३ मधील प्लॉट क्र.१५ | ६००.०० चौ.फुट (पो.ख.०.००) | -- | -- |

त्याअर्थी ज्या कोणाला अर्जदार यांनी दाखल केलेल्या विनंती अर्जाचे अनुषंगाने ७/१२ वरील अर्जदार यांच्या नावाची नोंद करणेबाबत काही आक्षेप वा हरकती दाखल करावयाच्या असल्यास जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत कार्यालयीन वेळेत आक्षेप वा हरकती तहसील कार्यालय, तिवसा येथे दाखल कराव्या. मुदतीनंतर आलेल्या आक्षेप वा हरकती मान्य केल्या जाणार नाही, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

शिक्का

स्वा/-
तालुका दंडाधिकारी तथा
तहसिलदार, तिवसा

**जाहीर नोटीस**

या जाहिरनामाद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की,अर्जदाराचे नाव **श्री/श्रीमती/कु. रेहानाबानो मोहंमद निसार पत्ता -महेराबपुरा अचलपूर जि. अमरावती** यांनी अचलपूर नगर परिषदेच्या **वार्ड क्र . ३०** संगणक **मालमत्ता क्र.ACH000 26549** जुना मालमत्ता **क्र. 30000562** नझुल शीट नं.--- प्लॉट नं---हि कर आकारणी नोंदवही नुसार **श्री/श्रीमती/कु. नझुल जागा भोगवटदार शे हसन शे हुसेन** या नावाने असून वरील अर्जदार यांनी या **श्री/श्रीमती/कु.नझुल जागा भोगवटदार रेहानाबानो मो. निसार** नावाने फेरफार घेण्या करिता स्वतःचे लेखी प्रतिज्ञापत्रान्वये कार्यालयामध्ये दिनांक ३/६/०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.याविषयी कोणास आक्षेप/हरकती घ्यावयाची असल्यास हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत लेखी स्वरूपात दस्तऐवजाच्या पुराव्यासह दाखल करून हजर राहावे. अन्यथा या मुदतीनंतर नियमाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येईल.याची नोंद घ्यावी.
टीप/लक्षवेध------------------------------------------

**उपरोक्त मालमत्तेची चर्तुःसीमा**
**पूर्व**-सरकारी रोड
**पश्चिम**-मो. अनसारचे घर
**उत्तर**- न.प.आरोग्य दवाखना
**दक्षिण**-महेराबपुरा रोड

शिक्का

**मुख्याधिकारी नगर परिषद अचलपूर**

**जाहीर नोटीस**

सर्व आम जनतेस सूचित करण्यात येते की, माझे पक्षकार श्री भोजराज श्रीकिसनदास राठी, श्री. नंदकिशोर श्रीकिसनदास राठी, श्री. जीतमल श्रीकिसनदास राठी, श्री. बालकिसन उर्फ आनंद श्रीकिसनदास राठी व सौ. वर्षा रितेश लड्डा, सर्व रा. अमरावती यांचे मालकी व ताब्यातील खालील वर्नांकित स्थावर मिळकत असून, त्याचे वर्णन येणे प्रमाणे -

**स्थावर मालमत्ताचे (शेत जमीन) वर्णन**-जिल्हा परिषद अमरावतीचे व नगर परिषद चांदूर बाजार चे हद्दीतील व सहदुय्यम निबंधक चांदूर बाजार चे कक्षेतील मौजा चांदूर बाजार, ता. चांदूर बाजार, जि अमरावती येथील शेत भुमापन क्र. व उपविभाग्र - ७६/१/व एकूण क्षेत्रफळ ०.५५ आर मधील ०.३३ आर व ८०/१/ब एकूण क्षेत्रफळ ०.२६ आर अशी एकूण ०.५९ आर अकृपक झालेली व वाणीज्य व रहिवासी उपयोग करण्यात आलेली स्थावर मालमत्ता असून त्याची चतुःसीमा पूर्वेस जमीर कॉलोनी, पश्चिमेस नगर परिषद पाणी पुरवठाची भिंत, उत्तरेस निलेश उपाध्ये व इतर यांचे शेत व दक्षिणेस वानखडे व अग्रवाल यांचे शेत आहे.

वरील वर्णाणकीत स्थावर मिळकत ही माझे पक्षकार यांचे एकमेव मालकी व ताब्यातील असून मिलिंद रामदास अभ्यंकर, रा. शिरजगाव बंद, त. चांदूर बाजार, जि. अमरावती याने माझे पक्षकार मधील श्री जीतमल श्रीकिसनदास राठी यांचे नावाची खोटी सही करून व खोटा अंगठा लावून दिनांक ०८/०५/२०२६ रोजी कागदावर खोटी व बनावटी टोकन पावती तयार केली असून याबाबत माझे पक्षकार यांना माहिती झाल्यावर माझे पक्षकार यांनी दिनांक ३०/०६/२०२६ रोजी मिलिंद रामदास अभ्यंकर व इतर यांचे विरुद्ध पोलीस स्टेशन चांदूर बाजार येथे रिपोर्ट दिला आहे. माझे पक्षकार मधील श्री जीतमल श्रीकिसनदास राठी यांनी मिलिंद रामदास अभ्यंकर यास वरील वर्णनाकीत स्थावर मिळकत विक्री करण्यासंबंधी कोणताही व्यवहार केला नसून त्या संबंधाने कोणतीही टोकन चिठ्ठी करून दिली नाही.

करिता माझे पक्षकार हे सदर्हु जाहीर नोटीस द्वारा सर्व आम जनतेस कळवितात की, माझे पक्षकार यांनी मिलिंद रामदास अभ्यंकर याचे सोबत वरील वर्णनाकीत स्थावर मिळकत विक्री करण्यासंबंधी कोणतीही टोकन चिठ्ठी किंवा करारनामा केला नाही. तसेच मिलिंद रामदास अभ्यंकर याचे सोबत वरील वर्णनाकीत स्थावर मिळकत संबंधी कोणताही व्यवहार करू नये, किंवा कोणत्याही सरकारी, निमसरकारी व खाजगी कार्यालयमध्ये कोणताही दस्त, कर्ज व इतर काही करू नये. तसे काही केल्यास ते माझा पक्षकार वर लागू व बंधनकारक राहणार नाही, तसेच माझे पक्षकार हे त्यांचे विरुद्ध फौजदारी स्वरूपाची कठोर कार्यवाही करणार, याची नोंद घावी.
करिता सदर्हू जाहीर नोटीस.

दिनांक १३/०७/२०२६ २०२५

शिक्का

**अॅड. दीपक एस. चौधरी (जैन)**
एडव्होकेट अॅड नोटरी
मातृ-स्नेह, सत्यनारायण मंदिर जवळ,
रंगारी गल्ली, ता. जी. अमरावती
मो. नं. ९७६६४९१४४८

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ३०५**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# उघड्या खिळ्यांमुळे महामार्गावर जीवघेणा धोका... तातडीच्या कारवाईची मागणी

## निकृष्ट दर्जाचे इंडिकेटर ठरले धोकादायक; किरकोळ अपघातांची मालिका सुरूच, आंदोलनाचा इशारा

**आष्टी शहीद/ जनमाध्यम**

तालुक्यातील तळेगाव शा प ते अमरावती जिल्ह्यातील हातूर्णा या राष्ट्रीय महामार्गावर प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे वाहनचालकांच्या जीवाशी थेट खेळ सुरू असल्याचा गंभीर आरोप होत आहे. रस्त्यावर बसविण्यात आलेले इंडिकेटर काही दिवसांतच निकृष्ट दर्जामुळे तुटून पडले. मात्र त्यांच्या जागी उघडे राहिलेले लोखंडी खिळे अद्याप हटविण्यात आलेले नाहीत. त्यामुळे हा महामार्ग



अक्षरश मृत्यूचा सापळा बनला आहे.

भरधाव वेगाने धावणाऱ्या दुचाकी चारचाकी आणि मालवाहू वाहनांच्या टायरमध्ये हे खिळे घुसून टायर फुटण्याच्या घटना सातत्याने घडत आहेत. अनेक वाहनचालक थोडक्यात बचावले आहेत. मात्र कोणत्याही क्षणी भीषण अपघात होऊन निष्पाप नागरिकांचा बळी जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे.या धोकादायक परिस्थितीबाबत संबंधित विभागाकडे वारंवार तक्रारी करण्यात आल्या. तरीही उघडे खिळे कापणे किंवा हटविण्याची साधी कारवाईदेखील करण्यात आलेली नाही. त्यामुळे प्रशासनाच्या हलगर्जीपणाविरोधात नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. मोठा अपघात झाल्यानंतरच अधिकारी जागे होणार का असा संतप्त प्रश्न वाहनचालक उपस्थित करीत आहेत.

राष्ट्रीय महामार्गावरील सुरक्षिततेसाठी खर्च होतो. मात्र निकृष्ट दर्जाच्या कामामुळे जनतेचा जीव धोक्यात आला आहे. संबंधित कंत्राटदार आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणीही जोर धरत आहे.दरम्यान आष्टी तालुका अन्याय निवारण समितीचे अध्यक्ष प्रा बी टी उरकुडे यांनी तातडीने उघडे खिळे हटवून रस्ता सुरक्षित करावा. अन्यथा तीव्र जनआंदोलन उभारण्यात येईल असा इशारा दिला आहे.प्रशासनाने आणखी एका भीषण दुर्घटनेची वाट न पाहता तात्काळ उपाययोजना करून हा जीवघेणा धोका कायमचा दूर करावा अशी जोरदार मागणी वाहनचालक आणि नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# राष्ट्रीय अबॅकस स्पर्धेत वर्धेच्या अद्विकाची चमक

## नॅशनल प्रोक्टिव्ह अबॅकस कॉम्पिटिशन-२०२६ मध्ये द्वितीय क्रमांकाची मानाची कामगिरी

**वर्धा /जनमाध्यम**



लहान वयातच गणितातील चपळाई, अचूकता आणि आत्मविश्वासाचा ठसा उमटवत अद्विका बाबुलाल चावके हिने नॅशनल प्रोक्टिव्ह अबॅकस कॉम्पिटिशन-२०२६ मध्ये द्वितीय क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

देशभरातील विद्यार्थ्यांच्या सहभागातून झालेल्या या स्पर्धेत अबॅकसच्या माध्यमातून जलद आणि अचूक गणिती गणना करण्याच्या कौशल्याची कसोटी घेण्यात आली. अद्विकाने उत्कृष्ट कामगिरी करत द्वितीय क्रमांक मिळवून वर्ध्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला.या यशामागे परफेक्ट प्रोक्टिव्ह अबॅकस संस्थेच्या गोटे यांचे मोलाचे मार्गदर्शन तसेच आई नम्रता चावके यांचे सातत्यपूर्ण प्रोत्साहन, नियमित सराव आणि परिश्रम असल्याची भावना अद्विकाने व्यक्त केली.अद्विकाच्या या यशाबद्दल शिक्षक, नातेवाईक, मित्रपरिवार आणि नागरिकांनी तिचे अभिनंदन करत पुढील शैक्षणिक व स्पर्धात्मक वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव केला आहे.

# राज्यात १२३ बोगस महाविद्यालयांचा धक्कादायक पर्दाफाश

## विद्यार्थी संख्या, प्राध्यापक, प्रयोगशाळा आणि ग्रंथालयांचा अभाव विधान परिषदेत सरकारची कबुली

**मुंबई/जनमाध्यम**

राज्यात उच्च शिक्षणाच्या गुणवत्तेबाबत गंभीर प्रश्न निर्माण करणारी धक्कादायक माहिती विधान परिषदेत समोर आली आहे. आवश्यक विद्यार्थी संख्या, पात्र प्राध्यापक, प्रयोगशाळा, ग्रंथालय तसेच अन्य अनिवार्य सुविधा नसतानाही राज्यात तब्बल १२३ महाविद्यालये सुरू असल्याची माहिती राज्य सरकारने विधान परिषदेत लेखी उत्तराद्वारे दिली. भाजपचे विधान परिषद सदस्य निरंजन डावखरे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी ही माहिती सादर केली.

राज्यातील विविध विद्यापीठांशी संलग्न असलेल्या अनेक महाविद्यालयांनी शासनाने निश्चित केलेल्या निकषांची पूर्तता केलेली नसल्याचे सरकारने मान्य केले. अनेक ठिकाणी विद्यार्थी संख्या अपुरी असून पात्र प्राध्यापकांची नियुक्ती करण्यात आलेली नाही. तसेच प्रयोगशाळा, ग्रंथालय आणि इतर मूलभूत शैक्षणिक सुविधांचाही अभाव असल्याचे तपासणीत स्पष्ट झाले आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १०८ नुसार महाविद्यालयांना संलग्नता व मान्यता मिळण्यासाठी आवश्यक अटी आणि निकष निश्चित करण्यात आले आहेत. तसेच कलम ११७ नुसार महाविद्यालयांची नियमित तपासणी करण्याची तरतूद असून कलम १२० अंतर्गत नियमांचे पालन न करणाऱ्या महाविद्यालयांची संलग्नता आणि मान्यता रद्द करण्याची कायदेशीर व्यवस्था आहे. या तरतुदीनुसार संबंधित महाविद्यालयांविरुद्ध कार्यवाही सुरू असल्याचे मंत्री चंद्रकांत पाटील यांनी स्पष्ट केले.

सरकारने सादर केलेल्या आकडेवारीनुसार २०२५ ते २६ या शैक्षणिक वर्षात सर्वाधिक ८१ बोगस महाविद्यालये छत्रपती संभाजीनगर विभागात आढळली आहेत. अमरावती विभागात २०, नागपूर विभागात १२, नाशिक विभागात ५, पुणे विभागात ३ आणि कोकण विभागात २ अशा एकूण १२३ महाविद्यालयांमध्ये गंभीर त्रुटी आढळून आल्या आहेत.

या खुलाशामुळे राज्यातील उच्च शिक्षण व्यवस्थेच्या गुणवत्तेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून अशा महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांच्या भवितव्याची चिंता व्यक्त केली जात आहे. दोषी संस्थांवर कठोर कारवाई करून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही, यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

## सेवेच्या नव्या पर्वाला प्रारंभ

# रोटरी क्लब गांधी सिटीच्या नव्या कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा



**वर्धा/ जनमाध्यम**

समाजसेवा ही केवळ उपक्रमांपुरती मर्यादित नसून ती समाजाशी असलेल्या बांधिलकीची जाणीव आहे. सेवा, मैत्री, प्रामाणिकपणा, विविधता आणि नेतृत्व या मूल्यांच्या बळावर समाजात चिरस्थायी बदल घडविण्याचा निर्धार रोटरी क्लब गांधी सिटी वर्धाच्या नव्या कार्यकारिणीने व्यक्त केला. रोटरी वर्ष २०२६ ते २०२७ च्या पदग्रहण सोहळ्यात संदीप कदम यांनी अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारत आगामी वर्षातील विविध समाजोपयोगी उपक्रमांची दिशा स्पष्ट केली.

पदग्रहणानंतर बोलताना संदीप कदम म्हणाले, रोटरी ही केवळ संस्था नाही, तर समाजासाठी जगण्याची प्रेरणा देणारी चळवळ आहे. प्रत्येक प्रकल्पातून गरजूंपर्यंत मदतीचा हात पोहोचविण्याबरोबरच त्यांच्यात आत्मविश्वास, संधी आणि स्वाभिमान निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाईल. रोटरीची सर्वात मोठी ताकद तिची मैत्री आणि संघभावना असून सर्व सदस्यांनी एकाच ध्येयाने काम केल्यास कोणतेही उद्दिष्ट अशक्य नाही, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

रोटरीचे जनसंपर्क अधिकारी राजकुमार जाजू यांनी यंदाच्या आंतरराष्ट्रीय रोटरीच्या क्रिएट लास्टिंग इम्पॅक्ट या संकल्पनेची माहिती देत समाजावर दीर्घकालीन सकारात्मक परिणाम करणारे उपक्रम राबविण्यावर भर दिला जाणार असल्याचे सांगितले.यावेळी सहाय्यक प्रांतपाल मनोज मोहता, प्रांत सचिव श्रीनिवास लेले आणि माजी प्रांतपाल महेश मोकलकर यांनी मार्गदर्शन केले. रोटरी फाउंडेशन अधिक सक्षम करण्यासाठी सदस्यांनी आर्थिक योगदान वाढविण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच नव्या नेतृत्वाने समाजोपयोगी प्रकल्पांना अधिक गती द्यावी, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली.

कार्यक्रमात माजी अध्यक्षा साधना बन्नोरे यांनी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या सदस्यांचा गौरव केला. तसेच राजकुमार जाजू यांच्या संपादनाखाली प्रकाशित होणाऱ्या आणि रोटरी प्रांतात अनेक वेळा सर्वोत्तम हिंदी बुलेटिनचा मान मिळालेल्या मंथनच्या नव्या अंकाचे प्रकाशन करण्यात आले.नव्या कार्यकारिणीत सचिवपदी यशवंत देशपांडे व संजय मानमोडे, सहसचिवपदी चेतन गांधी, कोषाध्यक्षपदी शशांक इंगोले, उपाध्यक्षपदी स्मिता व्यास यांची निवड करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्योती भगत यांनी केले, तर आभार प्रदर्शन यशवंत देशपांडे यांनी मानले. यावेळी संचालक मंडळातील सदस्यांना अधिकृत पिन प्रदान करून त्यांचा गौरव करण्यात आला. नव्या कार्यकारिणीच्या माध्यमातून शिक्षण, आरोग्य, पर्यावरण आणि सामाजिक विकासाशी संबंधित विविध उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

# सुकळीबाईत वृद्धाकडून गांजाची विक्री उघड

## सावंगी मेघे पोलिसांची धाड; ९२२ ग्रॅम गांजा जप्त; एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा

**वर्धा /जनमाध्यम**

अवैध अमली पदार्थांच्या विक्रीविरोधात सावंगी मेघे पोलिसांनी केलेल्या कारवाईत सेलू तालुक्यातील सुकळीबाई येथे एका ८४ वर्षीय वृद्धाच्या घरातून ९२२ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला. या कारवाईत गांजासह विक्रीतून मिळालेली रोख रक्कम असा एकूण २० हजार ६९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून आरोपीविरुद्ध एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, १० जुलै रोजी सावंगी मेघे पोलीस ठाण्याचे पथक परिसरात गस्त घालत असताना सुकळीबाई येथील नथ्थुजी लक्ष्मण दाते वय ८४ हे त्यांच्या राहत्या घरातून अवैधरित्या गांजा साठवून त्याची विक्री करत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. या माहितीची खातरजमा करून पोलिसांनी पंचांसह संबंधित ठिकाणी धाड टाकली.घर झडतीदरम्यान ९२२ ग्रॅम गांजा आढळून आला. त्याची अंदाजे किंमत १८ हजार ४४० रुपये असून गांजा विक्रीतून मिळालेली २ हजार २५० रुपयांची रोख रक्कमही



जप्त करण्यात आली. एकूण २० हजार ६९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून आरोपीला ताब्यात घेण्यात आले.

या प्रकरणी सावंगी मेघे पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्यातील कलम ८ क, २० ब आणि २० ब दोन अ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मनोज टिपले करीत आहेत.ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील महाडीक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विनोद गिरी यांच्या नेतृत्वात करण्यात आली. कारवाईत पोलीस उपनिरीक्षक गोपाल शिंदे, मनोज टिपले तसेच पोलीस कर्मचारी संजय पंचभाई, विरेंद्र कांबळे, अनिल वैद्य, निखील फुटाणे, हर्षवर्धन मून आणि अमोल जाधव यांनी सहभाग घेतला.

# पदाचा रुबाब नाही:संस्कारांचा ठेवा जपणारे अमर काळे

## वयोवृद्धांच्या चरणी झुकले खासदार...वर्धेकरांच्या मनात वाढला मान

**वर्धा /जनमाध्यम**

राजकारणात पद मिळाले की अनेकांच्या वागण्यात बदल होतो. मात्र वर्ध्याचे खासदार अमर काळे यांनी एका साध्या प्रसंगातून माणुसकी आणि संस्कार हेच खरे मोठेपण असल्याचे दाखवून दिले. वर्धा येथील एका विवाह सोहळ्यातून परतत असताना त्यांनी रस्त्यात भेटलेल्या एका वयोवृद्ध आजोबांशी अत्यंत आत्मीयतेने संवाद साधला. त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. आदराने बोलले. काही क्षणांची ही भेट उपस्थितांच्या मनात कायमची घर करून गेली.

या भेटीचे छायाचित्र आणि व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होताच सर्वत्र कौतुकाचा वर्षाव सुरू झाला. खासदारपदाचा



कोणताही बडेजाव न करता सर्वसामान्य नागरिकाशी आपुलकीने संवाद साधणाऱ्या अमर काळे यांच्या साधेपणाची चर्चा वर्धाभर रंगली आहे.उपस्थित नागरिकांच्या मते या प्रसंगातून माजी राज्यमंत्री स्व. डॉ शरदराव काळे आणि अनुराधाताई काळे यांनी दिलेल्या संस्कारांची प्रचिती आली. मोठा राजकीय वारसा लाभूनही अमर काळे यांच्या वागण्यात अहंकाराचा लवलेश नसल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली.


जनतेच्या सुखदुःखात सहभागी होणे. वयोवृद्धांचा सन्मान राखणे. सर्वसामान्यांशी जिव्हाळ्याने संवाद साधणे. हीच लोकप्रतिनिधीची खरी ओळख असल्याचे या प्रसंगातून अधोरेखित झाले. त्यामुळेच वर्धा लोकसभा मतदारसंघातील अनेक नागरिक त्यांना आपुलकीने आमचे अमर काळे म्हणून संबोधतात.एका छोट्याशा भेटीने माणुसकीचा मोठा संदेश दिला. पदापेक्षा संस्कार मोठे असतात याची पुन्हा एकदा प्रचिती देणारा हा प्रसंग सध्या वर्धा जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरला आहे.

# लोकसंख्या नियंत्रणाशिवाय विकास अशक्य

## जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त भाषण स्पर्धा

**देवळी /जनमाध्यम**

वाढत्या लोकसंख्येचा थेट परिणाम रोजगार, शिक्षण, आरोग्य, पर्यावरण आणि नैसर्गिक संसाधनांवर होत असून शाश्वत विकासासाठी लोकसंख्या नियंत्रण ही काळाची अपरिहार्य गरज आहे, असे प्रतिपादन एसएसएनजे महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनिता सोनारे यांनी केले.



जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त महाविद्यालयाच्या एनसीसी युनिट आणि अर्थशास्त्र अभ्यास मंडळाच्या संयुक्त विद्यमाने लोकसंख्या नियंत्रण काळाची गरज, सुसंस्कृत समाजाची हीच खरी दिशा या विषयावर भाषण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.एनसीसी भवनात झालेल्या या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. सुनिता सोनारे होत्या. प्रमुख अतिथी म्हणून वरिष्ठ महाविद्यालयाचे अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. संतोष मोहदरे, कनिष्ठ महाविद्यालयाचे अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. जगदीश यावले, प्रा. वंदना मुनेश्वर तसेच एनसीसी अधिकारी कॅप्टन मोहन गुजरकर उपस्थित होते.प्रा.डॉ.संतोष मोहदरे यांनी वाढत्या लोकसंख्येमुळे सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय आव्हाने अधिक तीव्र होत असल्याचे सांगत युवकांनी लोकजागृतीत पुढाकार घेण्याचे आवाहन केले. प्रा. जगदीश यावले यांनी भारत जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश असल्याचे नमूद करत मर्यादित संसाधनांचा समतोल राखण्यासाठी लोकसंख्या नियंत्रण आवश्यक असल्याचे सांगितले. कॅप्टन मोहन गुजरकर यांनी लोकसंख्या विस्फोटामुळे बेरोजगारी, निवास, पाणीटंचाई, गुन्हेगारी आणि हिंसक प्रवृत्तींमध्ये वाढ होत असल्याचे सांगून विकसित भारतासाठी युवकांनी जबाबदारी स्वीकारावी, असे आवाहन केले.

भाषण स्पर्धेत संतोषी कैकाडे हिने प्रथम, वैष्णवी भोयर हिने द्वितीय तर साक्षी पारिसे हिने तृतीय क्रमांक मिळविला. चांद पोहणे, आकांक्षा थुल आणि वंशिका एकुणकर यांना प्रोत्साहनपर पुरस्कार देण्यात आले.संचालन सार्जंट आरती मरघडे व जानवी झोड यांनी केले. आभार प्रदर्शन अंडर ऑफिसर वैष्णवी कन्नाके यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सीनियर अंडर ऑफिसर कल्याणी लिखार, सार्जंट स्नेहा मडकाम, कुंदन कावडे, युवराज डफरे, उदय काळे, यामिनी पारधी, दुर्गेश पोटे तसेच एनसीसीच्या छात्रसैनिकांनी परिश्रम घेतले.

# संक्षिप्त

## क्षुल्लक कारणाहून काठीने मारहाण

**वर्धा-**शिवीगाळ करण्यास मज्जाव केल्याच्या किरकोळ कारणावरून एका व्यक्तीला काठीने मारहाण करून जखमी करण्यात आल्याची घटना पुलगाव येथील वर्धा नदीकाठ परिसरात घडली. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. जखमी विजय शंकर कैलुके रा. आपटी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पुलगाव पोलिसांनी आपटी येथील सदाशिव महादेव कैलुके याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादीने शिवीगाळ करण्यास विरोध केल्याने आरोपीने संतापाच्या भरात काठीने मारहाण केल्याचे तक्रारीत नमूद आहे. जखमीवर उपचार करण्यात आले असून पुढील तपास पुलगाव पोलिस करीत आहेत.

## ताक विक्रेत्याच्या झोपडीवर चोरट्यांचा डल्ला

**वर्धा-**वर्धा न्यायालयासमोर ताक विक्री करणाऱ्या व्यावसायिकाच्या झोपडीचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी रोख रक्कम आणि सोन्याचे दागिने असा तब्बल दोन लाख ५७ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. स्नेहलनगर परिसरातील ही घटना उघडकीस आल्यानंतर परिसरात खळबळ उडाली. रविंद्र पांडुरंग भगत हे शेतीच्या कामानिमित्त गावी गेले असताना चोरट्यांनी संधी साधून घरात प्रवेश केला. घरातील सोन्याची साखळी, अंगठी, कानातले, पोत तसेच रोख रक्कम चोरून नेण्यात आली. भगत यांच्या तक्रारीवरून वर्धा शहर पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास सुरू आहे.

## मातोश्री वृद्धाश्रमाजवळून संशयित ताब्यात

**वर्धा-**सिंदी मेघे परिसरातील मातोश्री वृद्धाश्रमाजवळ संशयास्पद हालचाली करणाऱ्या एका व्यक्तीला रामनगर पोलिसांनी ताब्यात घेतले. पोलिसांच्या सतर्कतेमुळे संभाव्य अनुचित प्रकार टळल्याची चर्चा परिसरात आहे. चंद्रकांत लिलाधर चित्रीव रा. साईनगर असे ताब्यात घेण्यात आलेल्या व्यक्तीचे नाव आहे. संशयास्पदरीत्या परिसरात फिरत असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत त्याची चौकशी केली. समाधानकारक उत्तरे न मिळाल्याने त्याच्याविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली. या प्रकरणी रामनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## चाकूच्या धाकावर दहशत माजविणाऱ्यास अटक

**समुद्रपूर-** तालुक्यातील गव्हा कोल्ही पारधी बेडा येथे हातात चाकू घेऊन नागरिकांमध्ये दहशत निर्माण करणाऱ्या व्यक्तीला समुद्रपूर पोलिसांनी अटक केली. या कारवाईमुळे गावकऱ्यांनी सुटकेचा निश्वास सोडला. रामकृष्ण मनोहर फुलमाळी वय ५० रा. गव्हा कोल्ही पारधी बेडा असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. आरोपी सार्वजनिक ठिकाणी चाकूचा धाक दाखवत नागरिकांना घाबरवत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार सापळा रचून पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून चाकू जप्त करण्यात आला असून त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास समुद्रपूर पोलिस करीत आहेत.

## रेल्वेच्या धडकेत महिलेचा मृत्यू

**वर्धा-** शहरातील चितोडा रेल्वे मार्गावर रेल्वेच्या धडकेत एका महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. उज्ज्वला लोंढे वय ३६ रा. अशोकनगर असे मृत महिलेचे नाव आहे. रेल्वे रुळ ओलांडताना हा अपघात झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिस आणि रेल्वे प्रशासनाने घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला. या प्रकरणी वर्धा शहर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली असून घटनेमागील नेमके कारण शोधण्याचे काम सुरू आहे.

## भोवळ येवून तरुणाचा मृत्यू

**सेलू-** पायदळ जात असताना अचानक भोवळ येऊन खाली कोसळलेल्या तरुणाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना जुनोना परिसरात घडली. सागर चलपे वय ३३ रा. जुनोना असे मृत तरुणाचे नाव आहे. अचानक प्रकृती बिघडल्याने तो रस्त्यावरच कोसळला. नागरिकांनी तातडीने मदतीसाठी धाव घेत त्याला उपचारासाठी हलविण्याचा प्रयत्न केला. मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीनंतर त्याला मृत घोषित केले. या घटनेमुळे गावात शोककळा पसरली आहे. दहेगाव पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली असून शवविच्छेदन अहवालानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक २२६**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# ‘एमपीएससी’त अमरावती विद्यापीठाच्या भूगर्भशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांचे सुयश

**अमरावती/का.प्र.**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या भूगर्भशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी यंदा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत आपली शैक्षणिक गुणवत्ता सिध्द केली आहे. विभागातील विद्यार्थ्यांनी वरिष्ठ भूवैज्ञानिक, सहायक भूवैज्ञानिक आणि कनिष्ठ भूवैज्ञानिक अशा विविध पदांवर अंतिम निवड मिळवत विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे.

विभागाचा विद्यार्थी महेंद्र शंकरराव गावळी याची वरिष्ठ भूवैज्ञानिक, अनिकेत अनिल गाडेकर आणि अभिजित गजाननराव ठाकरे यांची सहायक भूवैज्ञानिक, पवन नरेंद्र चिखलकर, अंकिता चिंधुजी नागतोगे, प्रणाली परशराम सुखदेवे, आशिष पांडुरंग भवाने, श्वेता शेखर वाहुरवाघ आणि रश्मी गोपीचंद चव्हाण या विद्यार्थ्यांची कनिष्ठ भूवैज्ञानिक पदावर अंतिम निवड झाली आहे.



याशिवाय विभागातील १३ विद्यार्थी जी.एस.डी.आय. मधील सहायक भूवैज्ञानिक पदासाठी एमपीएससीच्या मुलाखतीस पात्र ठरले आहेत. विभागामध्ये सध्या १० विद्यार्थी पीएच.डी. संशोधन करीत असून, त्यापैकी दोन विद्यार्थ्यांना भारत सरकारची संशोधन फेलोशिप प्राप्त झाली आहे. दरवर्षी विभागातील अनेक विद्यार्थी नेट/सेट परीक्षांमध्येही यश मिळवत आहेत, असे विभागप्रमुख डॉ. वाय. के. मावळे यांनी सांगितले.

**विद्यापीठात प्रवेश प्रक्रिया सुरू**

या पार्श्वभूमीवर विभागात शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी एम.एससी. भूगर्भशास्त्र आणि पाणलोट तंत्रज्ञान व व्यवस्थापन पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेलाही सुरुवात झाली आहे. एम.एससी. भूगर्भशास्त्र अभ्यासक्रमासाठी बी.एससी. (भूगर्भशास्त्र) उत्तीर्ण विद्यार्थी पात्र आहेत. पाणलोट तंत्रज्ञान व व्यवस्थापन पदव्युत्तर पदविकेसाठी एम.एससी., एम.एससी. टेक., बी.ई./बी.टेक. (सिव्हिल, जलसंपत्ती, रिमोट सेन्सिंग), बी.एससी. (कृषी) आणि एम.ए. (भूगोल) उत्तीर्ण विद्यार्थी प्रवेश घेऊ शकतात.

**केंद्रिय प्रवेश समितीशी संपर्क साधा**

पदविका अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता २० जागांपुरती मर्यादित असून प्रवेश ‘प्रथम या, प्रथम प्रवेश’ अथवा गुणवत्ता यादीच्या आधारे दिला जाणार आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या यूनीकनेक्ट या ॲपद्वारे ऑनलाइन अर्ज सादर करावेत. अधिक माहितीसाठी डॉ. वाय. के. मावळे, विभागप्रमुख, भूगर्भशास्त्र विभाग किंवा केंद्रीय प्रवेश समितीशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

**आधुनिक विषयांचा समावेश**

दोन वर्षांच्या एम.एससी. भूगर्भशास्त्र अभ्यासक्रमामध्ये खनिजशास्त्र, शैलशास्त्र, भूजलशास्त्र, पर्यावरण भूविज्ञान, अभियांत्रिकी भूविज्ञान, रिमोट सेन्सिंग आणि जी.आय.एस. यांसारख्या आधुनिक विषयांचा समावेश आहे. तसेच एक वर्ष कालावधीच्या पाणलोट तंत्रज्ञान व व्यवस्थापन पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमामध्ये जलसंधारण, भूजल पुनर्भरण, मृदसंधारण, नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन आणि हवामान बदलाशी संबंधित व्यावसायिक प्रशिक्षण दिले जाते.

## बोगस बियाणे कंपनीची मालमत्ता जप्त करून शेतकऱ्यांना भरपाई द्या - अनंत गुढे

**अमरावती/का.प्र.**

विदर्भातील शेतकऱ्यांसोबत पुन्हा फसवेगिरी झाली आहे. यावर्षी खरीप हंगामातील सोयाबीन बियाणे उगवले नाही. बोगस बियाणे तयार करणाऱ्या अनेक कंपन्या आहेत. हे बियाणे अधिकृत कृषी दुकानातून विकल्या गेले आहेत.

या बोगस बियाणे उत्पादन आणि विक्री यात अनेकांचे हात ओले झाले असणार, त्याशिवाय अनेक कंपनीचे बियाणे बिनधास्तपणे विकल्याच गेले नसते. आता तक्रारीचा ओघ महाराष्ट्रभरात्या वाढला आहे. महाराष्ट्राच्या विधिमंडळातही प्रश्न उपस्थित झाले आहेत. कृषी गुणवत्ता नियंत्रण समितीने पाहणी केली आहे. बियाणे बोगस होते, हे जवळपास निश्चित झाले आहे. आता या संकटातून शेतकऱ्यांना बाहेर काढणे आवश्यक आहे. शेतकरी हवालदिल झाला आहे. खरीप पेरणीची वेळ निघून जात आहे. शेतकऱ्याच एक नगदी पीक अडचणीत सापडलं आहे. तालुका कृषी अधिकाऱ्यांपासून तर कृषी मंत्र्यापर्यंत शेतकऱ्यांनी तक्रारी केल्या आहेत. आता खरी गरज आहे ती शेतकऱ्यांना तातडीने दुसरे बियाणे देणे किंवा दुसरे पीक घेण्यासाठी त्याला आर्थिक मदत करणे.

याप्रकरणी त्या कंपन्याच्या मालकाची, संचालकाची वैयक्तिक मालमत्ता सरकारने जप्त करावी आणि शेतकऱ्यांना तातडीने मदत करावी, अशी मागणी माजी खा. अनंत गुढे यांनी केली आहे.

## सोयाबीन बियाणांच्या उगवणीत अडचण

### १ हजार २१५ शेतकऱ्यांनी नोंदविली तक्रार

**अमरावती/का.प्र.**

यंदाच्या खरीप हंगामात सोयाबीन बियाण्यांच्या उगवणीत गंभीर अडचणी निर्माण झाल्याने अमरावती विभागातील शेतकरी अडचणीत सापडला आहे. विभागातील पाच जिल्ह्यांमधून आतापर्यंत तब्बल १ हजार २१५ शेतकऱ्यांनी निकृष्ट बियाण्यांबाबत कृषी विभागाकडे अधिकृत तक्रारी नोंदवल्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने पांढऱ्या फुलांच्या विशिष्ट सोयाबीन वाणांबाबत सर्वाधिक तक्रारी असून, या पार्श्वभूमीवर कृषी विभागाने तातडीने पावले उचलत संशयित वाणांच्या विक्रीवर बंदीचे आदेश जारी केले आहेत.



विभागातील अमरावती, यवतमाळ, वाशीम, बुलडाणा आणि अकोला या जिल्ह्यांमध्ये सोयाबीन हे मुख्य पीक असून आहे. मात्र, यंदा बाजारात विविध कंपन्यांनी अधिक उत्पादनाचा दावा करत ‘टुथफुल’ बियाण्यांच्या नावाखाली निकृष्ट आणि बोगस बियाण्यांचा पुरवठा केल्याचा आरोप होत आहे. यंदा बहुतांश शेतकऱ्यांनी घरगुती बियाण्यांऐवजी बाजारातील महागड्या बियाण्यांना पसंती दिली, मात्र बीजप्रक्रिया करूनही पेरलेले बियाणे उगवलेच नसल्याने शेतकऱ्यांची मोठी फसगत झाली आहे. कृषी विभागाकडे प्राप्त झालेल्या १२१५ तक्रारीपैकी सर्वाधिक फटका बुलडाणा आणि अमरावती जिल्ह्याला बसला आहे. बुलडाणा आणि अकोला या दोन्ही जिल्ह्यांतून ६०० हून अधिक तक्रारी आल्या असून, एकट्या बुलडाण्यात ४२५ तर अकोल्यात १९७ तक्रारींची नोंद झाली आहे. अमरावती जिल्ह्यात सर्वाधिक त्यापैकी ४७० तक्रारी दाखल झाल्या असून, पडताळणी पूर्ण झाली आहे. १५१ प्रकरणांची जिल्ह्यात रोज तक्रारींचा आकडा वाढत आहे. यवतमाळ येथे १२३ पैकी ४८ तक्रारींची जागेवर जाऊन पडताळणी करण्यात आली आहे.

सोयाबीनच्या बोगस बियाण्यांची विक्री करून फसवणूक केल्याप्रकरणी ‘बूस्टर प्लांट जेनेटिक्स प्रायव्हेट लिमिटेड’ या उत्पादक कंपनीविरुद्ध अखेर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. अमरावती जिल्ह्यात हजारो शेतकऱ्यांनी जालना. जिल्ह्यातील गेवराई बाजार येथील ‘बूस्टर प्लांट जेनेटिक्स’ कंपनीच्या ‘हुतुतू’ या वाणाची खरेदी केली होती. मात्र, पेरणी केल्यानंतर हे बियाणे उगवलेच नसल्याचे समोर आले.

## आसेगाव पूर्णा पोलीस ठाण्यात तक्रार निवारण दिन

### ८ हरवलेले मोबाईल मूळ मालकांना परत

**आसेगाव पूर्णा/वार्ताहर**

आसेगाव पूर्णा पोलीस ठाण्यात शनिवारी (दि. ११) अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांच्या उपस्थितीत तक्रार निवारण दिनाचे आयोजन करण्यात आले. यावेळी एक वरिष्ठ अर्ज, दोन स्थानिक अर्ज तसेच ‘आपले सरकार’ पोर्टलवरील एका अर्जाचा निपटारा करण्यात आला.

सायबर विभागाच्या CEIR पोर्टलच्या माध्यमातून शोधण्यात आलेले सुमारे ६१ हजार ७९८ रुपये किमतीचे आठ हरवलेले मोबाईल त्यांच्या मूळ मालकांकडे सुपुर्द करण्यात आले. गोविंदपूर, सावळापूर, आसेगाव पूर्णा, येवता, कोतगावंडी आदी गावांतील लाभार्थ्यांनी पोलिसांचे आभार मानले. यावेळी पोलीस पाटील, शांतता समिती व महिला दक्षता समितीच्या सदस्यांची बैठक घेऊन विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच पोलीस कर्मचाऱ्यांचा दरबार घेऊन तपासकाम, विविध पोर्टलवरील कामकाज आणि बीट अंमलबजावणीबाबत आवश्यक सूचना देण्यात आल्या. पोलीस ठाण्याचा परिसर व लॉकअपची पाहणी करूनही आवश्यक निर्देश देण्यात आले.

याप्रसंगी आसेगाव पूर्णा पोलीस ठाण्याचे ठाणेदार सुरज तेलगोटे यांनी, मागील एका महिन्यात एकूण २१ हरवलेले मोबाईल शोधून संबंधित नागरिकांना परत करण्यात आल्याची माहिती दिली.



**एका महिन्यात २१ हरवलेले मोबाईल शोधून दिले**

पोलीस ठाण्याने सायबर विभागाच्या CEIR पोर्टलच्या माध्यमातून हरवलेले मोबाईल शोधण्याची मोहीम प्रभावीपणे राबविली आहे. ठाणेदार सुरज तेलगोटे यांनी दिलेल्या माहितीनुसार, मागील एका महिन्यात एकूण २१ हरवलेले मोबाईल शोधून त्यांचे मूळ मालकांना परत करण्यात आले आहे. त्यामुळे नागरिकांकडून आसेगाव पूर्णा पोलिसांच्या कार्याचे कौतुक करण्यात येत आहे.

## नागपूरच्या इंजिनिअरची गुरुकुंज मोझरीत आत्महत्या

### आंब्याच्या झाडाला घेतला गळफास

**तिवसा/वार्ताहर**

नागपूरच्या एका मोठ्या कंपनीत इंजिनिअर असलेल्या ३९ वर्षीय इसमाने १२५ किलोमीटर अंतरावर गुरुकुंज मोझरी जवळ स्वतःच्या कारने येऊन आंब्याच्या झाडाला गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना आज रविवारी(ता.१२)रोजी सकाळी घडली.

राम विनोद चौधरी(वय ३९,रा.आरबीटल एम्पायर जयताळा,नागपूर) असे आत्महत्या करणाऱ्या इंजिनिअर इसमाचे नाव आहे. ते नागपूरच्या कोराडी थर्मल पॉवर प्लॅन्ट येथे मोठ्या पदावर नोकरीवर आहे.ते आज सकाळी नागपूर येथून स्वतः च्या हुंडई



घटनास्थळी आढळलेली कार

कार क्रमांक MH ३१ FR ५६२५ ने नागपूर येथून अमरावतीच्या दिशेने पोहचले व दरम्यान गुरुकुंज मोझरी बायपास नजीकच्या राष्ट्रसंत पेट्रोलियमजवळ कार उभी करून मागील बाजूने असलेल्या शेतातील आंब्याच्या झाडाला दोरीने गळफास घेऊन जीवनयात्रा संपविली.सकाळी ८ वाजताचे दरम्यान ही घटना उघडकीस येताच एकच खळबळ उडाली. तिवसा पोलिसांनी घटनास्थळी दाखल होऊन घटनेचा पंचनामा केला असून इंजिनिअर इसमाने एवढ्या लांब येऊन आत्महत्येचे पाऊल का उचलले,याबाबतचे कारण अद्यापही समजू शकले नाही. तिवसा पोलिसांनी घटनेची नोंद घेऊन मर्ग दाखल केला असून पुढील तपास तिवसा पोलीस करीत आहे.

मृतकाने आत्महत्येपूर्वी कुटुंबातील पत्नीसह अन्य काही नातेवाईक यांना गुरुकुंज मोझरीत पोहचल्याचे लोकेशन पाठविले असल्याची माहिती पोलिसांकडून प्राप्त झाली असून पोलिसांनी मृतकाचा मोबाईल जप्त केला आहे.पुढील तपास तिवसा पोलीस करीत आहे.

### पंतप्रधान आवास योजनेतंर्गत

## जिल्ह्यात वर्षभरात २९ हजार ३१२ घरकुल पूर्णत्वाचे उद्दिष्ट

**अमरावती/का.प्र.**

पंतप्रधान आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत जिल्ह्यात वर्षभरात २९ हजार ३१२ घरकुल पूर्णत्वाचे उद्दिष्ट शासनाकडून देण्यात आले आहे. त्यामुळे जिल्ह्यात या मोहिमेला वेग आला असून ग्रामविकास व पंचायतराज विभागाचे प्रधान सचिव यांच्या सूचनेनंतर एका दिवसात तब्बल ७१० घरकुले पूर्ण करण्यात आली आहेत. जिल्ह्यात याच गतीने उद्दिष्टपूर्तीच्या सुचना सीईओ सत्यम गांधी यांनी या विभागाला दिल्यात.

ग्रामविकास व पंचायतराज विभागाचे प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच व्हिसी घेण्यात आली. राज्यात जुलै २०२७ पर्यंत १५ लाख घरे पूर्ण करण्याचे लक्ष्य निश्चित करण्यात आले. त्यानुसार विभागाला २ लाख १८ हजार ७८७ घरकुले पूर्ण करण्याचे उद्दिष्ट देण्यात आले असून, त्यातील २९,३१२ घरकुलांचे उद्दिष्ट अमरावती जिल्ह्याला देण्यात आले आहे.




८ जुलैपर्यंत जिल्ह्यात ३,६०४ घरकुले पूर्ण झाली होती. त्याच दिवशी सीईओंनी सर्व पंचायत समित्यांतील स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, ग्रामीण गृहनिर्माण अभियंते, डाटा एन्ट्री ऑपरेटर तसेच महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतील (मनरेगा) सहाय्यक कार्यक्रम अधिकारी आणि पंचायत तांत्रिक अधिकारी यांची बैठक घेऊन सविस्तर आढावा घेतला. ज्या लाभार्थ्यांना मनरेगाअंतर्गत संपूर्ण मस्टर वितरित झाले आहेत, त्यांची घरकुले तातडीने पूर्ण करण्याच्या सक्त सूचना देण्यात आल्या. या निर्देशानंतर सर्व यंत्रणा तत्काळ कामाला लागली आणि ९ जुलै रोजी एका दिवसातच ७१० घरकुले पूर्ण करण्यात आली. तसेच उर्वरित २९ हजार १३२ घरकुल त्वरित पूर्ण करण्याच्या सुचना देखील देण्यात आल्या आहेत.

# मुख्याधिकारी लोहकरेंचा ‘नियोजन पॅटर्न’

### शिस्त आणि पारदर्शकतेने जिंकली नागरिकांची मने

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

नगरपरिषदेचे मुख्याधिकारी विजय लोहकरे यांनी पदभार स्वीकारल्यापासून शहरात आणि प्रशासकीय वर्तुळात एक सकारात्मक बदल दिसून येत आहे.त्यांच्या शिस्तबद्ध आणि दूरदृष्टीच्या कार्यप्रणालीमुळे नगरपरिषदेच्या अंतर्गत कामकाजात मोठ्या सुधारणा झाल्या आहेत. त्यांच्या याच उत्कृष्ट नियोजन कौशल्यामुळे सध्या अंजनगाव सुर्जी शहरात त्यांना नागरिक आदराने ‘नियोजन अधिकारी’ म्हणून संबोधित करत आहेत.

मुख्याधिकारी विजय लोहकरे यांच्या नियोजनबद्ध कामाची झलक नुकतीच विविध प्रसंगातून जनतेसमोर आली आहे.नगरपरिषद निवडणुकीच्या दरम्यान अत्यंत संवेदनशील मानल्या जाणाऱ्या मतमोजणी प्रक्रियेचे त्यांनी केलेले सूक्ष्म आणि चोख नियोजन सर्वत्र कौतुकाचा विषय ठरले.

त्यानंतर,आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त शहरात आयोजित करण्यात आलेल्या योग प्रशिक्षण शिबिरात त्यांनी विशेष मेहनत घेतली. अंजनगाव सुर्जी शहराच्या इतिहासात पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या प्रमाणावर नागरिकांनी एकत्र येत या योग प्रशिक्षणात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या दोन्ही मोठ्या घडामोडींमधील त्यांच्या व्यवस्थापन कौशल्यामुळे त्यांनी शहरात स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली आहे.

केवळ आदेश न सोडता,प्रशासकीय कामकाज अधिक सुलभ व्हावे यासाठी ते स्वतः कर्मचाऱ्यांना कामकाजाच्या विविध पद्धती आणि नियम समजावून सांगत आहेत.वरिष्ठ अधिकाऱ्याकडून मिळणाऱ्या या सकारात्मक मार्गदर्शनामुळे कर्मचाऱ्यांमधील मरगळ दूर झाली असून, प्रशासकीय



कामकाजाला कमालीची गती मिळाली आहे. मुख्याधिकारी विजय लोहकरेंचा नियोजन पॅटर्न शहरातील इतर शासकीय कार्यालयात कार्यालय प्रमुखांनी राबवावेत अशीही मागणी आता होत आहे.मुख्याधिकारी विजय लोहकरे यांच्या या लोकाभिमुख आणि शिस्तबद्ध कार्यप्रणालीमुळे नागरिकांची मने जिंकली असून अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेचा चेहरामोहरा बदलत घडविला आहे त्यामुळे शहरवासीयांकडून त्यांच्या कार्यशैलीचे जोरदार स्वागत केले जात आहे.

## संक्षिप्त

### रुग्णसेवेबद्दल डॉ. अनंत पोरे यांचा सत्कार

**अचलपूर-** समाजसेवा आणि रुग्णसेवेबद्दल ज्येष्ठ नागरिक संघ आणि संत्रा उत्पादक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने नुकताच डॉ. अनंत पोरे यांच्या सत्कार करण्यात आला.डॉ. अनंत पोरे यांच्यासह संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नाला वाचा फोडणारे सुभाष उभाड यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सुरेखा ठाकरे, तर प्रमुख पाहुणे म्हणून जयानंद खरड, तुलसीदास रहाटे, गजानन पोरे, राजेंद्र पुसदेकर, रविशंकर अंबाडकर, ज्ञानेश्वर उभाड, माजी जि.प. सदस्य सुखदेव पवार मंचावर उपस्थित होते. याप्रसंगी सुरेखा ठाकरे यांचाही उपस्थितांकडून सन्मान करण्यात आला.कार्यक्रमाला उभाड, आनंदी भुयार, अजय उभाड, सुनील पांडे, प्रकाश वैद्य, गजानन बिजागरे, भैय्यासाहेब शेळके, प्रभाकर झगडे, मनीष शिंगणे, अभिजीत हरणे, अविनाश देशमुख, विनोद गोरले, देवेंद्र खंडेझोड, विष्णू तट्टे, मुकुंद उभाड, चंदेले, सगने, मनोज गावंडे, गजानन उभाड, जीवन उभाड, श्रेयस पाटील, प्रज्वल पाटील, रामेश्वर उभाड, मयुरी भुयार, अर्चना उभाड, सुजाता उभाड, सुबोध पाटील, ऋषी राऊत, दिगंबर हरणे, साधना घोगरे उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन रामचंद्र खवसे यांनी केले.

### शहरात पावणेतीन लाखांची घरफोडी

**अमरावती-** राजापेठ ठाण्याच्या हद्दीत मेहरबाबा कॉलनी, गजाननगर येथील अजय मदनराव सोनरकर (३३) या शिक्षकाच्या निवासस्थानी भरदिवसा झालेल्या घरफोडीत चोरट्यांनी २ लाख ७१ हजारांचा ऐवज लंपास केला.आई-वडील लग्नाला गेले होते. अजय सोनरकर ड्युटीवरुन घरी परत आले असता मागील दार तुटलेले आढळून आले. घरातील बेडरूमच्या कपाटातील सामान अस्ताव्यस्त केलेले दिसले. कपाटातील १६.२६० ग्रॅम मंगळसूत्र, १२.३७० ग्रॅमचे मंगळसूत्र, सोन्याचे १० नाणे, पायातील चांदीचे जोडवे ११. ४०० ग्रॅम, दोन नग ३ ग्रॅम सोन्याचे कानातील टॉप्स, चांदीचे भांडे, १ ग्रॅमचे नेकलेस, ३ हजारांची रोकड असा एकूण २ लाख ७१ हजारांचा मुद्देमाल चोरीस गेल्याचे लक्षात आले. अजय मदन सोनरकर यांच्या तक्रारीवरून राजापेठ ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध घरफोडीचा गुन्हा दाखल केला. श्वानपथक, ठसेतज्ज्ञांना घटनास्थळी पाचारण करण्यात आले होते.

### बोगस बियाणाबाबत कृषी विभागाने दिल्या महत्त्वाच्या सूचना

**अंजनगाव बारी-** अमरावती जिल्ह्यासह राज्यातील अनेक भागांत बोगस बियाण्यांमुळे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाल्याच्या घटना समोर येत आहेत. समाधानकारक पाऊस होऊनही पेरणीनंतर पीक उगवले नसल्याने अनेक शेतकरी संकटात सापडले आहेत. त्यामुळे खरीप हंगामात बियाणे खरेदी करताना अधिक सतर्क राहण्याचे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे. शेतकऱ्यांनी बियाणे खरेदी करताना केवळ अधिकृत व परवानाधारक विक्रेत्यांकडूनच खरेदी करावी. खरेदीचे पक्के बिल, बियाण्यावरील प्रमाणपत्र टॅग, उत्पादन व मुदत समाप्तीची तारीख तसेच कंपनीची माहिती काळजीपूर्वक तपासणे आवश्यक आहे. स्वस्त दराचे आमिष दाखवून फेरीवाले किंवा अनधिकृत विक्रेत्यांकडून बियाणे खरेदी करणे टाळावे, कारण अशा ठिकाणी बोगस अथवा जुन्या बियाण्यांची विक्री होण्याची शक्यता अधिक असते.पेरणीपूर्वी बियाण्यांची उगवण क्षमता तपासण्याचाही सल्ला कृषी तज्ज्ञांनी दिला आहे. १०० बियाण्यांची साधी उगवण चाचणी करून त्यापैकी किमान ७० बियाण्यांची चांगले कोंब फुटत असल्यासच ते बियाणे पेरणीसाठी योग्य मानावे. याशिवाय, केवळ बाजारातील मागणी पाहून वाणाची निवड न करता आपल्या जमिनीचा पोत, सुपीकता व मृदा परीक्षण अहवालाच्या आधारे योग्य वाणाची निवड करावी. नामांकित कंपन्यांच्या नावाशी साधर्म्य असलेले पॅकेजिंग वापरून बोगस बियाण्यांची विक्री केली जात असल्याने शेतकऱ्यांनी पॅकिंगची बारकाईने पडताळणी करणे आवश्यक आहे. बोगस बियाण्यांची विक्री रोखण्यासाठी कृषी विभागाने जिल्हा व तालुका स्तरावर विशेष पथके कार्यरत ठेवली आहेत. फसवणूक झाल्याचा संशय आल्यास किंवा बोगस बियाण्यांची विक्री होत असल्याचे आढळल्यास शेतकऱ्यांनी तातडीने कृषी विभागाच्या टोल-फ्री क्रमांक १८००२३३४००० वर तक्रार नोंदवावी. वेळेत तक्रार केल्यास संबंधित प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कारवाई केली जाऊ शकते. खरीप हंगामात एका चुकीच्या निर्णयामुळे संपूर्ण वर्षभराच्या उत्पन्नावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे प्रत्येक शेतकऱ्याने जागरूक राहूनच बियाण्यांची खरेदी करावी, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.

### शहरात प्रतिबंधात्मक आदेश लागू

**अमरावती-** शहरात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी अमरावती शहर पोलीस आयुक्त यांनी महाराष्ट्र पोलिस कायद्याचे कलम ३७ (१) व (३) नुसार प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत. प्रतिबंधात्मक आदेश पोलिस आयुक्तालयाच्या परिक्षेत्रात लागू करण्यात आला असून सदर आदेश शनिवार ११ ते २५ जुलै च्या मध्यरात्रीपर्यंत लागू राहणार आहे.या आदेशाचा भंग करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध कायदेशीर कारवाई केली जाणार आहे.

### पुनरीक्षण मोहीम सुरू

**परतवाडा :** अचलपूर विधानसभा मतदारसंघात मतदार याद्यांचे विशेष ऊ सखोल पुनरीक्षणाचा कार्यक्रम टप्पा-२ हा ३० जूनपासून सुरू झाला. यादरम्यान ने मतदारांनी आपल्याकडे येणाऱ्या बीएलओंना आवश्यक माहिती द्यावी व ८. सहकार्य करावे, असे आवाहन मतदार , नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव यांनी केले. व मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरीक्षण , कार्यक्रम टप्पा-२ हा ३० जून ते २९ जुलै या कालावधीत होणार आहे. बीएलओ घरोघरी जाऊन प्रत्यक्ष मतदारांकडे , गृहभेटी देणार आहेत. अचलपूर व चांदूर बाजार या दोन तालुक्यांचा समावेश असलेल्या अचलपूर मतदारसंघात ३१ न पर्यवेक्षक, ३०९ बीएलओ, ९३० सहायक बीएलओ काम पाहत आहेत. अचलपूर विधानसभा मतदारसंघात एकूण २८ लाख ७५ हजार ५८५ पैकी ८९ हजार ४४ मतदारांना अर्जवाटप केले आहे.

# 'गाजीपूर इफेक्ट'! अखेर संपूर्ण जिल्ह्यातील स्टोन क्रशर प्रशासनाच्या रडारवर

## जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्देशानंतर संयुक्त तपासणी मोहीम; गौण खनिजाचा स्रोत, ट्रान्झिट पास, रॉयल्टी, खदान करार, स्टॉक रजिस्टरची होणार सखोल पडताळणी

### 'प्रत्यक्ष पाहणी की कागदोपत्री तपास?' अधिकृत अहवालावर लागल्या जिल्ह्याच्या नजरा

**ॲड. समीर ठाकूर**

**अकोला** : अकोट तालुक्यातील गाजीपूर येथील स्टोन क्रशर प्रकरणाने आता संपूर्ण अकोला जिल्ह्याच्या खाण व्यवसायाला हादरा दिला आहे. या प्रकरणावरील वृत्तांची जिल्हा प्रशासनाने गंभीर दखल घेतल्याची माहिती समोर आली असून, जिल्ह्यातील सर्व कार्यरत स्टोन क्रशरची संयुक्त तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आल्याची माहिती प्रशासकीय सूत्रांनी दिली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील गौण खनिज व्यवसाय, स्टोन क्रशर उद्योग आणि खानिज वाहतूक व्यवस्थेवर प्रशासनाने एकाच वेळी लक्ष केंद्रित केल्याचे चित्र आहे.

उपलब्ध माहितीनुसार, महसूल विभाग, भूविज्ञान विभाग, प्रदूषण नियंत्रण यंत्रणा तसेच इतर संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांचे संयुक्त पथक प्रत्यक्ष स्थळपाहणी करणार आहे. या तपासणीत प्रत्येक स्टोन क्रशरवर प्रक्रिया होणाऱ्या गौण खनिजाचा अधिकृत स्रोत, संबंधित खदानधारकाशी करण्यात आलेले करार, ट्रान्झिट पास (ई-रॉयल्टी), रॉयल्टीच्या नोंदी, स्टॉक रजिस्टर, वजन काट्याच्या नोंदी, आवक-जावक रजिस्टर आणि इतर वैधानिक अटींच्या पालनाची सखोल पडताळणी केली जाणार असल्याचे समजते. गाजीपूर प्रकरणानंतर आता एक प्रश्न संपूर्ण जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरला आहे ते म्हणजे स्टोन क्रशरवर प्रक्रिया होणारे गौण खनिज नेमके कुठून येते? या प्रश्नाचे उत्तर अधिकृत कागदपत्रांतून मिळाल्यास खनिज वाहतूक, महसूल, रॉयल्टी आणि परवानगी प्रक्रियेबाबतचे अनेक प्रश्न स्पष्ट होऊ शकतात, असे जाणकारांचे मत आहे. प्रशासकीय सूत्रांच्या माहितीनुसार, संयुक्त तपासणीनंतर प्रत्येक स्टोन क्रशरचा स्वतंत्र अहवाल तयार करून जिल्हा प्रशासनाकडे सादर केला जाणार आहे. त्या अहवालाच्या आधारे पुढील निर्णय आणि आवश्यक असल्यास पुढील प्रशासकीय कारवाईचा विचार केला जाऊ शकतो.


जनमाध्यम
गुरुवार ९ जुलै २०२६
E-paper - www.janmadhyam.com
ट्रान्झिट पास दाखवा, स्टॉक रजिस्टर उघडा... मगच संशय दूर होईल!
गाजीपूर स्टोन क्रशर प्रकरण : खनिजाच्या स्रोतापासून रॉयल्टीपर्यंत प्रत्येक नोंदीची संयुक्त चौकशीची मागणी; प्रशासनाच्या मौनामुळे संशय अधिक गडद
एका दिवसाचे ट्रान्झिट पास तपासले तरी वास्तव समोर येईल?

जनमाध्यम
गाजीपूरच्या स्टोन क्रशरवर प्रक्रिया होणारे खनिज येते कुठून?
दोन आदिवासी जमिनी, ४८ कोटींचा दंड, सीलिंग कारवाई, दुसरा नवा क्रशर आणि प्रशासनाच्या मौनाने वाढले संशयाचे धुके
-ट्रान्झिट पास, रॉयल्टी, खनिज खरेदी करार आणि स्टॉक रजिस्टरची संयुक्त चौकशी होणार का?

मात्र या संपूर्ण प्रक्रियेकडे जिल्ह्याचे लक्ष एका वेगळ्याच कारणामुळे लागले आहे. प्रत्यक्ष स्थळपाहणी करून वस्तुस्थितीवर आधारित अहवाल तयार होणार की केवळ कार्यालयीन कागदपत्रांवर आधारित औपचारिक अहवाल सादर केला जाणार, याबाबत विविध स्तरांतून प्रश्न उपस्थित होत आहेत. त्यामुळे या मोहिमेची विश्वासार्हता ही तपासणीच्या पारदर्शकतेवरच अवलंबून राहणार असल्याची चर्चा सुरू आहे.

विशेष म्हणजे, गाजीपूर येथील एका प्रकरणामुळे आता जिल्ह्यातील सर्व स्टोन क्रशर आणि खदानधारक तपासणीच्या कक्षेत आले आहेत. त्यामुळे आगामी काही दिवसांत प्रशासनाकडे सादर होणारा अधिकृत अहवाल हा जिल्ह्यातील गौण खनिज व्यवसायासाठी महत्त्वाचा दस्तऐवज ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

#### ■ 'या' कागदपत्रांची होणार छाननी

गौण खनिजाचा अधिकृत स्रोत.
संबंधित खदानधारकाशी असलेला करार.
ट्रान्झिट पास (ई-रॉयल्टी)ची पडताळणी.
रॉयल्टी भरल्याच्या नोंदी.
स्टॉक रजिस्टर आणि प्रत्यक्ष साठ्याची तुलना.
वजन काटा आणि आवक-जावक रजिस्टर.
पर्यावरणीय व महसुली परवानग्या.
लागू असलेल्या सर्व कायदेशीर अटींचे पालन.

#### ■ जिल्हाभरातील क्रशर चालकांमध्ये वाढली धाकधूक

प्रशासनाच्या संयुक्त तपासणीच्या निर्णयानंतर जिल्ह्यातील स्टोन क्रशर व्यावसायिकांमध्ये मोठी धाकधूक निर्माण झाल्याची चर्चा आहे. तपासणीत सर्व काही नियमानुसार असल्याचे स्पष्ट झाल्यास संबंधितांना दिलासा मिळू शकतो; मात्र संभाव्य त्रुटी आढळल्यास पुढील कारवाईची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे आता सर्वांचे लक्ष अधिकृत तपासणी अहवालाकडे लागले आहे.

#### ■ अहवाल 'मैदानी' की 'कार्यालयीन'?

तपासणी मोहिमेतील सर्वात मोठी कसोटी म्हणजे प्रत्यक्ष पाहणी. संयुक्त पथके प्रत्येक क्रशरवर जाऊन प्रत्यक्ष साठा, ट्रान्झिट पास, स्टॉक रजिस्टर आणि खरेदी कागदपत्रांची पडताळणी करतात की नाही, यावर या संपूर्ण मोहिमेची विश्वासार्हता ठरणार आहे. त्यामुळे अंतिम अहवाल वास्तव मांडणारा ठरतो की केवळ कागदोपत्री प्रक्रिया, याकडे आता संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

---

### राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या

# प्रदेश सचिवपदी डॉ. हेमंत देशमुख यांची नियुक्ती

**माजी मंत्री अनिल देशमुख यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान**



**अमरावती/प्रतिनिधी:-** राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या प्रदेश सचिवपदी अमरावती शहर जिल्हाध्यक्ष प्रा. डॉ. हेमंत देशमुख यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पक्ष संघटना राज्यभर अधिक सक्षम आणि प्रभावी करण्याच्या दृष्टीने ही नियुक्ती अत्यंत महत्त्वाची असल्याचे मत पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा माजी मंत्री अनिल देशमुख यांनी व्यक्त केले.

प्रा.डॉ.हेमंत देशमुख यांनी शहर जिल्हाध्यक्ष म्हणून काम करताना पक्ष संघटना मजबूत करणे, नव्या कार्यकर्त्यांना पक्षाशी जोडणे, विविध सामाजिक व राजकीय प्रश्नांवर प्रभावीपणे भूमिका मांडणे तसेच पक्षाच्या विचारांचा जनसामान्यांपर्यंत सातत्याने प्रसार करण्यासाठी उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत पक्षाच ☞(पान २ वर)

---

# अवैध वाळू वाहतूक करणारा ट्रॅक्टर जप्त

### -अंजनगाव सुर्जी पोलिसांची कारवाई -८ लाख १० हजारांचा मुद्देमाल हस्तगत



**अंजनगाव सुर्जी / प्रतिनिधी:-** अंजनगाव सुर्जी पोलीस प्रशासनाने अवैध धंद्यांविरुद्ध सुरू केलेल्या धडक मोहिमेत शनिवारी (११ जुलै २०२६) अजिजपुरा ते वडाळी रोडवर धाडसी कारवाई केली. या कारवाईत अवैध वाळूची (रेती) वाहतूक करणारा ट्रॅक्टर व ट्रॉली जप्त करण्यात आली असून, एकूण ८ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. याप्रकरणी एका आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून त्याला ☞(पान २ वर)

---

# लोणी चाकू हल्ल्यातील जखमीचा उपचारादरम्यान मृत्यू

### खुनाचा गुन्हा दाखल, मुख्य आरोपी आधीच न्यायालयीन कोठडीत

**अमरावती/प्रतिनिधी:-** लोणी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील लोणी पुलाजवळील वाटपूर फाट्यावर झालेल्या प्राणघातक चाकू हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या दीपक उर्फ मुन्ना दादाराव टेकन यांचा रविवारी उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूनंतर या प्रकरणातील गुन्ह्यात आता खुनाचे कलम वाढविण्यात आले असून मुख्य आरोपी पवन देवेंद्र भाकरे हा सध्या न्यायालयीन कोठडीत आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ४ जुलै रोजी लोणी पुलाजवळील वाटपूर फाट्यावर पवन देवेंद्र भाकरे (वय ३४, रा. वाटपूर, ता. नांदगाव खंडेश्वर), सुमीत उमाळे आणि एका अल्पवयीन साथीदाराने दीपक टेकन यांना अडवून त्यांच्या खिशातील दोन हजार रुपये जबरदस्तीने हिसकावून घेतले होते. त्यानंतर ५ जुलैच्या रात्री दीपक टेकन हे आपल्या मित्रांसह लोणी येथील कास्तकार बारमध्ये ☞(पान २ वर)

---



### धडपड पिक जगविण्याची..!

खल्लार परिसरात पावसाने गेल्या आठवड्यापासून दडी मारली आहे. त्यामुळे शेतातील पिक मरु नये यासाठी मोचर्डा येथील शेतकरी भूषण गावंडे शेतातील कपाशीचे पिक जगाविण्यासाठी भर पावसाळ्यात स्प्रिंकरचा आधार घेत कपाशी पिकाला कृत्रिम पाणी देत आहे. **छाया :-युवराज डोंगरे, खल्लार**

---

# बोगस बियाण्यामुळे नांदगाव तालुक्यातील शेतकऱ्यावर दुबार पेरणीचे संकट

### तालुका कृषी विभागाकडे १५० चे वर तक्रारी, नुकसान भरपाईची मागणी



■ बियाणे उगवले नसल्याचा आतापर्यंत तालुक्यामधून १५० चे वर तक्रारी तालुका कृषी कार्यालयाकडे प्राप्त झाल्या. यामध्ये बूस्टर इनोव्हेज कंपनीच्या तक्रारी जास्त आहेत. तक्रारी अजूनही वाढण्याची शक्यता आहे. प्राप्त तक्रारीवरून शेतकऱ्यांचे बांधावर जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली असता बियाण्याची उगवण फारच अल्प प्रमाणात दिसून आली. असा अहवाल वरिष्ठ स्तरावर पाठविण्यात येणार असून तालुक्यात ९० टक्के पेरणी पूर्ण झाली. **-विकास पाटील,** तालुका कृषी अधिकारी -नांदगाव खंडेश्वर.

**नांदगाव खंडेश्वर/ प्रतिनिधी:-** यंदाच्या खरीप हंगामात नांदगाव खंडेश्वर तालुक्यात सोयाबीनचे बियाणे बोगस व निकृष्ट दर्जाचे निघाल्यामुळे अनेक शेतकऱ्यांच्या शेतामध्ये बियाण्याची उगवण फारच अल्प प्रमाणात तर काही शेतात उगवणच झाली नाही असा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या शेतकऱ्यावर दुबार पेरणीचे संकट ओढवले असून आर्थिक फटका सहन करावा लागत असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. बियाणे कंपन्याकडून फसवणूक झाल्याचा आरोप शेतकऱ्याकडून होत असुन सोयाबीनचे बियाणे उगवलेच ☞(पान २ वर)

---

### वाहन चालवितांना हेल्मेटचा वापर 'न 'करता मोबाईलवर बोलणे पडले महागात

# पोलिस कर्मचाऱ्यालाच पडला दोन हजाराचा दंड

**खल्लार/प्रतिनिधी:-** वाहन चालवितांना हेल्मेटचा वापर न करता मोबाईलवर बोलणाऱ्या एका पोलिस कर्मचाऱ्यालाच दोन हजार रुपयांचा दंड थोठावण्यात आला.



या कारवाईची दर्यापूरात चांगलीच चर्चा रंगली असून वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणारा कुणीही असो चुकीला माफी नाही. असा संदेश दर्यापूर पोलिसांकडून या कारवाईच्या माध्यमातून नागरिकांना देण्यात आला आहे.

कायद्यापुढे कोणताही व्यक्ती मोठा नाही. याची प्रचिती देणारी ही कारवाई दर्यापूर येथे पाहायला मिळाली. दर्यापूर पोलिस स्टेशन मधिल एक पोलिस कर्मचारी दुचाकीवार हेल्मेट न घालता तसेच वाहन चालवितांना मोबाईलवर बोलत असल्याचे ☞(पान २ वर)

---

# चांदुर रेल्वे तालुक्यात बियाणे न उगवल्याच्या ११० तक्रारी

### पावसाने फिरवली पाठ, सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचे डोळे पाणावले

**चांदुर रेल्वे/प्रतिनिधी:-** पेरणी योग्य पाऊस झाला म्हणून शेतकऱ्यांनी आपल्या शेतात सोयाबीन व कपाशी पिकाची पेरणी केली. परंतु पेरणी होऊन दहा ते बारा दिवसाचा कालावधी लोटून सुद्धा तालुक्यात पावसाने दांडी मारल्यामुळे शेतकऱ्यांचे डोळे पाणावले.

आधीच मागील दोन वर्षापासून हवालदिल झालेला शेतकरी, दरवर्षी अस्मानी संकटाने वेडला असून सुद्धा पोटाची खडकी भरण्यासाठी दिवस-रात्र मेहनत करतो. परंतु दरवर्षी निसर्गाचा कोप हा त्याच्या पाचवीला पुजलेला आहे.

अनेक संकटे त्याच्या सोबत असतात त्यात प्रामुख्याने जंगली प्राणी, तसेच निसर्गाचा प्रत्येक संकट त्याचा सामना करत आपल पुढच पाऊल टाकत असतो. अश्यात यावर्षी सुद्धा तालुक्यात पावसाने दांडी मारल्याने पेरणी झाल्यानंतर पाठ फिरवून शेतकऱ्याला चिंतेत पाडले आहे. अशीच परिस्थिती राहिली तर शेतकरी व शेतातले पिक नष्ट होऊन दुबार पेरणीची वेळ शेतकऱ्यांवर येऊ शकते. अश्यात रासायनिक खताचा तुटवडा व बियाण्याची झालेली भरमसाठ वाढ व त्यातही बोगस बियाण्यामुळे तालुक्यातील ११० सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचे शेतातील सोयाबीन उगवलेच नसल्याची धक्कादायक माहिती कृषी विभागाने सांगितलीं. यावर्षी यावर्षी सोयाबीन ३५ हजार हेक्टर वर लावण्यात आले. तर कपाशी दरवेळेस पेक्ष्या ७००० हेक्टर लावण्यात आली. सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांनी लावलेले हुतुतू बूस्टरच्या सर्वाधिक तक्रारी प्राप्त झाल्या अशी माहिती तालुका कृषी अधिकारी यांनी दिली आहे. तालुक्यात या वर्षी पावसाचे प्रमाण २५ जून २०२६ पर्यंत १३०.२ सरासरी झाले आहे . सरासरी प्रमाणात पाऊस कमी झाला आहे. तर जुलै महिन्यात पावसाचे प्रमाण कमी असल्यामुळे शेतकऱ्यांची पिकांचे नुकसान होत आहे. तालुक्यात सोयाबीनचा पेरा १९९७८ हेक्टर वर झाला आहे. तर तूर ६५४९ हेक्टर लागवड झाली आहे. तर कपाशी ७८१३हेक्टर वर पेरणी झाली आहे. तालुक्यात सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या बियाणे न उगवल्याच्या ११० तक्रारी प्राप्त असून त्याची पूर्ण चौकशी व तपासणी ☞(पान २ वर)

---

# अंजनगाव पोलिसांची अवैध दारू विक्रेत्यांवर कारवाई



### ९५ हजारांच्या मुद्देमालासह दोन आरोपी गजाआड

**अंजनगाव सुर्जी/ प्रतिनिधी:-** अंजनगाव सुर्जी पोलीस स्टेशन अंतर्गत अवैध धंद्यांविरुद्ध राबविण्यात येत असलेल्या धडक मोहिमेदरम्यान, पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे सापळा रचून दोन अवैध दारू विक्रेत्यांना अटक केली आहे. या कारवाईत पोलिसांनी अवैध देशी दारू आणि गुन्ह्यात वापरलेली ☞(पान २ वर)

---

### नगराध्यक्ष अविनाश गायगोलेंच्या पाठपुराव्याला यश

# अंजनगाव सुर्जी न.प. उर्दू शाळेत १३ शिक्षकांची नियुक्ती मंजूर

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधी:-** अंजनगाव सुर्जी नगरपरिषद उर्दू माध्यमिक विद्यालयात गेल्या अनेक दिवसांपासून १८ शिक्षकांची पदे रिक्त असल्याने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर गंभीर परिणाम झाला होता. विविध विषयांच्या तासिका घेण्यासाठी पुरेसे शिक्षक नसल्याने पालकांमध्येही चिंतेचे वातावरण होते. अखेर नगराध्यक्ष अविनाश गायगोले यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे या समस्येवर मार्ग निघाला आहे. शाळा प्रशासनाने रिक्त असलेल्या १८ पदांची सविस्तर माहिती शिक्षण उपसंचालक, अमरावती यांच्याकडे यापूर्वीच सादर केली होती. उर्दू माध्यमाच्या या शाळेत भाषा, गणित, विज्ञान, सामाजिक शास्त्रे यासारख्या मुख्य विषयांचे शिक्षक नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत होते.नगराध्यक्ष अविनाश गायगोले यांनी शिक्षण विभागाकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांमुळे शालेय शिक्षण व क्रीडा




विभागाच्या 'पवित्र पोर्टल' शिक्षक भरती प्रक्रियेद्वारे १८ पैकी १३ रिक्त पदे मंजूर करण्यात आली आहेत. उर्वरित ५ पदे भरण्यासाठीही प्रशासन प्रयत्नशील आहे. या शिक्षक भरती प्रक्रियेत माजी प्राध्यापक रविंद्र कोकाटे यांच्या चमूचे विशेष मार्गदर्शन लाभले. त्यांच्या अनुभवाचा व तांत्रिक मार्गदर्शनाचा फायदा नगरपरिषदेला झाला, असे प्रशासनाने सांगितले. १३ नवीन शिक्षक मिळाल्याने शाळेतील शिक्षणाचा दर्जा सुधारेल, अशी ☞(पान २ वर)